अनुभव सूत्र of श्री मायिदेव –
Edited with the commentary in Marathi by मल्लिकार्जुन शास्त्री.
(वीरशैवलिंगि ब्राह्मण धर्म ग्रंथमाला No. 39), Sholapur, 1909.

(8)

1294

Indira Gandhi National Centre for the Arts

Bill No. 5/07-08

15

Z40-8006

sands of people in the city did the same as I did".
"More's the pity".

saying my query was an innocent one. "I wish you all luck, Kittan", I said, "By the way, did the

graphs on the economic crisis in Argentina, I feel the event deserves far more coverage. Two months, four presidents and three

**From timesofindia.com**

If only the corruption-inured Indian public could be similarly aroused, an uprising would serve as a timely warning to our politicians who are more venal, greedy and unprincipled than any other

ॐ

रावसाहेब मल्लप्पा बसप्पा वारद यांच्या उदार आश्रयाखालीं प्रसिद्ध होणारी वीरशैव-लिंगिब्राह्मणधर्मग्रंथमाला.

ग्रंथ ३९ वा.

श्रीमायिदेवकृत

# अनुभवसूत्र.

हा ग्रंथ

( महाराष्ट्र तात्पर्यासह )

वेदमूर्ति, मणूर मठाध्यक्ष मल्लिकार्जुनशास्त्री

यांनीं सोलापूर येथें

'श्रीदत्तप्रसाद' छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केला.

---

आवृत्ति १ ली. प्रती १,०००.

---

शके १८३१, सन १९०९.

---

हा ग्रंथ प्रसिद्धिकर्त्यानें सर्व हक्कांसह रावसाहेब मल्लप्पा बसप्पा वारद यांस अर्पण केला आहे.

---

~~किंमत [illegible] आणे~~

रसायनशाला

DATA ENTERED
Date. 24/06/08

KALANIDHI
Rare Book Collection
Indira Gandhi National Centre for the Arts
IGNCA
ACC No.: R-472
Date: 26.3.08

SANS
294.5513
MAY

# प्रस्तावना.

एतद्यो वेद सोऽविद्याग्रन्थिं विकिरति प्रभुः ॥
शिवसिद्धान्तकं तन्त्रं शिवाद्वैतं शिवं पदम् ॥
—( अनुभवसूत्र* )

हें आमचें शक्तिविशिष्टाद्वैत वीरशैवमत सर्व मतांहून श्रेष्ठ असूनहि एतन्मतप्रतिपादक ग्रंथसाहित्य मात्र फार दुर्मिळ झालें आहे. ही उणीव दूर होऊन स्वमताचें योग्य ज्ञान व्हावें अशी आमच्या समाजांत अलीकडे बरीच जिज्ञासा दिसूं लागली आहे. प्रस्तुत ह्या मतासंबंधीं कांहीं मूलमात्र प्रकरणग्रंथ कानडींत छापून प्रसिद्ध झाले आहेत, तथापि आमच्या सर्व महाराष्ट्र धर्मबंधूंस सामान्यतः ज्ञान व्हावें ह्मणून सरळ मराठी भाषांतरासह हा मायिदेवकृत अनुभवसूत्र नामक शिवसिद्धांतप्रतिपादकग्रंथ आह्मीं छापून प्रसिद्ध केला आहे. ह्या ग्रंथाची योग्यता किती आहे हें शिरोभागीं दिलेल्या ग्रंथकाराच्या श्लोकावरून सूज्ञ वाचकांच्या लक्षांत येणार आहे ह्मणून अन्य रीतीनें गौरव करण्याचें आह्मांस प्रयोजनच नाहीं. ग्रंथकारानें ह्या ग्रंथाच्या प्रथमाधिकरणांत आपला व आपल्या पूर्वजांचा गौरवपूर्वक नामनिर्देश केला आहे हीं मोठी समाधानाची गोष्ट आहे. ह्यावरून पहातां ह्या ग्रंथकाराचे पूर्वज मलप्रहारिणी नांवाच्या नदीच्या कांठीं ऐपुर नामक क्षेत्रीं रहात असत. ग्रंथकार कल्याणद व मायिदेव ह्या दोन नांवांनीं प्रसिद्ध होता. हा ग्रंथकार थोर अधिकारी पुरुष असावा असें ह्याच्या ह्या कृतीवरून स्पष्ट दिसत आहे. षट्स्थलात्मक शिवसिद्धांतप्रतिपादन हा ह्या ग्रंथाचा मुख्य विषय आहे. ह्यासंबंधीं माहिती ग्रंथकारानें प्रथमाधिकरणाच्या २५–३३ श्लोकांत दिली आहे. अद्वैतमतांत वासुदेवमनन, पंचदशी वगैरे जसे अद्वैतज्ञानप्रतिपादक सर्वोत्तम ग्रंथ आहेत त्याच तोडीचा हा शक्तिविशिष्टशिवाद्वैतप्रतिपादक अनुभवसूत्र ग्रंथ आहे. षट्स्थलें व लिंगांगसामरस्य ह्या अत्यंत महत्वाच्या दोन विषयांचें सामान्य वाचकांस सहज

---

*हें शिवसायुज्य देणारें व शिवाद्वैतप्रतिपादक ( शक्तिविशिष्टशिवाद्वैतप्रतिपादक ) वीरशैवसिद्धांतशास्त्रभूत अनुभवसूत्र जो जाणितो तो श्रेष्ठ मनुष्य अज्ञानांतून मुक्त होतो. —( अनुभवसूत्र. )

ज्ञान व्हावें ह्मणून, वे. जगदीशशास्त्री नालवार व वे. शा. सं. बाळकृष्णशास्त्री ह्यांनीं फार श्रमपूर्वक तयार करून दिलेले "स्थलादर्शपट व लिंगांगसामरस्य-स्वभावदर्शकपट" असे दोन पट जोडिले आहेत ते वाचकांनीं अवश्य मनन करण्यासारिखे आहेत.

मूळ ग्रंथाचें मराठी भाषांतर नैय्यायिकशिरोभूषण वे. शा. सं. दादाचार्य शास्त्री ह्यांनीं केलें तें वे. जगदीशशास्त्री नालवार व वे. शा. सं. बाळकृष्ण शास्त्री पेंढरकर ह्यांनीं श्रमपूर्वक शुद्ध करून दिलें व प्रुफेंहि लक्षपूर्वक तपाशिलीं ह्याबद्दल त्यांचे आह्मीं फार आभारी आहों.

**प्रसिद्धिकर्ता.**

---

## विनंति.

निजगुणाराध्यकृत १ अनुभवसार, २ परमार्थगीता, ३ परमार्थप्रकाशिका, ४ कैवल्यपद्धति, ५ परमानुभवबोध, ६ पुरातनत्रिविडी हे सहा ग्रन्थ; तसेंच बसवेश्वरपुराण; बसवेश्वरवचन; प्रभुदेवपुराण; प्रभुदेववचन; चन्नबसवेश्वरपुराण; चन्नबसवेश्वरवचन; माचिदेवपुराण; माचिदेववचन; सिद्धरामेश्वरपुराण; सिद्धरामेश्वरवचन; त्याचप्रमाणें प्रमथांचीं पुराणें किंवा वचनें हीं, हल्लीं आह्मीं छापिलेल्या निजगुणराध्यकृत विवेकचिंतामणीप्रमाणेंच छापण्याची आमची इच्छा आहे. करितां हे मराठी ओवीबद्ध ग्रन्थ; तसेंच उपयुक्त अशा वीरशैवलिंगिब्राह्मणांच्या संस्कृत धर्मग्रन्थांपैकीं कोणत्याहि पूर्ण अगर अपूर्ण ग्रन्थाच्या हस्तलिखित प्रती कोणाच्या संग्रहीं असल्यास त्यांनीं त्या आह्मांकडे अगर रावसाहेब मल्लप्पा बसप्पा वारद सोलापूर ह्यांजकडे, आपली मूळप्रत छापून झाल्यानंतर आपणांस परत मिळण्याची इच्छेनुसार योग्य खात्री पटवून घेऊन, पाठविण्याची मेहेरबानी करावी; ह्मणजे त्यांसहि धर्मोन्नतीच्या कामीं हातभार लाविल्याचें श्रेय मिळेल. अशा रीतीनें मूळप्रत पाठविणारांकडे त्यांच्या मूळप्रतीसह दोन छापील प्रती पाठविण्यांत येतील.

**प्रसिद्धिकर्ता.**

---

# विषयानुक्रमणिका.


विषय. पृष्ठ.

## अधिकरण १

मंगलाचरण. ... ... ... ... ... ... १

कविवंशकथन. ... ... ... ... ... ... २

प्रस्तुत ग्रन्थ स्वकपोलकल्पित नसून ह्यास शिवागमाचा आधार आहे ह्याविषयीं. ... ... ... ... ४

ग्रन्थाच्या अष्टाधिकरणांतील विषयानुक्रम... ... ... ५

## अधिकरण २

स्थल शब्दाचा सोपपत्तिक अर्थविचार. ... ... ... ६

स्थलाचे दोन प्रकार व स्वरूप. ... ... ... ... ६

शक्तीचे दोन प्रकार. ... ... ... ... ... ७

कला व भक्ति ह्यांचें स्वरूप. ... ... ... ... ८

## अधिकरण ३

लिंगशब्दाची व्युत्पत्ति व अर्थविचार. ... ... ... १०

लिंगस्थलाचे भावलिंग, प्राणलिंग, इष्टलिंग, असे तीन प्रकार व त्यांचें स्वरूप. ... ... ... ... ... १०

पूर्वोक्त तीन लिंगांचीं प्रत्येकीं दोन प्रमाणें झालेलीं षट्स्थलें ह्याविषयीं ... ... ... ... ... ... ११

चिच्छक्तीपासून–शान्त्यतीतोत्तरा; पराशक्तीपासून–शान्त्यतीता; आदिशक्तीपासून–शान्ति; इच्छाशक्तीपासून–विद्या; ज्ञानशक्तीपासून–प्रतिष्ठा; क्रियाशक्तीपासून–निवृत्ति अशा सहा कला सहा शक्तींपासून उत्पन्न झाल्या. ... ... १२

सहा शक्तींचीं नांवें. ... ... ... ... ... १२

आद्य शिवतत्त्व महालिंगादि सहा स्थलांनीं सहा प्रकारचें झालें त्या सहा लिंगस्थलांचीं लक्षणें. ... ... ... ... १२


Indira Gandhi National Centre for the Arts

## अधिकरण ४


अंगशब्दाची व्युत्पत्ति. ... ... ... ... ... १५

अंगस्थलाचे योगांगादि तीन प्रकार. ... ... ... १५

त्या योगांगादि तीन प्रकारांचें नामार्थनिरूपण. ... ... १५

त्या तीन अंगांचीं सूक्ष्म, कारण, स्थूल अशीं तीन शरीरें व सुषुप्ति, स्वप्न, जागरण, अशा तीन अवस्था ह्यांविषयीं क्रमशः निरूपण. ... ... ... ... ... १५

योगांगास–प्राज्ञ; भोगांगास–तैजस; त्यागांगास--विश्व; अशा संज्ञा सांगून त्यांचें क्रमशः निपरूण करितात ... ... १६

त्या पूर्वोक्त तीन अंगांचीं प्रत्येकीं दोन प्रमाणें झालेलीं सहा अंगस्थलें. ... ... ... ... ... ... १६

त्या पूर्वोक्त सहा अंगस्थलांचीं कारणादि तीन शरीरें. ... १६

जीवाचे तीन प्रकार व प्रत्येकाचें ऐक्यशरणादि स्थलप्रकारें स्वरूपकथन. ... ... ... ... ... १६

भक्तिवैचित्र्यानें झालेले अंगस्थलाचे सहा प्रकार. ... ... १६

भक्तीचे सहा भेद व त्यांचीं नांवें. ... ... ... १७

तत्तद्भक्तिविशिष्ट ऐक्यादि सहा स्थलांचीं लक्षणें व ह्यांचें क्रमशः निरूपण. ... ... ... ... ... १७

ऐक्यादि भक्तपर्यंत झालेल्या सहा स्थलांचीं आत्माकाशादि सहा अंगें ह्यांविषयीं वर्णन. ... ... ... १९

ऐक्य, शरण, प्राणलिंगि हीं तीन स्थलें ज्ञानात्मक आहेत व प्रसादि, महेश, भक्त हीं तीन क्रियात्मक आहेत ह्यांविषयीं १९


## अधिकरण ५


लिंगांगसंयोग ह्या पदाचा अर्थ. ... ... ... ... २१

लिंगस्थल शक्तीमुळें जसें अनेक प्रकारचें झालें तसेंच अंगस्थलहि भक्तीमुळें अनेक प्रकारचें झालें ह्याविषयीं ... २१

शिव स्वतंत्र असल्यामुळें शक्तिसहवर्तमान उपास्य ह्मणून जें जें स्वरूप धारण करितो तदनुसार जीव अस्वतंत्र असल्यामुळें उपासकरूप धारण करितो ह्याविषयीं ... २२

गुरुलक्षण ... ... ... ... ... ... २२
अज्ञाननाशक व मुक्तिदायक असा उपदेश घेण्याकरितां शिष्याचें गुरूकडे गमन ... ... ... .. २२
आत्मस्वरूपाविषयीं अज्ञान असलेल्या शिष्याचा आत्मस्वरूपज्ञानाविषयीं गुरूस प्रश्न ... ... ... ... २३
शिष्यास गुरूनें लिंगांगसामरस्याचा उपदेश करणें ... २३
शिष्यास गुरूनें दीक्षा देणें; त्या दीक्षेचें लक्षण; त्या दीक्षेचे प्रकार; व त्यांचीं लक्षणें ... ... ... ... २४
गुरु वेधादीक्षेनें भोगांगाशीं भावलिंगसंयोग; मंत्रदीक्षेनें भोगांगाशीं प्राणलिंगसंयोग; क्रियादीक्षेनें त्यागांगाशीं इष्टलिंगसंयोग करितो ह्याविषयीं ... ... ... ... २६
लिंगत्रयाच्या उपासनेचा प्रकार ... ... ... ... २७
परंपरासंबंधानें उपासनाच परमपद ( मुक्ति ) आहे ... २७
जीव, शिव, व भक्ति ह्यांचा क्षेत्र, बीज व बीजी (बीज पेरणारा) ह्याप्रमाणें नित्य संबंध आहे ... ... ... ... २८
साधक जीवास भक्तादिषट्स्थलप्राप्ति क्रमशः कशी होते ह्याविषयीं ... ... ... ... ... ... २८
सहा लिंगस्थलांचीं व सहा अंगस्थलांचीं नांवें ... ... २९

## अधिकरण ६

ज्ञानेंद्रियांत महालिंगादिषट्स्थलांचें अस्तित्व ... ... ३१
शब्द व वचन ह्यांमध्यें अत्यंत भेद नसल्यामुळें धर्मैक्यानें आकाश व श्रोत्र ह्यांत जसा भेद नाहीं त्याप्रमाणें नेत्रादिज्ञानेंद्रियांत व पादादि कर्मेंद्रियांत धर्मैक्यामुळें भेद नाहीं ३१
ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें व त्यांचे विषय ह्यांच्या अधिदेवता ... ३२
सर्व इंद्रियांस लिंगमुखत्व असल्याबद्दल निरूपण ... ... ३३
भक्तादि सहा अंगस्थलांत चित्तादि हस्तांची उत्पत्ति व त्यांचीं लक्षणें ह्याचें क्रमशः निरूपण ... ... ... ३३
भक्तादिस्थलांना भूम्याद्यंगें सांगून गुरुलिंगापासून तों महालिंगापर्यंत प्रत्येक लिंगाचें उपास्यलिंग कोणतें ह्याविषयीं वर्णन ... ... ... ... ... ... ३५

पंचाक्षरीविद्यासाहित्य ... ... ... ... ३५
शिवपंचाक्षरीमंत्र लिंगांगैक्यार्थपर आहे व शिवजीवैक्यार्थ-परहि आहे ह्याविषयीं ... ... ... ... ३५
पंचाक्षरीमंत्र आधारादि सहा चक्रांत आहे ह्याविषयीं ... ३५
पंचाक्षरीमंत्र आचारादिषड्लिंगस्वरूपी आहे ... ... ३६
पंचाक्षरीमंत्र शरीरांतील रक्तादिद्रव्यांत आहे ह्याविषयीं वर्णन ३६

## अधिकरण ७

शिवलिंगार्पणाचे दोन प्रकार ... ... ... ... ३७
क्रियार्पणाचें वर्णन ... ... ... ... ... ... ३७
समर्पण करण्यास योग्य अशीं तीन द्रव्यें ... ... ... ३८
प्रसादाचे तीन भेद ... ... ... ... ... ... ३९
ज्ञानार्पणाचें वर्णन ... ... ... ... ... ... ४०
अंगादि आठ स्थलें सांगून त्या आठ स्थलांपैकीं प्रत्येक स्थलांत षट्स्थलांचा संभव आहे असें प्रतिपादन करितात ... ४२
गायित्रीमंत्राचें लिंगैक्यपर अर्थप्रतिपादन ... ... ... ४४
पदार्थ, प्रसाद, समर्पण, ह्या तिन्हींचें शिवजीवैक्यपर अर्थ-प्रतिपादन ... ... ... ... ... ... ४४
ह्याप्रकारें जाणून कर्म करणाऱ्यास कर्मबंध नाहीं ह्याविषयीं दृष्टांतपूर्वक प्रतिपादन... ... ... ... ... ४५

## अधिकरण ८

प्राप्तकाम व नित्यसुखी अशा मनुष्याचे सर्व बाह्य आचार आपोआप नष्ट होतात ह्याविषयीं वर्णन ... ... ... ४७
लिंगांगैक्यज्ञान झालेल्या मनुष्यास बंध व मोक्ष ह्यांचा अभाव सांगतात ... ... ... ... ... ... ४८
मायारहित शिवमार्गांत ( शिवसिद्धांतांत ) अद्वैत भक्तीच प्रधान आहे असें सांगून त्या भक्तीचें स्वरूप सांगतात ... ४८
कर्मकांड, ज्ञानकांड, व भक्तिकांड ह्यांचीं लक्षणें उदाहरणपूर्वक सांगतात ... ... ... ... ... ... ४९

अद्वैत भक्तीनें शिवप्रसादाची प्राप्ति होते ... ... ... ५१
शिवप्रसाद ज्यांस लाभला आहे त्यांस सर्व जग आत्मवत् दिसतें ह्याविषयीं वर्णन ... ... ... ... ... ५१
अद्वैतभक्तीचाच आश्रय करावा असें प्रतिपादन करितात ... ५२
अद्वैतभक्त शिवयोग्यानें निष्कामबुद्धीनें केलेल्या कर्मांनीं ऐहिक किंवा पारलौकिक सुख संभवत नाहीं ह्याविषयीं उदाहरणपूर्वक कथन ... ... ... ... ... ५३
शक्तिविशिष्टाद्वैतमतांतील नवीन मतानें स्वीकृत केलेलें मुक्तिस्वरूप ... ... ... ... ... ... ५६
भक्तिवर्णन ... ... ... ... ... ... ... ५६
भक्तांचें स्वरूपकथन ... ... ... ... ... ५६
ह्या ग्रन्थाच्या ज्ञानास कोण अधिकारी आहे व कोण नाहीं ह्याविषयीं प्रतिपादन ... ... ... ... ... ५६
अनुभवसूत्राचें ज्ञान ज्यास झालें आहे त्याचें अविद्यारूप अज्ञान नष्ट होतें ह्याविषयीं कथन ... ... ... ... ५८

Indira Gandhi National Centre for the Arts

## अनुभवसूत्र संस्कृतशुद्धिपत्रिका.

| पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३ | ४ | कलेश्वाह्य | कलेश्वराऽह्य |
| ४ | १२ | तंत्रोत्तर प्रदीपाख्यं | तंत्रोत्तरप्रदीपाख्यं |
| ८ | ५ | का चित्का चिदंग- | काचित्काचिदंग- |
| ९ | ३ | वृध्य | वृध्द्य |
| १८ | ८ | समर्ष्य | समर्प्य |
| १९ | ३ | समुत्पति | समुत्पत्ति |
| २४ | ८ | विद्वभिः | विद्वद्भिः |
| २५ | १० | तैलमिवााभाति | तैलमिवाभाति |
| २८ | ८ | निजविष्ठया | निजनिष्ठया |
| ३१ | ५ | लिंगतत्परै | लिंगतत्परैः |
| ३२ | १२ | स्पर्शमादानयो | स्पर्शनादानयो |
| ५२ | ८ | तथा द्वैत | तथाऽद्वैत |

## अनुभवसूत्र मराठी शुद्धिपत्रिका.

| पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | ११ | षडध्वशुद्धिः | षडध्वशुद्धि |
| १ | १७ | कले | केले |
| २७ | १५ | कारणशरीर | (कारण शरीरांत) |

ॐ

# अथानुभवसूत्रम्

## प्रथमाधिकरणे पारंपर्यक्रमः

श्रीगणेशाय नमः ॥ जयति षडध्वविशुद्धिर्जयति श्रीमत्षडक्षरी विद्या ॥ जयति षडंगसुभक्तिर्जयति स्वत एव षट्स्थलब्रह्म ॥ १ ॥ अवाच्यात्मस्वरूपाय शिवभावप्रदायिने ॥ नमस्सद्गुरुनाथाय षट्स्थलब्रह्ममूर्तये ॥२॥ नमश्शिवाय स्वयमात्तनाम्ने स्वभावसंसिद्धमहामहिम्ने ॥ स्वलीनषट्त्रिंशदखंडधाम्ने स्वमायया कल्पितभूतभूम्ने ॥३॥ नमश्शिवायै शिववल्लभायै शिवानुभूतिप्रतिभाकलायै ॥ शिवप्रसादामलविग्रहायै शिवप्रदायै भवतादुमायै ॥४॥ यस्या मात्रात्रयं नाम व्यत्यस्तप्रण-

---

## परंपराक्रम नांवाचें पहिलें अधिकरण.

श्रीगणेशाय नमः (१) षडध्वशुद्धिः[1] षडक्षरविद्या, ( ॐ नमःशिवाय हा षडक्षरमंत्र ), षडंगभक्ति[2] आणि षट्स्थलस्वरूपी ब्रह्म[3] हीं चार प्रमेयें वीरशैव सिद्धांतामध्यें मुख्य आहेत. (२) ज्याचें स्वरूप दुसऱ्याला सांगतां येत नाहीं; जो भक्ताला शिवस्वरूप देतो (मुक्ति देतो.); जो षट्स्थलब्रह्मस्वरूपी आहे त्या सद्गुरुनाथाला माझा नमस्कार असो. (३) ज्यानें स्वतः शिव हें नांव धारण केलें आहे, ज्याचा महिमा स्वभावसिद्ध आहे, छत्तीस तत्वें लीन होत असल्यामुळें ज्याचें तेज अखंड आहे व ज्यानें आपल्या मायेनें पुष्कळ प्राणी उत्पन्न कले आहेत, त्या सर्वोत्तम शिवाला माझा नमस्कार असो. (४) जी पार्वती शिवाला प्रिय असून जी शिवाच्या अनुभवात्मक ज्ञानाची कला आहे, शिवाच्या प्रसादानें जिला निर्दोष शरीर मिळालें आहे त्या लोककल्याण करणाऱ्या उमादेवीला माझा नमस्कार असो. (५) ॐकार हा शब्द अकार, उकार, व मकार असा त्रिमात्रक आहे व उमा हें नाम उकार, मकार व आकार यांनीं युक्त असून तें पूर्वोक्त

---

१ वर्णाध्व, पदाध्व, भुवनाध्व, मंत्राध्व, कलाध्व, तत्वाध्व. २ समरसभक्ति, आनंदभक्ति, अनुभवभक्ति, अवधानभक्ति, निष्ठाभक्ति, व सद्भावभक्ति.

३ भक्तस्थल, महेशस्थल, प्रसादिस्थल, प्राणलिंगिस्थल, शरणस्थल, ऐक्यस्थल, हीं सहा स्थलें; एतत्स्वरूपी ब्रह्मास षट्स्थलब्रह्म असें ह्मणतात.

वात्मकं॥ बभौ ऱ्हस्वद्वयं दीर्घं द्विमात्रत्वादुमैव सा ॥५॥ तयोमया सार्धमुपासितत्वाच्छिवः सदानंदचिदात्मसंज्ञः ॥ प्रशस्यते सोम इति प्रतीत्या तमैपु राधीश्वरमानतोस्मि ॥६॥ एकाक्षराभिधेयोऽभूदैकारेणेश्वरः स्वयं॥ यत्पुरं वपुरैश्वर्यं परं धाम तदैपुरं ॥७॥ मलप्रहारिणी नाम गंगा त्रिमलनाशिनी ॥ त्रिदीक्षापथगा तीर्थं तत्तीरं क्षेत्रमैपुरी॥८॥ तामैपुरीमहं वंदे भवपाशनिकृंतनीं ॥ यस्यां संनिहितः प्रीत्या सोमस्सोमार्धशेखरः॥९॥ विततविविधलोकव्यापिना स्वेन भासा रविशशिशिखिमुख्यान् भासयन् ज्योतिराख्यान् ॥ वसति विमलविद्याजन्मवासे निवासे जयति स खलु योऽसावैपुरीसोमनाथः ॥१०॥ तस्य प्रसादेन तपोबलेन ज्ञानक्रियाचारसमन्वयेन ॥ विष्णोः स्वयं देशिक एव जातः साक्षाच्छिवात्मादिगुरूपमन्युः ॥११॥ उपमन्युशिवाचार्यनामतः श्रीमदैपुरे ॥ जातः प्राथमिकः श्रीमानुपमन्युर्मुनीश्वरः ॥१२॥ यः स्वेच्छया ह्यैपुरसोमनाथपादारविंदप्रवणैकचेताः॥आविर्बभूवादिगुरूपमन्योः श्री

---

ॐकारांतील तीन मात्रांचा व्यत्यास होऊन व ऱ्हस्वद्वयास दीर्घत्व येऊन झालें आहे. (६) भक्तलोक सच्चिदानंदस्वरूपी शिवाची उमेसह उपासना करितात ह्मणून त्यास सोम असें ह्मणतात. त्या ऐपुराधीश सोमाला माझा नमस्कार असो. (७) ऐपुरक्षेत्राची व्युत्पत्ति अशी आहे कीं, 'ऐ' हें अक्षर ईश्वरवाचक आहे व जें नगर ईश्वरसंबंधी शरीर आहे तें ऐपुर होय. अतएव हें ऐपुर परमक्षेत्र आहे. (८) आणव, माया व कार्मिक, ह्या तीन मलांचा नाश करणारी मलप्रहारिणी या नांवाची गंगा आहे. ती दीक्षारूप तीन मार्गांनीं वाहत आहे. त्या गंगेच्या तीरीं हें ऐपुरक्षेत्र आहे. (९) जिच्यामध्यें साक्षात् परमेश्वर सोमनाथ मस्तकावर अर्धचंद्र धारण करून प्रीतीनें राहिला आहे. त्या संसारपाशाला तोडणाऱ्या ऐपुरीला मी नमस्कार करितो. (१०) जो सोमनाथ अनेक प्रसिद्ध लोकांना व्यापणाऱ्या आपल्या तेजानें सूर्य चंद्र अग्नि वगैरे ज्योतींना देखील प्रकाश आणतो व जो विद्येचें उत्पत्तिस्थानच अशा ऐपुरक्षेत्रामध्यें राहतो तो ऐपुरस्थ सोमनाथ सर्वोत्कृष्ट आहे. (११) प्रत्यक्ष शिवस्वरूप असा आदिगुरु उपमन्यु, हा त्या सोमनाथाच्या प्रसादानें, तपाच्या सामर्थ्यानें आणि ज्ञान, क्रिया व आचार ह्यांनीं प्रत्यक्ष विष्णूचा गुरु झाला. (१२) तो मुनिश्रेष्ठ श्रीमान् उपमन्यु, ऐपुरामध्यें उपमन्यु शिवाचार्य या नांवानें जन्मला. (१३) स्वभावानेंच सोमनाथाच्या चरणकमलीं बळकट भक्ति

भीमनाथप्रभुरार्यवेद्यः ॥१३॥ तस्य प्रभोरुदभवत्करुणाबलेन विद्यावि-
लासविभवाकृतिपात्रगात्रः ॥ आचार्यलक्षणपरिस्फुटसच्चरित्रः श्रीम-
न्महागुरुकलेश्वरनामधेयः ॥ १४ ॥ आचार्यस्य कलेश्वराह्वयमहादेवस्य
सूनुर्महान् श्रौतस्मार्तसमागमप्रथितनिष्ठैकप्रतिष्ठापरः॥ शैवाद्वैतशिरो-
व्रतांगसमयाचारक्रियादेशिकस्साक्षाद्पुरमंदिरः परगुरुः श्रीबोप्पना-
थः प्रभुः ॥१५॥ श्रीमद्देशिकबोप्पनाथपरमेशानात्मजस्सद्गुरुः श्रीसोमे-
श्वरलिंगभक्तियजनध्यानैकनिष्ठापरः॥ श्रीवीरव्रतसत्यधर्मनियमश्रद्धा-
दिरूढक्रियः श्रीशैवोत्तरतत्त्वयोगरसिकः श्रीनाकराजप्रभुः ॥१६॥ श्री-
नाकराजपरमेश्वरदेशिकेंद्रकारुण्यबन्धुरकटाक्षनिरीक्षणेन ॥ जातशि-
वैकगतमानसचारुचेष्टः श्रीसंगमेश्वरमहाप्रभुरार्यवर्यः ॥ १७ ॥ एतस्य
संगमेशार्यवर्यस्यायं तनूभवः॥ नाम्ना कल्याणदः श्रीमान्मायिदेव इति
स्थितः ॥१८॥ माहेशानां स्वभक्तानां कल्याणपदकांक्षिणां॥ ददाति नि-
त्यकल्याणं तेन कल्याणदः श्रुतः ॥ १९ ॥ मायया कथ्यते मायी मायी

---

करणारा, श्रेष्ठमान्य श्रीभीमनाथप्रभु उपमन्युशिवाचार्यापासून झाला. (१४) त्या भीमनाथप्रभूला शिवकृपेनें श्रीमन्महागुरु कलेश्वर नांवाचा मुलगा उत्पन्न झाला; तो शरीरानें विद्या, विलास व वैभव यांस योग्य होता व त्याच्या आचरणांत आचार्यत्वाचीं लक्षणें स्पष्ट दिसत होतीं. (१५) कलेश्वरगुरूपासून श्रीबोप्पनाथगुरु जन्मला. तो श्रौत व स्मार्त या धर्मांमध्यें आपण स्वतः निष्ठा ठेवून लोकांमध्यें त्याची स्थापना करिता झाला. शैवाद्वैतरहस्य, शैवव्रतें, शैवसमय ( शैवसिद्धान्त ) शैवाचार, शैवक्रिया ह्यांचा त्यानें लोकांस उपदेश केला व तो ऐपुरांत राहत असे. (१६) साक्षात् शिवस्वरूपी बोप्पनाथ गुरूला नाकराज नांवाचा पुत्र झाला. त्या नाकराज गुरूनें श्रीसोमेश्वरसंबंधी भक्ति, पूजा, ध्यान, ह्यांवर निष्ठा ठेवून व वीरशैवांचीं व्रतें, सत्यधर्म, नियम ह्यांचें विश्वासपुरःसर आचरण करून; तो शैवमताच्या उत्तर आगमांत सांगितलेल्या तत्त्वानुसार योगाचरण करूं लागला. (१७) परमगुरु नाकराजाच्या करुणादृष्टीनें सद्गुरुनाथ आर्यश्रेष्ठ संगमेश्वरप्रभु जन्मला. तो कायावाचामनानें शिवाचीच उपासना करीत असे. (१८) या संगमेश्वरगुरूपासून कल्याणद नांवाचा पुत्र झाला, पुढें तो लोकांत मायिदेव नांवानें प्रसिद्ध झाला.(१९) दोन नांवें पडण्याचें कारण सांगतात. आपल्या मुमुक्षु माहेश्वरभक्तांचें तो नेहमीं कल्याण करीत असल्यामुळें लोक त्यास कल्याणद असें ह्मणूं लागले. (२०)विष्णु

विष्णुरिति स्मृतः ॥ मायिनो यः परो देवो मायिदेवस्स उच्यते ॥२०॥ तस्मात्कल्याणदः श्रीमान् मायिदेवश्शिवः स्वयं ॥ तस्यास्य परमेशस्य नामांकोयं शिवात्मकः ॥२१॥ सत्यशुद्धशिवाद्वैतविद्यातंत्रस्वतंत्रधीः ॥ कल्याणदाह्वयः श्रीमान्मायिदेवमहाप्रभुः ॥ २२ ॥ जयति परमशैवः स्वात्मविद्याधिदैवः कुमतमतविभेदी षट्स्थलब्रह्मवादी ॥ गुरुपदनिजभक्तः केवलोऽनादिमुक्तः सुचरितशिववर्त्मा मायिदेवो महात्मा ॥२३॥ अयं शिवाद्वैतपरो महात्मा परंपरापावनसंप्रदायः ॥ शिवेन देव्यै कथितं रहस्यं ततान यत्षट्स्थलनिर्णयं तत् ॥२४॥ कामिकाद्या वातुलांताश्शिवेनोक्ताश्शिवागमाः ॥ तेषु वातुलसंज्ञोऽयं सर्वोत्कृष्टो महागमः ॥ २५ ॥ वातुलाख्ये महातंत्रे पूर्वोत्तरविभेदतः ॥ भागद्वयं समाख्यातं तस्मिन्नुत्तरनामनि॥२६॥तंत्रोत्तर प्रदीपाख्यं शिवसिद्धांततंत्रकं॥ अस्ति तत्राह देवेशो देव्यै षट्स्थलनिर्णयं ॥२७॥ श्रुतिस्मृतीतिहासैश्च शिवधर्मादिशास्त्रकैः ॥ कथ्यते शिवसिद्धांततंत्रं षट्स्थलनिर्णयं ॥२८॥ शिवागमैः शिवाद्वैतरहस्यैः पारमार्थिकैः ॥ कथ्यते शिवसिद्धांततंत्रं षट्-

---

हा मायास्वरूपी असल्यामुळें मायी ह्मणवितो. कल्याणद हा त्या मायीहून श्रेष्ठ देव असल्यामुळें त्याला मायिदेव असें ह्मणतात. (२१) त्याकरितां तो कल्याणद मायिदेव साक्षात् शिवच होता ह्मणून त्या श्रेष्ठ मायिदेवाचें हें नांव शिवात्मक आहे. (२२) सत्य व शुद्ध जो शिव त्या शिवाशीं जीवाला अभेद प्रतिपादन करणाऱ्या वीरशैव सिद्धांतामध्यें ह्या कल्याणद नांवाच्या श्रीमान् मायिदेव प्रभूची बुद्धि अकुंठित होती. (२३) तो महात्मा मायिदेव परमशैव असून आत्मविद्यानिपुण होता; त्यानें दुसऱ्या कुत्सित मतांचें खंडन केलें व षट्स्थलस्वरूपी ब्रह्माचा उपदेश केला; गुरुचरणीं दृढभाव ठेवून तो समस्त संसारांतून मुक्त झाला; व तो वीरशैवधर्म नित्य पाळीत असे. (२४) तो मायिदेव शिवाद्वैतविद्येंत तत्पर असून शिष्यपरंपरेला पावन करण्यांत सांप्रदायी होता व त्यानें, शिवानें पार्वतीला सांगितलेलें रहस्यच षट्स्थल ह्या नांवानें लोकांत प्रसिद्ध केलें. (२५) कामिकापासून वातुलापर्यंत अठ्ठावीस आगम शिवानें सांगितलेले आहेत. त्या आगमांमध्यें वातुल हा सर्वोत्कृष्ट आगम आहे. (२६) वातुलागमाचे पूर्वभाग व उत्तरभाग असे दोन भाग आहेत. त्यांपैकीं उत्तरभागामध्यें (२७) तंत्रोत्तरप्रदीप या नांवाचें शिवसिद्धांतशास्त्र आहे. त्या तंत्रामध्यें महादेवानें पार्वतीला षट्स्थलाचा निर्णय सांगितला आहे. (२८–३३) श्रुति, स्मृति, इतिहास, शिवागम, वगैरे शास्त्रांनीं सांगि-

स्थलनिर्णयं ॥ २९ ॥ सर्वैरुपनिषद्वाक्यैः पुराणैरुत्तरार्धकैः ॥ कथ्यते शिवसिद्धांततंत्रं षट्स्थलनिर्णयं ॥३०॥ गीतासारैस्समस्तैश्च पुरातनमहामतैः ॥ कथ्यते शिवसिद्धांततंत्रं षट्स्थलनिर्णयं ॥३१॥ गुरूक्त्या स्वानुभूत्या च तर्कतश्च प्रमाणतः ॥ कथ्यते शिवसिद्धांततंत्रं षट्स्थलनिर्णयं ॥३२॥ एतेषामेव सर्वार्थसारमादाय सादरं ॥ शिवोक्तं शिवसिद्धांततंत्रं वक्ष्ये समासतः ॥ ३३ ॥ यैश्च कैश्चिदपि श्लोकैस्तत्प्रारब्धं समाप्यते ॥ तद्विवक्षा मया कार्या किमन्यैर्बहुविस्तरैः ॥३४॥ तत्र तावदिदं पूर्वं पारंपर्यक्रमाभिदं॥ स्थलनिर्देशसंज्ञं तु द्वितीयमत उच्यते॥३५॥ तृतीयमुच्यते साक्षाल्लिंगस्थलनिरूपणं॥ चतुर्थं कीर्त्यते तद्वदंगस्थलनिरूपणं॥३६॥ पंचमं चैव लिंगांगसंयोगविधिसंज्ञकं ॥ सर्वांगलिंगसाहित्यं षष्ठाधिकरणं भवेत् ॥३७॥ श्रीलिंगार्पणसद्भावसंज्ञं सप्तममिष्यते ॥ क्रियाविश्रांतिसंज्ञाधिकरणं चाष्टमं भवेत् ॥ ३८ ॥ एवमष्टाधिकरणं शिवसिद्धांततंत्रकं॥ एतद्यो वेद सोऽविद्याग्रंथिं विकिरति प्रभुः ॥ शिवसिद्धांतकं तन्त्रं शिवाद्वैतं शिवं पदं ॥३९॥

इत्यनुभवसूत्रे षट्स्थलनिर्णये पारंपर्यक्रमो नाम प्रथमाधिकरणं संपूर्णम् ॥

Indira Gandhi National Centre for the Arts

---

तलेलें; शिवाद्वैतरहस्य ज्यांत सांगितलेलें आहे असें; पारमार्थिक शिवागम ह्यांनीं प्रतिपादिलेलें; सर्व उपनिषदें व उत्तरार्ध पुराणें ह्यांत सांगितलेलें; गीतासार व सर्व प्राचीन धर्ममतें ह्यांनीं प्रतिपान केलेलें असें षट्स्थलात्मक शिवसिद्धान्तशास्त्र, वरील सर्व ग्रन्थांचें सार घेऊन गुरुभक्तीनें; स्वानुभवानें, तर्कप्रमाणानें मी आतां कथन करितों. (३४) थोड्याच श्लोकांनीं हा आरंभिलेला ग्रन्थ पूर्ण करावा अशी माझी इच्छा आहे. अनेक श्लोकांनीं विस्तार करण्याचें मला प्रयोजन नाहीं. (३५) पारंपर्यक्रम हें ह्या ग्रन्थाचें पहिलें अधिकरण आहे. स्थलनिर्देश हें दुसरें अधिकरण; (३६) लिंगस्थलनिरूपण हें तिसरें अधिकरण; अंगस्थलनिरूपण हें चौथें अधिकरण; (३७) लिंगांगसंयोगविधि हें पांचवें अधिकरण; सर्वांगलिंगसाहित्य हें सहावें अधिकरण; (३८) लिंगार्पणसद्भाव हें सातवें अधिकरण व क्रियाविश्रांति हें आठवें, अधिकरण. ( ३९ ) हें अष्टाधिकरणात्मक शास्त्र जो जाणतो तो समर्थ मनुष्य अज्ञानापासून मुक्त होतो. हें शिवसिद्धांतशास्त्र शिवाद्वैतप्रतिपादक व शुभपददायक आहे.

ह्याप्रमाणें अनुभवसूत्रांतील षट्स्थलनिर्णयांतील पारंपर्यक्रम नांवाचें प्रथमाधिकरण संपलें.

## द्वितीयाधिकरणे स्थलनिर्देशः

तदिदानीं प्रवक्ष्यामि स्थलनिर्देशमादितः ॥ यदुक्तं देवदेवेन रहस्यार्थं समासतः ॥१॥ एकमेव परं ब्रह्म सच्चिदानंदलक्षणं ॥ शिवतत्त्वं शिवाचार्याः स्थलमित्याहुरादरात् ॥२॥ सर्वेषां स्थानभूतत्वाल्लयभूतत्वतस्ततः ॥ तत्त्वानां महदादीनां स्थलमित्यभिधीयते ॥३॥ यत्रादौ स्थीयते विश्वं प्राकृतं पौरुषं यतः ॥ लीयते पुनरंते च स्थलं तत्प्रोच्यते ततः॥४॥स्थकारः स्थानवाची स्याल्लकारो लयवाचकः ॥ तयोः कारणभूतं यत्तदेव स्थलमुच्यते ॥५॥ अधिष्ठानं समस्तस्य स्थावरस्य चरस्य च ॥ जगतो यद्भवेत्तत्त्वं तद्धि वै स्थलमुच्यते ॥६॥ आधारं सर्वशक्तीनां ज्योतिषामखिलात्मनां ॥ यत्तत्त्वं भवति प्राज्ञैः स्थलं तत्परिगीयते ॥७॥ आलयः सर्वभूतानां लोकानां सर्वसंपदां ॥ यद्भवेत्परमं ब्रह्म स्थलं तत्प्राहुरक्षरं ॥८॥ परनिर्वाणनिष्ठानां यद्भवेत्परमं पदं ॥ तदाहुः स्थलमद्वैतं शिवज्ञानैकतत्पराः ॥९॥ स्वशक्तिक्षोभमात्रेण स्थलं तद्द्विविधं भ-

---

### स्थलनिर्देश नांवाचें दुसरें अधिकरण.

(१) श्रीमहादेवानें पार्वतीला सांगितलेला रहस्यार्थक (गुप्त) स्थलनिर्देश षट्स्थलनिरूपण करण्याच्या पूर्वीं मी आतां संक्षेपानें सांगतों. (२) अद्वितीय व ज्ञानानंदस्वरूपी परब्रह्म अशा शिवतत्वाला शिवाचार्य भक्तिपुरःसर स्थल असें ह्मणतात. (३) महत्, अहंकार वगैरे सर्व मूलतत्वें शिवरूपी परब्रह्मापासून उत्पन्न होऊन त्याच ठिकाणीं लय पावतात ह्मणून त्या शिवतत्वाला स्थल असें ह्मणतात. (४) प्रकृति व पुरुष ह्यांपासून झालेलें जग या शिवतत्वाच्या ठिकाणीं राहून पुनः अंतकालीं त्याच ठिकाणीं लय पावतें ह्मणून त्या शिवतत्वाला स्थल असें ह्मणतात. (५) 'स्थ' ह्मणजे स्थान 'ल' ह्मणजे लय हीं दोन्ही ज्यापासून संभवतात त्याला स्थल असें ह्मणतात. (६) स्थावरजंगमात्मक सकल जगताचें आधारभूत असलेलें शिवतत्वच स्थल होय. (७) सर्व शक्ति, सर्व ज्योति, व सर्व जीव ह्यांस आधारभूत असलेल्या शिवतत्वाला विद्वानांनीं स्थल असें ह्मटलें आहे. (८) जें परब्रह्मात्मक शिवतत्व सर्व प्राण्यांचें; सर्व संपदांचें; व सर्व लोकांचें आधारस्थान आहे त्यास अविनाशी स्थल असें ह्मणतात. (९) उत्तम मोक्षावर आसक्ति ठेवणाऱ्यांचें जें परमपद (उत्तम स्थान) आहे अशा त्या अद्वैत शिवतत्वाला शिवतत्व जाणणारे लोक स्थल असें ह्मणतात. (१०) परब्रह्मात्मक शिवतत्वाच्या ठिकाणीं असलेल्या माया-

वेत् ॥ एकं लिंगस्थलं प्रोक्तमन्यदंगस्थलं स्मृतं ॥१०॥ लिंगांगोपाधिभेदेन द्विधा भिन्नं परस्परं ॥ महान् घटप्रभेदेन यथाऽकाशः प्रतीयते॥११॥ प्रतीयते तथा चैव स्थलं लिंगांगभेदतः ॥ स्थलं नाम परं तत्त्वं शिवरुद्रादिसंज्ञकं ॥१२॥ उपास्योपासकत्वेन स्वयमेव द्विधा भवेत् ॥ लिंगस्थलमुपास्यं स्यादंगस्थलमुपासकं ॥१३॥ उपास्यत्वं तथोपासकत्वं च परमशिवः ॥ अप्रच्युतात्मभेदेन स्थितस्सन्नात्मलीलया ॥१४॥ स्वशक्त्या युगपत्साक्षात्प्राप्त एव स्वयं क्रमात् ॥ नाशिवस्य शिवोपास्तिर्घटते जन्मकोटिभिः ॥ १५ ॥ शिवस्यैव शिवोपास्तिरिति नानाश्रुतिस्थितिः ॥ चिन्मात्रं परमं साक्षात्स्थलं सत्यादिलक्षणं ॥ १६ ॥ लिंगांगत्वशिवात्मत्वभेदेनैव स्वयं स्थितं ॥ शिवत्वेनात्मरूपेण यथाचिन्मात्रमुच्यते ॥ १७ ॥ लिंगत्वेनांगरूपेण स्थलमात्रं तथोच्यते ॥ स्थलं चिन्मात्रमेव स्याल्लिंगं स्याच्छिव एव हि ॥१८॥ तथांगं जीव एव स्यादिति शैवी परा स्थितिः ॥ यथा स्थलं द्विधा भूतं तथा शक्तिर्द्विधा भ-

---

शक्तीचा क्षोभ ( चलनवलन ) झाल्यामुळें तें स्थल दोन प्रकारचें झालें; त्यांतील एकास लिंगस्थल व दुसऱ्यास अंगस्थल असें ह्मणतात. (११–१२) आकाश जसें उपाधिभेदानें घटाकाश, महाकाश, असें दोन प्रकारचें भासतें तसेंच तें शिवतत्वात्मकस्थल लिंग व अंग ह्या उपाधिद्वयानें लिंगस्थल व अंगस्थल असें दोन प्रकारचें झालें; त्या परतत्वात्मक शिवस्थलाला शिव, रुद्र, इत्यादि संज्ञा प्राप्त झाल्या आहेत. (१३) तें शिवतत्व उपास्य व उपासक ह्या भेदानें दोन प्रकारचें झालें. लिंगस्थलास उपास्य असें ह्मणतात व अंगस्थलास उपासक अशी संज्ञा आहे. (१४) तो परमशिवच उपास्य ( उपासना करून घेणारा ) व उपासक ( उपासना करणारा ) आहे. हा उपास्योपासक भेद त्या अविनाशी आत्म्याच्याच भेदानें व सहज लीलेनें उत्पन्न झाला आहे. (१५) हा पूर्वोक्त भेद आत्मशक्तीनेंच एकाएकीं क्रमशः प्राप्त झाला आहे. अशिव जीवाला कोट्यावधि जन्मांतहि शिवोपासना घडत नाहीं. (१६) शिवालाच शिवोपासना घडते ह्याविषयीं पुष्कळ श्रुति प्रमाण आहेत. तें पराशिवतत्वात्मक स्थल साक्षात् सच्चिदानंद लक्षणात्मक आहे.(१७) तें पूर्वोक्त स्थल लिंग, अंग, शिव, जीव, ह्या भेदांनीं चतुर्विध झालें आहे. जसें चैतन्य शिव व जीव ह्या भेदांनीं द्विधा झालें. (१८) तसें तें स्थल लिंग व अंग ह्या भेदांनीं दोन प्रकारचें झालें; स्थल चिन्मात्रक आहे व लिंग साक्षात् शिव आहे. (१९) जीव हा अंगस्थल आहे. ह्याप्रमाणें वीरशैव सिद्धान्ताची स्थिति आहे.

**वेत् ॥१९॥ शक्तिरप्रतिमा साक्षाच्छिवेन सह धर्मिणी ॥ साक्षिणी सत्यसंपूर्णा निर्विकल्पा महेश्वरी ॥२०॥ सा शक्तिर्द्विविधा भूता स्वस्वातन्त्र्यबलेन तु ॥ समानधर्मिणीत्वेन विभक्ता भक्तवत्सला ॥ २१ ॥ लिंगस्थलाश्रया का चित्का चिदंगस्थलाश्रया ॥ लिंगस्थलाश्रया शक्तिः कलारूपा प्रकीर्तिता ॥२२॥ अंगस्थलाश्रया शक्तिर्भक्तिरूपा भवापहा॥ यथा महानलज्वाला विभक्ता दीपिकाकृतिः ॥२३॥ तथा महेश्वरी शक्तिर्विभक्ता भक्तिरूपिणी ॥ ज्वाला तमस्विनी यस्माद्दीपिका सुप्रकाशिनी ॥ २४ ॥ तस्मात्सवासना शक्तिर्भक्तिर्निर्वासना मता ॥ भक्तिर्महत्तरा शुद्धा सुसूक्ष्मा शोभना परा ॥२५॥ सच्चिदानंदरूपा स्याद्भुक्तिमुक्तिफलप्रदा ॥ शक्तिरेव स्मृता भक्तिर्भक्तिरेव हि सा सदा ॥ २६ ॥ शक्तिभक्त्योर्न भेदोऽस्ति परमार्थनिरूपणे ॥ शक्तिः प्रवृत्तिराख्याता निवृत्तिर्भक्तिरीरिता ॥२७॥ शक्त्या प्रपंचसृष्टिः स्याद्भक्त्या तद्विलयो म-**

---

जसें स्थल लिंग व अंग ह्यांनीं दोन प्रकारचें झालें; त्याप्रमाणें शिवाची अद्वितीय शक्तिहि दोन प्रकारची झाली. (२०) ती अप्रतिम शक्ति शिवाची साक्षात् बायको असून ती सगळ्या कर्मांची साक्षीण असून सर्वव्यापी, विकल्परहित व महेश्वरी आहे. (२१) भक्तावर दया करणारी ती शक्ति शिवाची बायको असल्यामुळें आपल्या स्वतंत्रपणानेंच दोन प्रकारची झाली. (२२) त्या दोन शक्तींमध्यें एकीनें लिंगस्थलाचा आश्रय केला व दुसरीनें अंगस्थलाचा आश्रय केला; लिंगस्थलाश्रित शक्तीला कला असें ह्मणतात व (२३) अंगस्थलाचा आश्रय करून राहिलेल्या शक्तीस संसारनाशिनी भक्ति असें ह्मणतात. जशी विस्तवाची ज्वाला स्वभावतः एकच असून दिव्याच्या रूपानें भिन्न भासते (२४) तशीच मूल ईश्वरी शक्ति एक असूनहि भक्तिरूपानें भिन्न भासते. जसा जाळ धुराच्या संपर्कानें किंचित् काळा दिसतो, आणि दिवा स्वच्छ प्रकाश पाडणारा असतो; (२५) त्याप्रमाणें शक्ति वासनायुक्त असून भक्ति वासनारहित आहे. याकरितां भक्ति शक्तीपेक्षां मोठी, शुद्ध, मनोहर, उत्तम, व सूक्ष्म आहे. (२६) भक्ति सच्चिदानंदरूपी असल्यामुळें जीवाला सुखभोग व मुक्ति देणारी आहे. शक्तीच नित्य भक्ति आहे व भक्तीच शक्ति आहे. (२७) खरोखर पाहिलें असतां भक्ति व शक्ति ह्यांत भेदच नाहीं. शक्ति ह्मणजे प्रवृत्ति व भक्ति ह्मणजे निवृत्ति (२८) शक्तीपासून प्रपंचाची उत्पत्ति होते, व भक्तीपासून प्रपंचाचा लय होतो. शक्तिवैचित्र्यानें रूपरहित वस्तूलाहि

तः ॥ शक्तिवैचित्र्यतो रूपं नीरूपमपि याति हि ॥२८॥ भक्तिवैचित्र्यतो रूपमपि नीरूपतामियात् ॥ प्रपंचवृध्यपेक्षा हि शक्तेः स्वाभाविको गुणः ॥२९॥ प्रपंचसंक्षयापेक्षा भक्तेः स्वाभाविको गुणः ॥ अधोमुखी भवेच्छक्तिर्भक्तिरूर्ध्वमुखी भवेत् ॥३०॥ समाया शक्तिराख्याता निर्माया भक्तिरीरिता ॥ अपि तर्कप्रमाणाभ्यां शक्तेर्भक्तिर्गुणाधिका ॥३१॥ उपास्यत्वं भवेच्छक्त्या भक्त्योपासकता भवेत् ॥ तस्माल्लिंगस्थले शक्ति भक्तिरंगस्थले स्थिता ॥३२॥ लिंगस्थलं शिवस्साक्षाज्जीवात्माऽगस्थलं भवेत् ॥ लिंगांगस्थलयोरैक्यं शिवजीवैक्यमेव हि ॥ ३३ ॥ एतद्यो वेत्ति सोऽविद्याग्रंथिं विकिरति प्रभुः ॥ शिवसिद्धांतकं तन्त्वं शिवाद्वैतं शिवं पदं ॥ ३४ ॥

इत्यनुभवसूत्रे शिवसिद्धांततन्त्रे षट्स्थलनिर्णये स्थलनिर्णयो नाम द्वितीयाधिकरणं संपूर्णम् ॥ २ ॥

---

रूप प्राप्त होतें. (२९) भक्तिवैचित्र्यानें साकार वस्तूहि निराकार होते. जग वाढविण्याविषयीं इच्छा हा शक्तीचा स्वाभाविक गुण आहे. (३०) प्रपंचाचा लय करणें हा भक्तीचा सहज गुण. शक्तीचें मुख खालीं आहे व भक्तीचें मुख वर आहे. (३१) शक्ति मायामय असून भक्ति मायाविरहित आहे. याप्रमाणें तर्क व प्रमाण ह्यांनीं विचार केला असतां शक्तीपेक्षां भक्ति गुणानें श्रेष्ठ आहे. (३२) शक्तीनें उपास्यत्वाची प्राप्ति होते व भक्तीनें सेवकत्वाची प्राप्ति होते. याकरितां लिंगस्थलाच्या ठिकाणीं शक्ति राहिली व अंगस्थलाच्या ठिकाणीं भक्ति राहिली. (३३) साक्षात् शिवच लिंगस्थल आहे. व जीवात्मा अंगस्थल आहे. (३४) ह्मणून लिंगस्थल व अंगस्थल ह्यांच्या ऐक्यालाच शिवजीवांचें ऐक्य असें ह्मणतात. हें शिवाद्वैत प्रतिपादक व मोक्षपद देणारें शिवसिद्धान्तशास्त्र जो जाणतो तो समर्थ मनुष्य अज्ञानापासून मुक्त होतो.

ह्याप्रमाणें अनुभवसूत्राच्या शिवसिद्धान्ततंत्राच्या षट्स्थलनिर्णयांतील स्थलनिर्णयनांवाचें दुसरें अधिकरण संपलें.

शिवराम वैद्य एम० ए० रसायनशाला

# तृतीयाधिकरणे लिंगस्थलनिरूपणम्

इदानीमथ वक्ष्यामि लिंगस्थलनिरूपणं ॥ संक्षेपाद्विस्तरेणापि यथोक्तं शंभुना पुरा ॥ १ ॥ शिव एव स्वयं लिंगमिति लिंगस्य वैभवं ॥ नान्यच्चिन्हादिकं लिंगं तत्सर्वं कृतकं च यत् ॥ २ ॥ लीयते गम्यते यत्र येन सर्वं चराचरम् ॥ तदेतल्लिंगमित्युक्तं लिंगतत्त्वपरायणैः ॥३॥ लयगत्यर्थयोर्हेतुभूतत्वात्सर्वदेहिनां ॥ लिंगमित्युच्यते साक्षाच्छिवस्सकलनिष्कलः ॥४॥ लिंगस्थलं त्रिधा ज्ञेयं तद्भेदो वर्ण्यते क्रमात् ॥ प्रथमं भावलिंगं स्याद्द्वितीयं प्राणलिंगकं ॥५॥ तृतीयमिष्टलिंगं स्यादित्येतत्त्रिविधं स्मृतं ॥ निष्कलं भावलिंगं स्याद्भावग्राह्यं परात्परं ॥६॥ सन्मात्रं भावलिंगं स्यादिति निष्ठा महात्मनां ॥ प्राणलिंगं मनोग्राह्यं भवेत्सकल. निष्कलं ॥ ७॥ तत्प्राणेष्वंतर्मनसो लिंगमाह इति श्रुतिः ॥ सकलं दृक्लाग्राह्यमिष्टलिंगस्थलं महत् ॥८॥ इष्टावाप्तिकरं साक्षादनिष्टपरिहारकं ॥ इष्टिः पूजा तया नित्यमिष्टं पूजितमादरात् ॥९॥ इष्टलिंगमिति प्रोक्त-

---

## लिंगस्थल नांवाचें तिसरें अधिकरण.

(१) पूर्वी ईश्वरानें पार्वतीला सविस्तर लिंगस्थल निरूपण केलें तेंच मी आतां संक्षेपानें कथन करितों. (२) व्युत्पत्तिसामर्थ्यानें लिंग शब्द केवल शिववाची आहे. अन्यत्र सामान्य चिन्हादिकांस लिंगशब्द लावण्यांत येतो तो अव्युत्पन्न असून कृतक आहे. (३) सर्व स्थावर जंगमात्मक सृष्टीचा ज्यांत लय होतो व जेथून पुनः तिची उत्पत्ति होते त्या परशिवतत्त्वासच लिंगतत्त्वज्ञानी पुरुष लिंग असें ह्मणतात. (४) सर्व प्राण्यांच्या लयाला व गतीला शिवच कारण आहे ह्मणून शिवालाच लिंग असें ह्मटलें आहे. तो शिव कलासहित व कलारहित असा दोन्ही रूपांचा आहे. (५) लिंगस्थल तीन प्रकारचें आहे. ते तीन प्रकार क्रमशः सांगतों. पहिलें भावलिंग, दुसरें प्राणलिंग, (६) तिसरें इष्टलिंग. ह्याप्रमाणें लिंगस्थलाचे तीन भेद आहेत. भावलिंग कलारहित असून भावगोचर आहे व सर्वांमध्यें उत्तम आहे. (७) आणि तें भावलिंग सन्मात्र आहे. ( सत् ह्मणजे देशकालभेदानें अबाधित असणें ) असा ज्ञानी लोकांचा निश्चय आहे. प्राणलिंग सावयव व निरवयव असून मनोगोचर आहे. (८) तें प्राणलिंग प्राण व मन ह्यांमध्यें असतें असें श्रुतिप्रमाण आहे. इष्टलिंगस्थल कलायुक्त असून चक्षुरिंद्रियानें ग्रहण करण्यास योग्य आहे. (९) इष्टलिंग भक्तांचें दुःख परिहार करून इच्छित देणारें आहे. इष्टि ह्मणजे पूजा त्या पूजेनें नित्य भक्तीनें पूजिलें जातें ह्मणून (१०) लिंगपूजक आचा-

माचार्यैर्लिंगपूजकैः ॥ इष्टमर्थं स्वभक्तानामनुयच्छति सर्वदा ॥ १० ॥ तदिष्टलिंगमित्याह तस्मादाथर्वणी श्रुतिः ॥ सद्रूपं भावलिंगं स्याच्चिद्रूपं प्राणलिंगकं ॥११॥ आनंदरूपमाचार्यैरिष्टलिंगमुदाहृतं ॥ अस्यर्थो भावलिंगं स्यात्त्वमर्थः प्राणलिंगकं ॥ १२ ॥ तदर्थस्त्विष्टलिंगं स्यात्पदत्रयनिरूपणे ॥ भावलिंगं परं तत्त्वं प्राणलिंगं तु सूक्ष्मकं ॥१३॥ इष्टलिंगं भवेत्स्थूलमेतल्लिंगत्रयं स्मृतं ॥ स्थूलं बाह्यमिति प्रोक्तं सूक्ष्ममाभ्यंतरं स्मृतम् ॥१४॥ सबाह्याभ्यंतरं यत्तत्परमित्यभिधीयते ॥ देहप्राणात्मरूपेण क्रियामंत्रप्रयोगतः ॥१५॥ बिंदुनादकलाभेदाल्लिंगत्रयमुदाहृतं ॥ एकमेकं स्थलं भूयो द्विविधं द्विविधं भवेत् ॥१६॥ भावलिंगस्थलं द्वेधा प्राणलिंगस्थलं द्विधा ॥ इष्टलिंगस्थलं चैव द्विधा प्रोक्तं महात्मभिः॥१७॥ महालिंगं प्रसादाख्यं लिंगमित्युभयस्थलं ॥ भावलिंगं भवत्येव स्वानुभूतिप्रमाणतः ॥१८॥ तथा च चरलिंगं च शिवलिंगमिति द्वयं ॥ प्राण-

---

यांनीं त्यास इष्टलिंग असें ह्मटलें आहे. स्वभक्ताला नेहमीं इच्छितवस्तु देतें (११) ह्मणून त्या लिंगाला इष्टलिंग ह्मणावें. याप्रमाणें अथर्वणश्रुति सांगितली आहे. भावलिंग सद्रूप आहे; व प्राणलिंग चिद्रूप आहे; (१२–१३) इष्टलिंग आनंदरूप आहे; असें वीरशैवाचार्यांचें ह्मणणें आहे. 'तत्त्वमसि' ह्या महावाक्यामध्यें तत् , त्वं, असि, अशीं तीन पदें आहेत. त्यांमध्यें असि या पदाचा अर्थ भावलिंग आहे. त्वं पदाचा अर्थ प्राणलिंग आहे. आणि तत् या पदाचा अर्थ इष्टलिंग आहे. भावलिंग पर ( कारण ) तत्त्व आहे, प्राणलिंग सूक्ष्मतत्त्व आहे, (१४) व इष्टलिंग स्थूलतत्त्व आहे. ह्याप्रमाणें तिन्ही लिंगांचीं स्वरूपें आहेत. स्थूललिंग बाहेर असतें ह्मणून त्यास बाह्य असें ह्मणतात. सूक्ष्मलिंग आंत असतें ह्मणून तें आभ्यंतर असें ह्मटलें जातें. (१५) आंत व बाहेर असणारें जें भावलिंग तें परतत्त्व ( भावलिंग ) ह्मटलें जातें; इष्टलिंग देहलिंग आहे; प्राणलिंग प्राणाचें आहे; भावलिंग आत्म्याचें आहे. ह्याप्रमाणें इष्टलिंग क्रियारूप आहे. प्राणलिंग मंत्ररूप आहे. भावलिंग प्रयोगरूप आहे. (१६) ह्याप्रमाणें बिंदु, नाद, कला, ह्या उपाधित्रयानें हीं तीन लिंगें क्रमशः सांगितलीं आहेत. त्या प्रत्येक स्थलाचे दोन प्रकार आहेत. (१७) भावलिंगस्थल दोन प्रकारचें आहे. प्राणलिंगस्थल दोन प्रकारचें आहे. इष्टलिंगस्थल दोन प्रकारचें आहे. ह्याप्रमाणें विद्वानांनीं सांगितलें आहे. (१८) महालिंग व प्रसादलिंग असे भावलिंगाचे दोन भेद आहेत. ह्याविषयीं आपला अनुभवच प्रमाण आहे. (१९) चरलिंग व शिवलिंग असे प्राणलिंगाचे दोन भेद

लिंगं भवत्येव तात्पर्यार्थो न संशयः ॥१९॥ गुरुलिंगं तथाऽऽचारलिंगमित्युभयस्थलं ॥ इष्टलिंगं भवत्येव सत्यमुक्तमिदं मया ॥२०॥ महालिंगं प्रसादाख्यलिंगं च चरलिंगकं ॥ शिवलिंगं तथा चैव गुरुलिंगं ततः परं ॥ २१ ॥ आचारलिंगमित्येव लिंगं षड्विधमुच्यते ॥ एवं हि षड्विधं भूतं लिंगं परमकारणं ॥२२॥ स्वशक्तिवैभवाच्चैव स्वातंत्र्याल्लीलयाऽपि च ॥ शक्तयष्षाड्विधा ज्ञेयाष्षट्स्थलेषु समाहिताः ॥ २३ ॥ शक्तीनामधुना तासां सद्भावो वर्ण्यते क्रमात् ॥ शांत्यतीतोत्तरा नाम चिच्छक्तिरिति कीर्तिता ॥२४॥ शांत्यतीता परा शक्तिश्शांतिरेवादिसंज्ञिता ॥ इच्छाशक्तिश्च विद्या स्यात्प्रतिष्ठा ज्ञानरूपिणी ॥ २५ ॥ निवृत्तिः स्यात्क्रियाशक्तिरिति पर्यायसंगतिः ॥ चिच्छक्तिश्च पराशक्तिरादिशक्तिस्तथैव च ॥ २६ ॥ इच्छाज्ञानक्रियारूपाः शक्तयष्षाड्विधा मताः ॥ स्थलानां शक्तियुक्तानां षण्णामेषां पृथक्पृथक् ॥ स्वरूपलक्षणं चैव क्रमशो वर्ण्यतेऽधुना ॥२७॥ आद्यंतशून्यममलं परिपूर्णमेकं सूक्ष्मं परात्परमनामयमप्रमेयं॥ भावैकगम्यमजडं शिवतत्त्वमाद्युश्चिच्छक्तिसंस्फुरणरूपमहात्मलिंगं ॥२८॥ ज्योतिर्मयं निजमखंडमतींद्रियार्थं ज्ञानोपल-

---

आहेत हाच निःसंशय तात्पर्यार्थ आहे. (२०) गुरुलिंगस्थल व आचारलिंगस्थल असें इष्टलिंग दोन प्रकारचें आहे; असें मी सत्य सांगत आहें. (२१) महालिंग, प्रसादलिंग, चरलिंग, शिवलिंग, गुरुलिंग, (२२) व आचारलिंग ह्याप्रमाणें हीं सहा लिंगें आहेत. हें सहा प्रकारचें लिंग मुख्य कारण आहे. (२३) शक्ति देखील आपल्या सामर्थ्यानें व क्रीडेनें स्वतंत्र असल्यामुळें सहा प्रकारची होऊन सहा स्थलांमध्यें राहिली आहे. (२४) कोणती शक्ति कोणत्या स्थलामध्यें राहिली आहे तो प्रकार क्रमानें मी सांगतों. शांत्यतीतोत्तरा नांवाच्या शक्तीला चिच्छक्ति असें ह्मणतात. (२५–२६) शांत्यतीता, शांति, इच्छा, प्रतिष्ठा व निवृत्ति ह्यांस अनुक्रमें पराशक्ति, आदिशक्ति, विद्याशक्ति, ज्ञानशक्ति, क्रियाशक्ति, अशीं पर्यायवाचक नामें आहेत. चिच्छक्ति, पराशक्ति, आदिशक्ति, (२७) इच्छाशक्ति, ज्ञानशक्ति, क्रियाशक्ति, ह्याप्रमाणें सहा शक्तींचे भेद आहेत. ह्याप्रमाणें सहा शक्तींनीं युक्त असलेल्या सहा स्थलांचीं स्वरूपलक्षणें वेगळीं वेगळीं क्रमानें आतां सांगतों. (२८) जन्ममरणरहित, निर्दोष, परिपूर्ण अद्वितीय, सूक्ष्म परात्पर भवरोगरहित, अगम्य, भावानें ( भक्तीनें ) समजण्यास योग्य चैतन्यरूप अशा शिवतत्त्वाला चिच्छक्तिस्फुरणयुक्त महालिंग असें ह्मणतात. (२९) ज्योतिरूप, नित्य, नाशरहित,

ध्यममृतं परिणामबीजं ॥ सादाख्यतत्त्वमुदितं परया स्वशक्त्या प्राहुः प्रसादघनलिंगमुपाधिहीनं ॥ २९ ॥ साभ्यंतरंगबहिरंगममूर्ततत्त्वं ज्योतिर्मयं पुरुषमक्षरतः पराख्यं ॥ स्वात्मादिशक्तिघटितं मनसैव नित्यं ध्यातव्यमात्तमतयश्चरलिंगमाहुः॥३०॥ विद्याकलाकलितरूपसुशोभमानं दिव्यप्रभापटलमेकमुखं प्रशांतं ॥ इच्छास्वशक्तिपरिजृंभितमूर्ततत्त्वं व्यक्ते ह्यहंकृतिपदे शिवलिंगमाहुः ॥३१॥ स्वज्ञानशक्तिविभवोत्थितकर्तृतत्त्वं सर्वोपदेशविधितंत्रकृतप्रतिष्ठं ॥ तेजोनिधिं परमपारसुखांबुराशिं बुद्धेः पदे विनिहितं गुरुलिंगमाहुः॥३२॥ कर्मात्मना सकलतत्त्वनिवासहेतोराधारभूतमचलं क्रियया स्वशक्त्या ॥ चित्तेन धार्यमधिरूढनिवृत्तिमार्गे ह्याचारलिंगमिति वेदविदो वदंति ॥३३॥ एवमेव स्वरूपं च लक्षणं परिकीर्तितं ॥ महालिंगस्थलादीनां षड्विधानां यथाक्रमं ॥३४॥ किंत्वेतेषां स्थलानां तु प्रादुर्भावः प्रदर्श्यते ॥ शिव एव स्वचिच्छक्त्या महालिंगस्थलं भवेत् ॥३५॥ तदुपासकरूपत्वादैक्यस्थलम-

---

इंद्रियें व विषय ह्यांस अगोचर, ज्ञानगम्य, मोक्षस्वरूप, प्रपंचास कारणरूप, आपल्या पराशक्तीनें उत्पन्न झालेलें सादाख्यतत्त्व ह्यास उपाधिरहित प्रसादघनलिंग असें ह्मणतात. (३०) अंतर्बाह्य स्फुरण पावणारें, ज्योतिरूप, पुरुषस्वरूप, प्रकृतितः पर असें नाम धारण करणारें, स्वात्म्याच्या आदिशक्तीनें युक्त, केवल मनानें ध्यान करितां येणारें, असें जें अमूर्ततत्त्व त्यास सत्यवादी चरलिंग असें ह्मणतात. (३१) ज्ञानकलायुक्त रूपानें अत्यंत शोभायमान, प्रकाशमय, एकमुखी, अत्यंत शांत, स्पष्ट अहंकारामध्यें वास्तव्य करणारें, इच्छाशक्तीनें पूर्ण, असें जें मूर्ततत्त्व त्यास शिवलिंग असें ह्मणतात. (३२) आपल्या ज्ञानशक्तीच्या वैभवानें उत्पन्न झालेलें, सर्व आत्मशास्त्रांत असणारें, तेजोमय, अत्यंत सुखदायक, बुद्धींत वास्तव्य करणारें, असें जें कर्तृतत्त्व त्यास गुरुलिंग असें ह्मणतात. (३३) आपल्या क्रियाशक्तीनें स्थिर असून सर्व तत्त्वांना राहतां यावें ह्मणून आधारभूत झालेलें, चित्तानें जाणिलें जाणारें, निवृत्तिमार्गी असलेलें, असें जें कर्मतत्त्व त्यास ज्ञानी लोक चरलिंग असें ह्मणतात. (३४) ह्याप्रमाणें महालिंगस्थलादि सहा प्रकारच्या लिंगस्थलांचें स्वरूप व लक्षण क्रमानें सांगितलें. (३५) आतां ह्या सहा स्थलांची उत्पत्ति कशी झाली ती सांगतों. साक्षात् शिवच चिच्छक्तियुक्त झाला असतां महालिंगस्थल होतो. (३६) तें महालिंगस्थल उपासकरूपी असल्यामुळें मोठें ऐक्यस्थल झालें. त्या श्रेष्ठ महालिंगस्थ-

भून्महत् ॥ स्फुरणाद्वै पराशक्तेर्महालिंगस्थले परे ॥३६॥ प्रसादलिंगसंज्ञं तु प्रादुरासीन्महास्थलं ॥ तदुपासकरूपत्वाच्छरणस्थलमाबभौ ॥३७॥ प्रादुर्भूते स्थले तस्मिन्नादिशक्तिप्रभावतः॥ स्थलं च चरलिंगाख्यं समुत्पन्नमनुत्तमं ॥३८॥ तदुपासकरूपत्वात्प्राणलिंगिस्थलं बभौ ॥ स्थलात्समुत्थितं ज्योतिर्मयं तस्मात्सुशोभनं॥३९॥ शिवलिंगस्थलं साक्षादिच्छाशक्तिप्रभावतः॥ तदुपासकरूपत्वात्प्रसादिस्थलमुद्बभौ॥४०॥ शिवलिंगस्थले ज्ञानशक्तिस्फुरणयोगतः॥ उद्भूतकारणत्वेन गुरुलिंगाभिधं स्थलं ॥४१॥ तदुपासकरूपत्वान्माहेश्वरमहास्थलं ॥ गुरुलिंगस्थले तस्मिन् क्रियाशक्तिप्रभावतः ॥४२॥ आचारलिंगसंज्ञं तु स्थलं जातं सुशोधनं ॥ तदुपासकरूपत्वाद्भक्तस्थलमजायत ॥४३॥ महालिंगं प्रसादाख्यलिंगं च चरलिंगकं ॥ शिवलिंगं तथा चैव गुरुलिंगं ततः परं ॥४४॥ आचारलिंगमित्येवं प्रवृत्तिसृष्टिमार्गतः ॥ एवं लिंगस्थलं प्रोक्तं षड्विधं तु समासतः ॥ संति भेदोपभेदाश्च प्रत्येकं स्थलमत्र हि ॥४५॥ एतद्यो वेद सोऽविद्याग्रंथिं विकिरति प्रभुः॥ शिवसिद्धांतकं तन्त्रं शिवाद्वैतं शिवं पदं ॥ ४६ ॥ इत्यनुभवसूत्रे षट्स्थलनिर्णये लिंगस्थलनिरूपणं नाम तृतीयाधिकरणं संपूर्णम् ॥ ३ ॥

Ind... Centre for the Arts

---

लाच्या ठिकाणीं पराशक्तीचें स्फुरण झाल्यानें (३७) श्रेष्ठ प्रसादलिंगस्थल झालें. तें प्रसादलिंगस्थल उपासकरूप असल्यामुळें शरणस्थल झालें. (३८) त्या प्रसादलिंगस्थलाच्या ठिकाणीं आदिशक्तीच्या प्रभावानें उत्तम असें चरलिंगस्थल झालें. (३९–४०) तें चरलिंगस्थल उपासकरूप असल्यानें प्राणलिंगिस्थल झालें. त्या चरलिंगस्थलापासून इच्छाशक्तीच्या प्रभावानें सुंदर ज्योतिरूप असें शिवलिंगस्थल झालें. तें शिवलिंगस्थल उपासकरूप असल्यामुळें त्यापासून प्रसादिस्थल झालें.(४१) त्या शिवलिंगस्थलाच्या ठिकाणीं ज्ञानशक्तीचें स्फुरण झाल्यानें कारणरूपी गुरुलिंगस्थल उत्पन्न झालें. (४२) तें गुरुलिंगस्थल उपासकरूप असल्यामुळें माहेश्वरस्थल निर्माण झालें. गुरुलिंगस्थलाचे ठिकाणीं क्रियाशक्तीच्या प्रभावानें (४३) उत्तम आचारलिंगस्थल उत्पन्न झालें. तें आचारलिंगस्थल उपासकरूप असल्यामुळें भक्तस्थल झालें. (४४) महालिंग, प्रसादलिंग, चरलिंग, शिवलिंग, तसेंच गुरुलिंग त्यापुढें (४५) आचारलिंग याप्रमाणें षट्स्थलाची उत्पत्ति सृष्टिक्रमानें सांगितली आहे. याप्रमाणें सहा लिंगस्थलें संक्षेपानें सांगितलीं. प्रत्येक स्थलाचे भेदोपभेद पुष्कळ आहेत. (४६) हें शिवाद्वैतप्रतिपादक व मोक्षपददायक शिवसिद्धान्तशास्त्र जो जाणतो तो समर्थ मानव आपलें अज्ञान घालवितो. ३ रें अधिकरण संपलें.

## चतुर्थाधिकरणे अंगस्थलनिरूपणम्

वक्ष्ये संक्षेपमात्रेण पुरा शंभुप्रचोदितं ॥ रहस्यं सारभूतार्थमंगस्थलनिरूपणम् ॥१॥ अनाद्यंतमजं लिंगं तत्परं परमं प्रति ॥ यद्गच्छति महाभक्त्या तदंगमिति निश्चितं ॥२॥ अं भवेत्परमं ब्रह्म तद्गतं तत्परायणं ॥ अंगस्थलमिति प्राहुरंगतत्त्वविशारदाः ॥ ३ ॥ अमिति ब्रह्मसन्मात्रं गच्छतीति गमुच्यते ॥ रूप्यतेऽगमिति प्राज्ञैरंगतत्त्वविचिंतकैः॥४॥ अंगस्थलं त्रिधा ज्ञेयमाचार्यैस्सूक्ष्मदर्शिभिः ॥ योगांगं प्रथमं प्रोक्तं भोगांगं तु द्वितीयकं ॥ ५॥ त्यागांगं तु तृतीयं स्यादेवमेव त्रिधा भवेत् ॥ शिवयोगसुखावाप्त्या योगांगमिति गीयते॥६॥ शिवेन सह भोगेन भोगांगमिति कथ्यते ॥ संसारभ्रांतिसंत्यागात्त्यागांगमिति पठ्यते ॥७॥ योगांगं कारणं प्रोक्तं भोगांगं सूक्ष्ममुच्यते ॥ त्यागांगं स्थूलमित्युक्तमेवं भेदोपभेदतः ॥८॥ सुषुप्त्यवस्था योगांगं भोगांगं स्वापनाभिधा ॥ जाग्रदित्युदितावस्था त्यागांगमिति लक्ष्यते ॥९॥ योगांगं प्राज्ञ एवस्याद्भोगां-

---

### अंगस्थल नांवाचें चवथें अधिकरण.

(१) पूर्वीं महादेवानें जें अंगस्थल सांगितलें तें अंगस्थल सर्व शास्त्रांचें सार असून रहस्य ह्मणजे गोप्य आहे. याकरितां तें अंगस्थल संक्षेपानें मी कथन करितों. (२) 'अ' ह्मणजे अनाद्यंत (जन्ममरणरहित) व स्वयंभु अशा परमलिंगाकडे भक्तीनें जें जातें त्यास अंगस्थल असें ह्मटलें आहे. (३) अं ह्मणजे परब्रह्म त्याठिकाणीं गमन करणारें व त्याठिकाणीं आसक्त असणारें जें (जीव) त्यास तत्त्ववेत्त्यांनीं अंगस्थल असें ह्मटलें आहे. (४) 'अं' ह्मणजे सन्मात्रब्रह्म व 'ग' ह्मणजे त्याप्रत गमन करणारें अशी अंगतत्त्व जाणणारे 'अंग' शब्दाची व्युत्पत्ति करितात. (५) सूक्ष्मवेत्त्या आचार्यांनीं तें अंगस्थल तीन प्रकारचें ह्मटलें आहे. पहिलें योगांग, दुसरें भोगांग, (६) तिसरें त्यागांग. याप्रमाणें तीन प्रकारचें अंगस्थल सांगितलें आहे. शिवयोगांतील सुखप्राप्ति ज्यामुळें होते त्यास योगांग असें ह्मणतात. (७) शिवाबरोबर भोग ज्यानें मिळतो त्यास भोगांग असें ह्मणतात. संसाराच्या भ्रांतीचा ज्यानें त्याग होतो त्यास त्यागांग असें ह्मणतात. (८) योगांगाला कारणशरीर असें ह्मणतात. भोगांगाला सूक्ष्मशरीर असें ह्मणतात. त्यागांगाला स्थूलशरीर असें ह्मणतात, ह्याप्रमाणें अंगस्थलाचे भेद व उपभेद आहेत. (९) योगांग ही सुषुप्तीची अवस्था आहे. आणि भोगांग ही स्वप्नावस्था आहे. व त्यागांग जाग्रदवस्था आहे. याप्रमाणें शैवसिद्धांतामध्यें सांगितलें आहे. (१०) सुषुप्त्यवस्थेंत योगांगाचा व्यवहार अ-

गं तैजसो भवेत् ॥ त्यागांगं विश्व एव स्यात्परमार्थनिरूपणे ॥१०॥ इत्येवं त्रिप्रकारैस्तत्प्रोक्तमंगस्थलं क्रमात् ॥ प्रत्येकं पृथगर्थत्वात्सांप्रतं प्रोच्यते द्विधा ॥११॥ योगांगमैक्यं शरणस्थलमित्युभयं भवेत् ॥ प्राणलिंगिप्रसादीति द्वयं भोगांगमिष्यते ॥ १२ ॥ माहेश्वरस्थलं भक्तस्थलमित्युभयं तथा ॥ त्यागांगं भवतीत्येवं प्रोच्यते पारमार्थिकैः ॥१३॥ कारणं हि भवेदैक्यं शरणं तु द्वयात्मकं ॥ सूक्ष्मं स्यात्प्राणलिंगीति प्रसादीत्युभयात्मकं ॥१४॥ स्थूलं माहेश्वरं भक्तमिति स्याद्द्वितयात्मकं ॥ प्राज्ञ एव भवेदैक्यस्थलं च शरणस्थलं ॥१५॥ तैजसः प्राणलिंगि स्यात्प्रसादीति तथैव च ॥ विश्वो माहेश्वरं भक्तस्थलं चैव भवत्युमे ॥ १६ ॥ ऐक्यं तु शरणं नाम प्राणलिंगि प्रसादि च ॥ माहेश्वरं भक्तमिति क्रमात्षट्स्थलमुच्यते ॥१७॥ स्थिरा यत्र परा भक्तिर्विना संसृतिसंगतिं ॥ स्थलं तदेतदित्याहुः स्थलशब्दार्थवादिनः ॥१८॥ भक्तिवैचित्र्यसंयोगपारिणामप्रभावतः ॥ नामरूपक्रियाभिन्नं षड्विधांगस्थलं भवेत् ॥१९॥ सर्व-

---

सतो. स्वप्नावस्थेंत भोगांगाचा व्यवहार घडतो. व जाग्रदवस्थेंत त्यागांगाचा व्यवहार संभवतो असें ह्या श्लोकाचें तात्पर्य आहे. (११) ह्याप्रमाणें अंगस्थलाचे क्रमशः तीन प्रकार सांगितले. त्यांत पुनः प्रत्येकांत भिन्न अर्थ असल्यामुळें दोनदोन प्रकार झाले आहेत. सारांश, अंगस्थलाचे एकंदर सहा प्रकार झाले आहेत. ते पुढें सांगण्यांत येतील. (१२) ऐक्यस्थल व शरणस्थल ह्मणून योगांग दोन प्रकारचें आहे. प्राणलिंगि व प्रसादी ह्मणून भोगांग दोन प्रकारचें आहे. (१३) माहेश्वरस्थल व भक्तस्थल ह्मणून त्यागांग दोन प्रकारचें आहे. (१४) कारणशरीर ऐक्य व शरण अशा दोन स्थलांनीं युक्त आहे. सूक्ष्मशरीर प्राणलिंगी व प्रसादी अशा दोन स्थलांनीं युक्त आहे. (१५) स्थूलशरीर माहेश्वर व भक्त अशा दोन स्थलांनीं युक्त आहे. प्राज्ञजीव ऐक्यस्थल व शरणस्थल असा दोन प्रकारचा आहे. (१६) तैजससंज्ञित जीव प्राणलिंगि व प्रसादी असा दोन प्रकारचा आहे. विश्वसंज्ञितजीव माहेश्वर व भक्त असा दोन प्रकारचा आहे. (१७) ऐक्यस्थल, शरणस्थल, प्राणलिंगिस्थल, प्रसादिस्थल, माहेश्वरस्थल व भक्तस्थल याप्रमाणें अंगस्थलाचे सहा भेद झाले. (१८) संसाराचा संबंध टाकून ज्याठिकाणीं उत्तम भक्ति स्थिर राहते तें स्थल होय असें स्थलशब्दार्थ जाणणारे ह्मणतात. (१९) भक्तीचें वैचित्र्य, संयोग व विकार ह्यांच्या सामर्थ्यानें व नाम, रूप व क्रिया ह्यांनीं भिन्न असलेलें अंगस्थल सहा प्रकारचें झालें. (२०) सर्वज्ञता, तृप्ति, अनादिबोध, स्व-

ज्ञता तृप्तिरनादिबोधस्स्वतंत्रता नित्यमलुप्तशक्तिः ॥ अनंतशक्तिश्च विभोर्विधिज्ञाष्षडाहुरंगानि महेश्वरस्य ॥२०॥ षट्स्थलेषु प्रविश्यैषा भक्तिःषड्विधरूपिणी॥क्रमात् प्रवर्तते तत्तल्लक्षणोपाधिभेदतः॥२१॥मधुरादिषु यत्षट्सु प्रविश्य सलिलं यथा ॥ तत्तदाकारतो भाति तथा भक्तिः स्थले स्थले ॥२२॥ षड्विधाकारतो भिन्ना भक्तिस्साक्षाच्छिवात्मिका ॥ षण्णामैक्यादिभक्तांतस्थलानां वर्तते पदे ॥ २३ ॥ यथा शक्तिर्महालिंगाद्याचारांतेष्ववस्थिता ॥ तथैवैक्यादिभक्तांतेष्वियं भक्तिरवस्थिता ॥२४॥ भक्तिस्समरसाकारा प्रथमा परिगीयते ॥ आनंदाकारतो भाति द्वितीया भक्तिरुत्तमा ॥२५॥ तृतीयाऽनुभवाकारा भक्तिर्भवविनाशिनी ॥ चतुर्थी परमा भक्तिरवधानात्मिका मता ॥२६॥ पंचमी नैष्ठिकी भक्तिष्षष्ठी सद्भक्तिरीरिता ॥ षड्धा भक्तिसमेतानामंगानामनुपूर्वशः ॥ पृथग्लक्षणसद्भावस्थितिरत्र निगद्यते ॥२७॥ नाहं त्वमप्रथितशब्दविभेदवृत्तिर्न प्राणदेहमनइंद्रियभौतिकानि ॥ सर्वं भ्रमात्मकमिदं मयि ने-

---

तंत्रता, अलुप्तशक्ति व अनंतशक्ति ह्याप्रमाणें परमेश्वराचीं सहा अंगें आहेत असें शास्त्रज्ञ लोक ह्मणतात. (२१) ही भक्ति षट्स्थलांमध्यें प्रवेश करून निरनिराळ्या लक्षणोपाधिभेदानें क्रमशः सहा प्रकारची होते. (२२) मधुर वगैरे सहा रसांमध्यें मिसळल्यानें जसें पाणी वेगळें वेगळें भासतें त्याप्रमाणें भक्ति प्रत्येक स्थलामध्यें वेगवेगळ्या प्रकारची भासते. (२३) साक्षात् शिवरूपी भक्ति सहा आकारांनीं वेगळी होऊन ऐक्यादि ( ऐक्य, शरण, प्राणलिंगि, प्रसादि, महेश, भक्त ) सहा स्थलांमध्यें राहते. (२४) जशी शक्ति महालिंगादि सहा लिंगस्थलांमध्यें राहते तशी भक्ति ऐक्यादि सहा स्थलांमध्यें राहिली आहे. (२५) पहिल्या भक्तीस समरसभक्ति असें ह्मणतात, दुसरीस आनंदभक्ति (२६) व तिसरीस अनुभवभक्ति असें ह्मणतात; ही तिसरी भक्ति संसारनाशक आहे. चौथ्या परमभक्तीस अवधानभक्ति असें ह्मणतात. (२७) पांचव्या भक्तीस नैष्ठिकी असें ह्मणतात व सहावीस सद्भक्ति असें ह्मटलें जातें. ह्या सहा प्रकारच्या भक्तियुक्त सहा अंगांचीं लक्षणें व स्वरूपें क्रमशः वेगवेगळीं सांगतों. (२८) मी तूं हा भेद मिथ्या आहे. व्यवहारांत अनेक शब्दांनीं दर्शविला जाणारा भेदभावहि मिथ्या आहे. प्राण, देह, मन, इंद्रियें, पंचमहाभूतें हीं मिथ्या आहेत सारांश हें पूर्वोक्त सर्व भ्रमात्मक ( मायिक ) आहे. हा मिथ्याभ्रम माझ्या ठिकाणीं नसल्यामुळें ऐक्यस्थल हें समरस व सुखस्वरूप

तिभावादैक्यस्थलं समरसं सुखरूपमाहुः ॥२८॥ ज्ञानप्रकाशबलतः स्वयमेव लिंगं देहेंद्रियादिममरूपमिति प्रबुध्य ॥ युक्ते समस्तविषये सति यद्विशुध्दं तत्प्राहुरागमविदश्शरणस्थलं हि ॥२९॥ प्राणेंद्रियादिषु ममाहमिति प्रमोहं संभ्रांतिसिद्धमपहाय समस्तमेतत् ॥ लिंगे निधाय मनसा यदनुप्रयुक्तं तत्प्राणलिंगि सुचरस्थलमाहुरार्याः ॥३०॥ आत्मोपभोगविषयाणि हि सावधानं द्रव्याण्यहंकृतिमितैरखिलैः खवर्गैः ॥ लिंगे समर्प्य बहुशो लभते प्रसादं यत्तत्प्रसादि गदितं गुरुभिः स्थलं स्यात् ॥३१॥ आस्तिक्यबुद्धिनियमव्रतसत्यधर्मशौचादिलक्षणपरिस्फुटसच्चरित्रं ॥ लिंगैक्यनैष्ठिकतया सह वीरवृत्तं माहेश्वरस्थलमिति प्रवदन्ति संतः ॥३२॥ मिथ्यैव सत्यमिव भातमिदं शरीरं प्राणार्थजातमिति तत्र निवृत्तचित्तं ॥ भक्तिक्रियाचरणयैव सदा विरक्तं भक्तस्थलं भवविकारविदूरमाहुः ॥३३॥ एवमेव क्रमात्प्रोक्तमैक्यादीनां सुवर्चसां ॥ षड्विधाश्रमिणामेषां पृथगाचारलक्षणं ॥ ३४ ॥ आविर्भूतेरथैतेषामीषद्भेदः

---

आहे असें ह्मणतात. (२९) मी स्वतःच लिंग आहें; देह, इंद्रियें इत्यादि माझें रूप आहे; अशी ज्ञानाच्या प्रकाशबलानें सर्व विषयांच्या ठिकाणीं भावना झाली असतां जें विशुद्ध तत्त्व राहतें त्यास आगम जाणणारे लोक शरणस्थल असें ह्मणतात. (३०) प्राण इंद्रियें वगैरे सर्व माझीं आहेत. असा अहंकार वागविणें हा शुद्ध भ्रम आहे असें समजून व देहादिकांच्या ठिकाणची ममता टाकून पंचप्राणांसहित मन लिंगाच्या ठिकाणीं योजणें यास प्राणलिंगिस्थल असें ह्मणतात. (३१) अहंकारानें जाणिला जाणारा सर्व इंद्रियसमूह व आत्म्याला भोगविषय झालेले सर्व पदार्थ मनःपूर्वक लिंगाच्या ठिकाणीं अर्पण करून बहुशः जो प्रसाद ह्मणून अनुग्रह प्राप्त होतो त्यास प्रसादिस्थल असें आचार्यांनीं ह्मटलें आहे. (३२) ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल दृढश्रद्धा, नियम, शिवव्रतें, सत्यधर्म, शुचिर्भूतपणा इत्यादि गुणविशिष्ट चारित्र्य ( सद्वर्तन ) व लिंगैक्याच्या ठिकाणीं दृढभावयुक्त वीरव्रत ह्यांस सज्जन माहेश्वरस्थल असें ह्मणतात. (३३) सत्याप्रमाणें भासणारे, शरीर प्राण व इतर सर्व पदार्थसमूह ह्यांपासून मन परावृत्त करून ( काढून घेऊन ) व भक्ति व कर्म यांचें आचरण करून विरक्त राहणें ह्यास संसारनाशक भक्तस्थल असें ह्मणतात. (३४) याप्रमाणें ऐक्य वगैरे शुद्ध सहा स्थलांचीं निरनिराळीं लक्षणें व आचार क्रमशः सांगितले आहेत. (३५) आतां या सहा स्थलांच्या उत्पत्तीचा भेद थो-

प्रदर्श्यते ॥ आत्मनाऽऽकाशसंभूतिराकाशाद्वायुसंभवः ॥३५॥ वायोरग्निसमुत्पत्तिरग्नेराप उदाहृताः ॥ अद्भ्यस्तु पृथ्वीसंभूतिर्लक्षणैक्यप्रभावतः ॥ ३६ ॥ ऐक्यस्थलादिभक्तांतस्थलसंभूतिरीरिता ॥ ऐक्यादिभक्तपर्यंताश्रमिणां षट्स्थलात्मनां ॥३७॥ अंगानामधुना तेषामंगलक्षणमुच्यते ॥ आत्मांगमैक्यमेव स्याद्व्योमांगं शरणस्थलं ॥ ३८ ॥ वाय्वंगं प्राणलिंगि स्यादनलांगं प्रसादि च॥माहेश्वरं जलांगं स्याद्भक्तं भूम्यंगमिष्यते ॥३९॥ बिंदुनादकलाभेदात् त्रिविधानि विलोमतः ॥ षट्स्थलानि विभक्तानि द्वितयं द्वितयं क्रमात् ॥ ४० ॥ शरीरप्राणजीवानां त्रयाणां भेदतः क्रमात्॥ विलोमतो विभक्तानि षट्स्थलान्युभयोभयं ॥४१॥ षट्स्थलानि विभागेन द्विविधानि परस्परं ॥ ज्ञानात्मकतया त्रीणि क्रियात्मकतया तथा ॥४२॥ ज्ञानात्मकस्थलं ह्यैक्यं शरणं प्राणलिंगिकं ॥ क्रियात्मकं प्रसादि स्यान्माहेश्वरमतः परं ॥४३॥ ऐक्यं च शरणं नाम प्रा-

---

डक्यांत सांगतों. आत्म्यापासून आकाश उत्पन्न झालें, आकाशापासून वायु उत्पन्न झाला, वायूपासून (३६) अग्नि उत्पन्न झाला, अग्नीपासून पाणी झालें, पाण्यापासून पृथ्वी झाली, आत्मा व पंचमहाभूतें ह्यांच्या लक्षणैक्यप्रभावानें (३७–३८) ऐक्यस्थलापासून भक्तस्थलापर्यंत सहा स्थलांची उत्पत्ति सांगितली. आतां ऐक्यापासून भक्तस्थलापर्यंत असलेल्या सहा अंगस्थलांचीं अंगलक्षणें ( शरीरलक्षणें ) सांगतों. ऐक्यस्थलाचें अंग आत्मा; शरणस्थलाचें अंग व्योम ( आकाश ); (३९) प्राणलिंगिस्थलाचें अंग वायु; प्रसादिस्थलाचें अंग अग्नि; माहेश्वरस्थलाचें अंग जल ( उदक ); व भक्तस्थलाचें अंग भूमि ही होय. (४०) माहेश्वरस्थल व भक्तस्थल हीं दोन्ही बिंद्वात्मक आहेत. प्राणलिंगिस्थल व प्रसादिस्थल हीं दोन्ही नादात्मक आहेत. ऐक्यस्थल व शरणस्थल हीं दोन्ही कलात्मक आहेत. (४१) शरीर, प्राण, व जीव ह्या तिघांच्या भेदानें क्रमशः भक्तस्थल व माहेशस्थल हीं शरीरात्मक झालीं आहेत; प्रसादिस्थल व प्राणलिंगिस्थल हीं प्राणात्मक आहेत; व शरणस्थल व ऐक्यस्थल हीं जीवात्मक आहेत. (४२–४३) ऐक्यादि सहा स्थलें ज्ञान व क्रिया ह्यांनीं दोन प्रकारचीं झालीं आहेत. तीं अशीं--ऐक्यस्थल, शरणस्थल, प्राणलिंगिस्थल, हीं तिन्ही ज्ञानात्मक आहेत. प्रसादिस्थल, माहेशस्थल आणि भक्तस्थल हीं तिन्ही क्रियात्मक आहेत. (४४) ऐक्यस्थल, शरणस्थल, प्राणलिंगिस्थल, प्रसादि-

र्णलिंगि प्रसादि च ॥ माहेश्वरं भक्तमिति प्रवृत्तिः सृष्टिमार्गतः ॥४४॥ एवमंगस्थलं प्रोक्तं षड्विधं तु समासतः ॥ इतः परं न वक्तव्यं शेषोऽन्यो ग्रन्थविस्तरः ॥४५॥ एतद्यो वेद सोऽविद्याग्रन्थिं विकिरति प्रभुः ॥ शिवसिद्धांतकं तन्त्रं शिवाद्वैतं शिवं पदं ॥ ४६ ॥

इति श्रीवातुलोत्तरतंत्रे शिवानुभवसूत्रे षट्स्थलनिर्णयेऽगस्थलनिरूपणं नाम चतुर्थाधिकरणं संपूर्णम् ॥ ४ ॥

---

स्थल, माहेशस्थल, भक्तस्थल, याप्रमाणें सृष्टिमार्गानें षट्स्थलांची प्रवृत्ति सांगितली आहे. (४५) याप्रमाणें संक्षेपानें सहा अंगस्थलें सांगितलीं. ग्रन्थविस्तारभयास्तव ह्यापेक्षां जास्त येथें सांगितलें नाहीं. (४६) हें शिवाद्वैत प्रतिपादक व मोक्षपददायक शिवसिद्धांतशास्त्र जो जाणतो तो समर्थ मानव आपलें अज्ञान नाश करितो.

ह्याप्रमाणें वातुलागमाच्या उत्तरतंत्रांतील शिवानुभवसूत्राच्या षट्स्थलनिर्णयांतील अंगस्थलनिरूपण नांवाचें चौथें अधिकरण संपूर्ण झालें.

Indira Gandhi National
Centre for the Arts



rvedacharya Pt. Shiva Ram … Vaidyaratna
Rasayanshala … PUR.

## पंचमाधिकरणे लिंगांगसंयोगविधिः

अथेश्वरेणोक्तमतीव गुह्यं देव्या कृतप्रश्नसुनिश्चितार्थं ॥ गुरूपदेशानुभवप्रसिद्धं लिंगांगसंयोगविधिं प्रवक्ष्ये ॥१॥ शिव एव स्वयं लिंगमात्मैवांगस्थलं भवेत् ॥ तयोश्शिवात्मनोस्सम्यग्योगस्संयोग एव हि ॥२॥ आत्मायं केवलश्शुद्धश्शिवस्यांशस्सदाऽमलः ॥ नित्यो निरंजनश्शांतस्तस्मादात्मा स्वयं शिवः ॥३॥ सोऽयमात्मा शिवांगं स्याच्छिवेनांगीकृतत्वतः ॥ सर्वज्ञत्वादिभेदैश्च शिवांगमिदमिष्यते ॥४॥ सर्वज्ञत्वं च तृप्तित्वं तथानादिप्रबोधता ॥ स्वतंत्रतापि चालुप्तशक्तिताऽनंतशक्तिता ॥५॥ इत्येतैर्लक्षणैष्षड्भिः शिवांगमिति लक्ष्यते ॥ तस्मादंगस्थलं साक्षादात्मैव हि न संशयः ॥६॥ लिंगस्थलं शिवस्साक्षात् सत्यमेव मयोदितं ॥ यथालिंगस्थलं शक्त्या स्वीयया बहुधा भवेत् ॥७॥ तथा चांगस्थलं भक्त्या स्वीयया बहुधा भवेत् ॥ यद्यल्लिंगस्थलं साक्षाच्छिवो भवति शक्तितः ॥८॥ तत्तदंगस्थलं साक्षादात्मा भवति भक्तितः ॥

---

### लिंगांगसंयोगविधि नांवाचें पांचवें अधिकरण.

Centre for the Arts

(१) पार्वतीनें महादेवास प्रश्न केला असतां प्रश्नार्थप्रतिपादक असा शंकरानें सांगितलेला, गुह्य व गुरूपदेशाप्रमाणें क्रियाचरणानें जाणिला जाणारा, लिंग व अंग ह्यांच्या संयोगाचा ( ऐक्यभावाचा ) प्रकार आह्मीं सांगतों. (२) शिव ह्मणजे लिंगस्थल व जीव ह्मणजे अंगस्थल, त्या शिवजीवांचा जो उत्तम योग त्यास संयोग ह्मणतात. (३) जीव हा अद्वितीय व शुद्ध असा शिवाचा अंश आहे. ह्याकरितां तो जीव नित्य, निरंजन, व शांत आहे; ह्मणून जीव साक्षात् शिव आहे. (४) त्या जीवाचा शिवानें अंगीकार केल्यामुळें जीवास शिवांग असें ह्मणतात. कारण सर्वज्ञतादि भेदांनीं जीवास शिवांग ह्मणणें योग्य आहे. (५) सर्वज्ञत्व, नित्यतृप्तत्व, अनादिप्रबोधता, स्वतंत्रता, अलुप्तशक्ति व अनंतशक्ति (६) ह्या सहा लक्षणांनीं जीव शिवांग आहे असें ओळखतां येतें. त्याकरितां अंगस्थल साक्षात् जीवच आहे यांत कांहीं संशय नाहीं. (७) लिंगस्थल साक्षात् शिव आहे हें आह्मीं सांगितलें आहे तें सत्य आहे. लिंगस्थल आपल्या शक्तीच्या संबंधानें जसें सहा प्रकारचें झालें (८) तसें अंगस्थलहि आपल्या भक्तीच्या संबंधानें सहा प्रकारचें झालें; शक्तीच्या योगानें शिव लिंगस्थलाचें जें जें साक्षात् रूप धारण करितो तें तें अंगस्थलाचें रूप (९) जीवहि भक्तीच्या योगानें घेतो. शिव उपास्य असल्यामुळें तो शक्ति-

**यद्यद्रूपमुपास्यत्वाच्छिवो भवति शक्तिमान् ॥ ९ ॥ उपासकत्वतश्चात्मा तत्तदाप्नोति भक्तिमान् ॥ यद्यत्स्वरूपमाधत्ते पूज्यत्वेन महेश्वरः ॥१०॥ पूजकत्वेन चात्मानं तत्तद्रूपमनुव्रजेत् ॥ यद्यत्स्वरूपमाधत्ते साध्यत्वात्परमेश्वरः ॥११॥ साधकत्वादसावात्मा तत्तदास्थाय तिष्ठति ॥ यद्यत्स्वरूपमाधत्ते गुरुत्वेनांबिकापतिः ॥१२॥ शिष्यत्वेनायमात्मा च तत्तदादाय वर्तते ॥ उपास्योपासकौ पूज्यपूजकौ साध्यसाधकौ॥१३॥ गुरुशिष्यौ शिवात्मानौ निगद्येते महात्मभिः ॥ अथ संयोगसद्भाव उच्यते सांप्रतं मया ॥१४॥ सम्यग्योगो हि संयोगो भवेल्लिंगांगयोस्सदा ॥ संयोग एव सायुज्यरूपमुक्तिर्न चापरा ॥१५॥ तस्माल्लिंगांगसंयोगात्परा मुक्तिर्न विद्यते ॥ मुक्तिः परतरा भक्तिरिति सत्यपरा श्रुतिः ॥१६॥ इतः परं न वक्तव्यं बहुनोक्तेन किं फलम् ॥ ततो लिंगांगसंयोगविधिरत्र प्रदर्श्यते ॥१७॥ विधिः कर्तव्यरूपोपदेश इत्येव निश्चितः॥ उपदेशप्रसिध्यर्थमाचार्यं भवतारकं ॥१८॥ शिवविद्याप्रदातारमविद्याग्रंथिभेदकं ॥ शिवसिद्धांततंत्रैककर्तारं परमं शिवं ॥१९॥ सदा लिंगांगसंयो-**

---

सहवर्तमान जें जें उपास्यरूप धारण करितो (१०) तदनुरूप जीव उपासक असल्यामुळें भक्तिसहवर्तमान तो तें तें उपासकरूप धारण करितो. असें होण्याचें कारण शिवजीवांतील उपास्योपासकभाव हें होय. ईश्वर पूज्यत्वानें जें जें रूप धारण करितो (११) तदनुरूप जीवहि पूजकभावानें तें तें रूप धारण करितो. ईश्वर साध्य होऊन जें जें रूप घेतो (१२) त्या त्या रूपाचा जीवहि साधक होऊन आश्रय करतो. परमेश्वर गुरु होऊन जें जें रूप धारण करितो (१३) जीवहि शिष्य होऊन त्या त्या रूपाला अनुसरून असतो. उपास्य उपासक, पूज्य पूजक, साध्य साधक,(१४) गुरु शिष्य, असें अनुक्रमें शिव व जीव ह्यांस महात्मे लोक मानितात. आतां संयोगशब्दाची व्युत्पत्ति सांगतों (१५) लिंग व अंग ( शिव व जीव ) यांच्या उत्तम योगास संयोग असें ह्मणतात. लिंगांग ह्यांच्या नित्य संयोगालाच केवल सायुज्यमुक्ति ह्मणतात. (१६) याकरितां लिंगांगसंयोगाहून मुक्ति वेगळी नाहीं. उत्तम मुक्ति हीच भक्ति असें श्रेष्ठ श्रुतीचें मत आहे. (१७) यापेक्षां अधिक सांगणें निष्प्रयोजन आहे आतां लिंगांगसंयोगाचा विधि सांगतों. कर्तव्यकर्माच्या उपदेशास विधि असें ह्मणतात.(१८-१९-२०)असा उपदेश मिळून आपल्या अज्ञानाचा क्षय व्हावा ह्मणून जीव ( मनुष्य ) भवतारक, शिवज्ञानदाता, अज्ञाननाशक, शिवाद्वैतप्रतिपादकशास्त्रकर्ता, परशिवसमान, नित्य लिंगांगसंयोगी, रोगमुक्त, अशा आ-

गपरायणमनामयं ॥ उपगच्छत्यसौ देही स्वाविद्याविनिवृत्तये ॥२०॥ सोऽयमात्मा स्वयं साक्षाच्छिवस्यांशोऽपि तत्त्वतः॥व्यवहारदशायां तु संसारीव प्रकाशते ॥२१॥ संसारो विद्यया चास्य सत्यवत्परिकल्पितः ॥ देहेंद्रियादिसंघातेऽहंममभ्रांतिरूपतः ॥ २२ ॥ स्वस्मिन्नेव स्थिता विद्या मोहितः पुरुषः स्वकं ॥ शिवांशत्वं स्वकां शक्तिमविज्ञाय स्वकर्मणा ॥२३॥ कोहमित्यब्रवीद्देही गुरुं परमकारणं ॥ गुरुस्तत्त्वमसीत्याह सत्यार्थं करुणानिधिः ॥२४॥ अविद्याकृतकं सर्वमिदं देहेंद्रियादिकं ॥ असत्यं भ्रांतिसंसिद्धं सत्यवत्परिवर्तते ॥२५॥ तस्मात्तत्कृतकभ्रांतिविनाशार्थमहो तव ॥ नित्यं लिंगांगसंयोगज्ञाननिष्ठत्वमावह ॥ २६ ॥ लिंगं तत्पदमाख्यातमंगं त्वंपदमीरितं ॥ संयोगोऽसिपदप्रोक्तमनयोरंगलिंगयोः ॥२७॥ सन्मात्रं लिंगमाख्यातं चिन्मात्रं त्वंगमीरितं ॥ आनंदमात्रमनयोस्संयोग इति कीर्तितः ॥२८॥ नादो लिंगमिति प्रोक्तो बिंदुरंगमितीरितः ॥ कला संयोग इत्युक्ता तयोर्लिंगांगयोस्तथा ॥२९॥ म-

---

चार्याकडे जातो. (२१) तो जीवात्मा खरोखर साक्षात् शिवाचा अंश असून व्यवहारकालीं संसारीजीवाप्रमाणें भासतो. (२२) या जीवाला हा संसार अविद्येनें आलेला असून देहेंद्रियादिकांच्या ठिकाणीं मी, माझें, ह्मणून भ्रम असल्यानें तो संसार खऱ्याप्रमाणें मानिला आहे. (२३) आपल्या ठिकाणीं असलेल्या अविद्येनें मोहित होऊन हा जीव आपण शिवांश आहों, आपणाला शक्ति आहे असें आपल्या प्राक्तनकर्मानें समजत नाहीं. (२४) ह्मणून परमकारण अशा गुरूला मी कोण आहे ? असें विचारता झाला. मग त्या दयाळु गुरूनें तूं परब्रह्म आहेस असा त्यास सत्यार्थ सांगितला. (२५) हें देहेंद्रियादिक सर्व अविद्येनें केलें असून खोटें आहे. भ्रांतीनें तें सत्याप्रमाणें भासतें. (२६) ह्मणून अविद्येनें प्राप्त झालेल्या तुझ्या भ्रांतीचा नाश होण्याकरितां लिंगांगसंयोगज्ञानाविषयीं निष्ठा धर. (२७) 'तत्त्वमसि' या महावाक्यामध्यें तत्, त्वं, असि अशीं तीन पदें आहेत. त्यांमध्यें तत् या पदाचा अर्थ लिंग आहे, त्वं या पदाचा अर्थ अंग आहे व असि या पदाचा अर्थ लिंग व अंग यांचा संयोग असा आहे. लिंगस्थल व अंगस्थल यांचें ऐक्य 'तत्त्वमसि' या वाक्यानें सांगितलें. (२८) लिंगस्थल सन्मात्र आहे व अंगस्थल चिन्मात्र आहे. या दोघांचा संयोग आनंदमात्र आहे. याप्रमाणें आगमांत सांगितलें आहे. (२९) लिंगस्थल नाद आहे. अंग बिंदु आहे. लिंग व अंग यांच्या संयोगास कला असें ह्मणतात. (३०) लिंग मंत्र आहे. अंग क्रिया आहे. या दोन्हींचा संयोग

न्त्रो लिंगमितिप्रोक्तः क्रिया त्वंगमितीरिता ॥ क्रियामन्त्रप्रयोगस्तु संयोगो ह्यंगलिंगयोः ॥३०॥ अंगं प्रकृतिराख्यातं लिंगं पुरुष ईरितः ॥ तयोः प्रेरकभावेन संयोगः स्वयमीश्वरः ॥३१॥ अकारो लिंगमित्युक्तश्चोकारोंगमितीरितः ॥ संयोगोऽयं मकारः स्यात्प्रणवांशप्रभेदतः ॥३२॥ ऱ्हस्वस्स्याल्लिंगमेवांगं दीर्घः प्लुतमतः परं ॥ तयोः संयोग इत्येवमोंकारेणाभिधीयते ॥३३॥ वागंगं लिंगमेवार्थः प्रतिपत्तिस्तयोस्सदा ॥ संयोग इति विद्वद्भिः प्रोक्तो लिंगांगयोगिभिः ॥३४॥ छायातपौ जीवशिवावसौ गुरुश्शिवोऽस्य शिष्यः खलु जीवसंज्ञिकः ॥ लिंगं परं हृद्गगनं तदंगकं प्राणानिलोऽयं शिवसूत्रमुच्यते ॥३५॥ अनुभवसूत्रं सूत्रं शिवसिद्धांतसंज्ञिकं तंत्रं ॥ लिंगं षट्स्थलपरमब्रह्मैवेत्यत्र धारयेत्सततं ॥ ३६ ॥ इत्युक्त्वा पुरुषस्यास्य देशिकः करुणाबलात् ॥ चक्रे दीक्षां महाशैवीमविद्यापाशकृंतनीं ॥३७॥ दीयते लिंगसंबंधः क्षीयते च मलत्रयम् ॥ दीयते क्षीयते यस्मात्सा दीक्षेति निगद्यते ॥३८॥ सा दीक्षा परमा शैवी त्रिधा भवति निर्मला ॥ एका वेधात्मिका साक्षादन्या मन्त्रात्मिका मता ॥३९॥ क्रियात्मिका परा काचिदेवमेव त्रिधा भवेत् ॥ हस्तमस्तक-

---

क्रियामंत्रप्रयोग आहे. (३१) अंग प्रकृति आहे. लिंग पुरुष आहे. प्रेरकत्वानें त्यांच्या संयोगास साक्षात ईश्वर असें ह्मणतात. (३२) लिंग अकार आहे; अंग उकार आहे; व मकार त्या दोघांचा संयोग आहे. ह्मणजे लिंग व अंग आणि या दोन्हींचा संयोग हे प्रणवमंत्राचेच अंश आहेत. (३३) लिंग ऱ्हस्व आहे, अंग दीर्घ आहे, या दोन्हींचा संयोग प्लुत आहे. हाच अर्थ ॐकारानें सांगितला जातो. (३४) अंग शब्द आहे. लिंग अर्थ आहे. ह्या दोन्हींचा नित्य संयोग शब्दार्थज्ञान आहे. असें लिंगांगयोगी विद्वानांनीं सांगितलें आहे. (३५) जीव सावली आहे व शिव प्रकाश आहे. शिव गुरु आहे व जीव शिष्य आहे. लिंग परब्रह्म आहे व अंग हृदयाकाश आहे. प्राणवायु शिवसूत्र आहे. (३६) शिवाद्वैतप्रतिपादक अनुभवसूत्र सूत्र आहे व लिंग षट्स्थलपरब्रह्म आहे असें वीरशैवानें नेहमीं मनांत समजावें. (३७) असें ह्मणून आचार्यानें ह्या पुरुषास ( शिष्यास ) कृपा करून संसारनाश करणारी शैवीदीक्षा दिली. (३८) लिंगाचा संबंध 'दी' ह्मणजे देते व कायिक, वाचिक, मानसिक या तीन प्रकारच्या पापांचा 'क्षा' ह्मणजे क्षय करते. ह्मणून तीस दीक्षा असें ह्मटलें आहे. (३९-४०) ती निर्मल शैवदीक्षा तीन प्रकारची आहे. वेधात्मकदीक्षा, मंत्रात्मकदीक्षा, क्रियात्मकदीक्षा, याप्रमाणें दीक्षा तीन प्र-

Indira Gandhi National Centre for the Arts

IGNCA RAR ACC No. R-472

संयोगच्छलाद्वेधेति गीयते ॥ ४० ॥ गुरुणोदीरिता कर्णे या सा मांत्रीति कथ्यते ॥ शिष्यपाणितले दत्ता या दीक्षा सा क्रियोच्यते ॥ ४१ ॥ पाशानशेषान् कर्तर्या छित्वा लिंगं समादिशेत् ॥ कर्तरी शिवदीक्षा स्याद्यया पाशान् च्छिनत्यसौ ॥ ४२ ॥ कृत्वा शैवीं परां दीक्षां दत्वा विद्यां शिवात्मिकां ॥ छित्वाऽविद्यामहापाशं कलाध्वानं विचिंतयेत् ॥४३॥ यथा कला तथा भावो यथा भावस्तथा मनः ॥ यथा मनस्तथा दृष्टिर्यथा दृष्टिस्तथा स्थलं ॥४४॥ सा कला परमा सूक्ष्मा तत्त्वानां बोधिनी परा ॥ तामाकृष्य यथान्यायं लिंगे समुपवेशयेत् ॥४५॥ सा बाह्याभ्यंतरं साक्षाल्लिंगं ज्योतिःपरं स्वकं ॥ तिले तैलमिवाभति ह्यरण्यामिव पावकः ॥४६॥ क्षीरे सर्पिरिव स्रोतस्यंबुवत्स्थितमात्मनि ॥ तद्भावलक्षणां भक्तिं सुसूक्ष्मां परमामपि ॥ ४७ ॥ दर्शयामास शिष्यस्य देशिकः परमेश्वरः ॥ तस्मिन् दृष्टे परे लिंगे निष्कले निरुपाधिके ॥४८॥ अस्य जीवस्य कर्माणि क्षीयंते सकलानि हि ॥ अविद्याहृदयग्रंथिभिद्य-

---

कारची आहे. गुरूनें शिष्याच्या मस्तकावर हात ठेवून दीक्षा दिली असतां त्या दीक्षेला वेधात्मक दीक्षा ह्मणतात. (४१) गुरूनें शिष्याच्या कानामध्यें मंत्राचा उपदेश करून जी दीक्षा दिली जाते, तीस मंत्रात्मक दीक्षा ह्मणतात. शिष्याच्या हातामध्यें शिवलिंग देऊन उपदेश केला तर तीस क्रियात्मक दीक्षा ह्मणतात. तो आचार्य, (४२) जिनें शिष्याचे सर्व संसारपाश छेदितो, त्या शिवदीक्षेस कात्री असें ह्मणतात. त्या शिवदीक्षारूप कात्रीनें सर्व पाश छेदन करून नंतर शिष्याकडून शिवलिंग धारण करवावें. (४३) परम शिवदीक्षा देऊन, शिवविद्येचा उपदेश करून व अविद्यारूपी पाश तोडून कलाध्वाचें चिंतन करावें. (४४) जशी कला आहे त्याप्रमाणें भाव असावा; भावाप्रमाणें मन असावें, मनाप्रमाणें दृष्टि असावी व दृष्टीप्रमाणें स्थल असावें. (४५) ती कला परम सूक्ष्म असून तत्त्वाचा बोध करून देणारी आहे. त्या कलेला ओढून शास्त्राप्रमाणें लिंगाच्या ठिकाणीं तिची स्थापना करावी. (४६।४७।४८) तिळांतील तेल, अरणीमधील अग्नि, दुधांतील तूप व प्रवाहांतील पाणी हीं जशीं आपापल्या पदार्थांचे ठिकाणीं अंतर्बाह्य व्यापून आहेत त्याचप्रमाणें परंज्योतिरूप कला परमात्मरूप शिवलिंगाच्या ठिकाणीं अंतर्बाह्य व्यापून राहिली आहे. नंतर त्या श्रेष्ठ गुरूनें त्या शिष्याला कलात्मिका अतिसूक्ष्म व उत्तम अशा भक्तीचा बोध केला. तें निष्कल उपाधिरहित परलिंग पाहिलें असतां (४९) ह्या जीवाचीं सगळीं कर्मे लय पावतात. अविद्या-

SANS 294.5513 MAY

**ते शतधाऽपि च ॥४९॥ संशया बहुसंकल्पाश्छिद्यंते च सहस्रधा ॥ हिरण्मये परे कोशे विरजं ब्रह्मनिष्कलं ॥ ५० ॥ तच्छुभ्रं ज्योतिषां ज्योतिस्तद्यदात्मविदो विदुः ॥ ततस्तल्लिंगमस्यांगे शिष्यस्यामिततेजसः॥५१॥ गुरुस्संयोजयामास पूर्वोक्तेनैव वर्त्मना ॥ तनुत्रयगतानादिमलत्रयमसौ गुरुः ॥५२॥ दीक्षात्रयेण निर्दग्ध्वा लिंगत्रयमुपादिशत् ॥ यथा पुरत्रयं दग्धं युगपत्पुरवैरिणा ॥५३॥ तथा मलत्रयं दग्धं युगपद्देशिकात्मना ॥ वेधामनुक्रियाकारा दीक्षा शैवी शिखा मता ॥५४॥ तच्छिखा लिंगमित्युक्तं कर्ममायाणुवासना ॥ रूपं कर्पूरमाख्यातं तद्गंधोऽगमितीरितं ॥५५॥ एतल्लिंगांगसंयोगः शिखिकर्पूरयोगवत् ॥ त्रिष्वंगेष्वस्य शिष्यस्य लिंगत्रयमयं गुरुः ॥५६॥ संयुयोज त्रिधाभूतपरादीक्षाबलेन तु ॥ योगांगे भावलिंगं तु वेधादीक्षाबलेन वै ॥५७॥ मंत्रदीक्षाबलेनैव भोगांगे**

---

रूपी हृदयग्रंथि नाहींशी होते ( अज्ञान नष्ट होतें. ) (५०।५१।५२) व त्याच्या मनांतील अनेक संशय व संकल्प नाहींसे होतात. आत्मवेत्ते लोक श्रेष्ठ हिरण्मयकोषामध्यें जें निर्मल, निष्कल, शुभ्र, व चंद्रसूर्यादि ज्योतींना प्रकाश देणारें ब्रह्मात्मलिंग आहे असें मानितात त्या लिंगाचा त्या अत्यंत तेजस्वी शिष्याच्या अंगामध्यें त्या पूर्वोक्त शैवदीक्षेनें आचार्यांनें संयोग केला. स्थूल, सूक्ष्म, व कारण ह्या तीन शरीररूपी त्यागांग, भोगांग व योगांग ह्यांतील तीन प्रकारच्या मलांचें ह्या गुरूनें (५३) क्रिया, मंत्र, वेधा ह्या तीन दीक्षांनीं दहन करून इष्टलिंग, प्राणलिंग, व भावलिंग ह्या लिंगत्रयाचा उपदेश केला. शंकरानें जशीं एकाकालीं तीन पुरें जाळिलीं (५४) त्याप्रमाणें गुरूनें तीन प्रकारचें पाप जाळून टाकलें. वेधा, मंत्र, व क्रिया ह्मणून तीन प्रकारची जी शैवीदीक्षा तिला शिखा ( ज्वाला ) असें ह्मणतात. (५५) त्या शिखेला लिंग असें ह्मणतात. कर्मवासना, मायावासना, व अणुवासना ह्या वासनात्रयरूपाला कर्पूर असें ह्मणतात व त्या कापुराच्या गंधाला अंग ( जीव ) असें ह्मणतात. (५६) अग्निकर्पूरसंयोगाप्रमाणें हा लिंगांगसंयोग आहे कारण अग्नीचा कापुराशीं संयोग झाला असतां जसें कापुराचें स्वरूप व त्याचा गंध हीं लुप्त होऊन तेजस मात्र अग्नींत मिळून जातें त्याप्रमाणें लिंग व अंग (जीव) ह्यांचा संयोग झाला असतां वासनात्रयविशिष्ट अंगस्वरूप व जीवभाव हीं लुप्त होऊन जीवांतील परब्रह्मांशीं लिंगाशीं संयोजित होतो. ह्यालाच लिंगांगसंयोग असें ह्मणतात. गुरूनें शिष्याच्या तीन अंगामध्यें हीं तीन लिंगें (५७) तीन प्रकारच्या दीक्षेच्या प्रभावानें योजिलीं. तीं अशीं—वेधादीक्षेच्या बलानें यो-

प्राणलिंगकं ॥ क्रियादीक्षाबलेनायं देशिकस्तस्य चिद्धनं ॥ ५८ ॥ इष्ट-लिंगं तथा चैव त्यागांगे समयोजयत् ॥ योगांगमात्मनोऽगत्वात्कारणांगमितीरितं ॥५९॥ भोगांगमंतरंगत्वात्सूक्ष्मांगमिति निश्चितं ॥ त्यागांगं बहिरंगत्वात्स्थूलांगमिति कीर्तितं ॥ ६० ॥ जीवात्मा विश्व एव स्यादंतरात्मा तु तैजसं ॥ परमात्मा भवेत्प्राज्ञ इति तत्त्वविदो विदुः ॥ ६१ ॥ विश्वो जाग्रदवस्थायां स्वप्नाख्यायां तु तैजसः ॥ प्राज्ञस्सुषुप्त्यवस्थायां लिंगत्रयमुपासते ॥ ६२ ॥ एकोऽयं पुरुषो विश्वतेजसप्राज्ञरूपतः ॥ सदा स्वांगेषु संयुक्तमुपास्ते लिंगमद्वयं ॥६३॥ उपासनैव संयोगः संयोगो द्वैतसंलयः ॥ द्वैतस्य विलयश्चैव निवृत्तिः परिकीर्तिता ॥६४॥ निवृत्तिस्सैव विश्रांतिर्विश्रांतिः परमं पदं ॥ स्फटिकस्वच्छयोर्दीपप्रभयोः करकांभसोः ॥ ६५ ॥ कर्पूरगंधयोर्वायुनभसोर्भोगयोगवत् ॥ एवं लिंगांगसंयोगविधिना स्वात्मनि स्थिता ॥ ६६ ॥ बीजरूपा परा भक्तिः प्ररोहति समंततः ॥ आत्मा क्षेत्रं भवेद्भक्तिर्बीजं बीजी महेश्वरः ॥६७॥

---

गांगामध्यें कारणशरीर भावलिंग. (५८।५९) मंत्रदीक्षेच्या सामर्थ्यानें भोगांगाचे ठिकाणीं ( सूक्ष्मशरीरांत ) प्राणलिंग, क्रियादीक्षेच्या सामर्थ्यानें शिष्याच्या त्यागांगामध्यें ( स्थूल शरीरांत ) चिद्रूप इष्टलिंग गुरु योजिता झाला. योगांग जीवाचें अंग असल्यामुळें त्यास कारणांग असें ह्मटलें आहे. (६०) भोगांग अंतरंग असल्यामुळें सूक्ष्मांग असें निश्चित केलें आहे. त्यागांग बहिरंग असल्यामुळें त्यास स्थूलांग ह्मटलें आहे. (६१) जीवात्मा विश्व आहे. अंतरात्मा तैजस आहे. परमात्मा प्राज्ञ आहे असें तत्त्ववेत्ते ह्मणतात. (६२) विश्व हा जाग्रदावस्थेमध्यें इष्ट लिंगाची उपासना करितो. तैजस स्वप्नावस्थेमध्यें प्राणलिंगाची उपासना करितो प्राज्ञ निद्रावस्थेमध्यें भावलिंगाची उपासना करितो. (६३) एकटाच पुरुष (जीव) विश्व, तैजस, आणि प्राज्ञ ह्या रूपांनीं नेहमीं आपल्या तीन अंगांमध्यें योजिलेल्या परब्रह्मात्मक लिंगाची उपासना करतो. (६४) उपासनाच संयोग आहे. संयोग हाच द्वैताचा लय आहे. द्वैताच्या लयालाच निवृत्ति ह्मणतात. (६५) निवृत्ति हीच विश्रांति आहे. विश्रांतीच परमपद आहे. स्फटिक व स्वच्छपणा; दीप व प्रकाश; गार व पाणी; (६६) कापूर व वास; वायु आणि आकाश. ह्या परस्परांत शाब्दिक भेद असून वस्तुतः जसा संयोग आहे त्याप्रमाणें लिंगांगसंयोगरूपानें आत्म्याच्या ठिकाणीं बीजरूपानें असलेली (६७) भक्ति आसमंतभागीं वाढत जाते. जीव हा क्षेत्रभूमि आहे. भक्ति बीज आहे. महेश्वर बीजी (उत्पादक)

तस्मात्क्षेत्रस्य बीजस्य बीजिनश्च कदाचन ॥ वियोगो नेक्ष्यते क्वापि सदा संयोग एव हि ॥ ६८ ॥ अंगमात्मेति निर्णीतं लिंगं ब्रह्मेति निश्चितं॥ अंगस्य हृदयं लिंगं लिंगस्य हृदयं तु तत् ॥ ६९ ॥ तयोः कथं वियोगः स्यात्सदा संयोग एव हि ॥ योगेन तु परा भक्तिरिति भक्तेस्तु वैभवम् ॥ ७० ॥ अस्याः स्वरूपसद्भावात्सद्भक्तिरिति कीर्तिता ॥ तद्भक्त्यैव तथा चास्य भक्तस्थलमुपागतं ॥७१॥ आचारलिंगसंयुक्तमंगं भक्तस्थलं महत् ॥ तत्र स्थिता सती भक्तिस्संपूर्णा निजविष्ठया ॥७२॥ नैष्ठिकी भक्तिरित्येव कीर्तिता भक्तितत्परैः ॥ तया माहेश्वरं नाम स्थलमस्य स्वरूपतः ॥७३॥ गुरुलिंगसमायुक्तमंगं माहेश्वरस्थलं ॥ तत्र संनिहिता भक्तिनैंष्ठिकी सावधानतः ॥ ७४ ॥ अवधानात्मिका भक्तिरिति प्रोक्ता महात्मभिः ॥ भक्त्या तयाऽस्य जीवस्य प्रसादिस्थलमागतम् ॥७५॥ शिवलिंगसमायुक्तं प्रसादिस्थलमागतं ॥ तत्रैव सुस्थिता भक्तिरवधानात्मिका शुभा ॥ ७६ ॥ स्वानुभूतिनिबंधेन कीर्तिताऽनुभवात्मिका ॥ प्राणलिंगिस्थलं चास्य तया भक्त्या समागतं ॥७७॥ अंगं च चरलिंगेन संयुक्तं

---

आहे. (६८) त्याकरितां क्षेत्र व बीज आणि बीजी यांचा वियोग कधींहि कोठेंहि नसून नित्य संयोगच असतो. (६९) अंग जीव आहे लिंग ब्रह्म आहे अंगाचें (जीवाचें) हृदय लिंग आहे. लिंगाचें हृदय अंग आहे. (७०) त्या लिंगांगाचा वियोग कसा होईल. नेहमीं संयोगच असणार. योगानें परा भक्ति प्राप्त होते. भक्तीपासून वैभव प्राप्त होतें. (७१) ही भक्ति स्वरूपतः सत्य असल्यामुळें तीस सद्भक्ति असें ह्मणतात. त्या भक्तीच्या सम्बन्धानें ह्या जीवात्म्याला भक्तस्थल प्राप्त झालें आहे. (७२) आचारलिंगाचा संयोग असलेल्या अंगस्थलाला श्रेष्ठ भक्तस्थल असें ह्मणतात. त्या भक्तस्थलामध्यें राहिलेली सद्भक्ति निष्ठेनें पूर्ण असते. (७३) ह्मणून त्या भक्तीला नैष्ठिकीभक्ति असें भक्तिपरायण लोक ह्मणतात. त्या नैष्ठिकीभक्तीनें जीवात्म्याला स्वरूपतः माहेश्वरस्थलप्राप्ति झाली. (७४) माहेश्वर अंगस्थल गुरुलिंगस्थलाशीं युक्त आहे. त्या ठिकाणची नैष्ठिकी भक्ति सावधानानें असल्यामुळें (७५) तिला महात्म्ये अवधानात्मिक भक्ति असें ह्मणतात. त्या अवधानभक्तीनें ह्या जीवात्म्याला प्रसादिस्थल प्राप्त झालें. (७६) हें प्रसादिस्थल शिवलिंगानें युक्त असतें. प्रसादिस्थलाच्या ठिकाणीं राहिलेल्या अवधानात्मिकभक्तीला (७७) स्वानुभवाच्या सम्बधानें अनुभवात्मिकभक्ति असें ह्मणतात. ह्या अनुभवात्मकभक्तीनें जीवात्म्याला प्राणलिंगिस्थल प्राप्त झालें. (७८) तें प्राणलिं-

प्राणलिंगि यत् ॥ तत्र स्वानुभवाकारा भक्तिरानंदयोगतः ॥ ७८ ॥ प्रोक्ताऽऽनंदात्मिका भक्तिरिति वेदांतवेदिभिः ॥ अस्यात्मनस्तया भक्त्या शरणस्थलमागतं ॥७९॥ प्रसादलिंगसंयुक्तमंगं हि शरणस्थलं ॥ तत्र प्रतिष्ठिता साक्षाद्भक्तिरानंदरूपिणी ॥८०॥ सामरस्यप्रभावेन प्रोक्ता समरसात्मिका ॥ ऐक्यस्थलं तया चास्य चेतनस्य समागतं ॥८१॥ महालिंगसमायुक्तमंगमैक्यस्थलं परं ॥ तत्रैवावस्थिता भक्तिः स्वस्मिन् स्वयमवस्थिता ॥८२॥ षडंगयोगमार्गेण साधयत्ययमीश्वरं ॥ युगपत् षट्स्थलावाप्तिस्साधकस्यास्य सिध्यति ॥८३॥ साध्यत्वात्षट्‌ प्रपद्यंत आचारादिस्थलानि वै ॥ भक्त्यादीनि प्रपद्यंते साधकत्वात्स्थलानि वै ॥८४॥ साध्यः परशिवः साक्षादाचारादिषु षट्सु च ॥ भक्त्यादिषु स्थलेष्वात्मा साधकोऽयं प्रकीर्त्यते ॥८५॥ आचारलिंगं गुरुरूपलिंगं शिवाख्यलिंगं चरनामलिंगं ।। प्रसादलिंगं च महात्मलिंगं निवृत्तिमार्गेण षडाहुरार्याः ॥ ८६ ॥ भक्तं माहेश्वरं चैव प्रसादि प्राणलिंगि च ॥ शरण-

---

गि नामक अंगस्थल चरलिंगानें युक्त असतें. त्या प्राणलिंगि स्थलाच्या ठिकाणीं राहिलेल्या अनुभवात्मिकभक्तीला आनंदयोगानें (७९) आनंदात्मिकभक्ति असें वेदांतवेत्ते ह्मणतात. त्या आनंदात्मिकभक्तीनें ह्या जीवाला शरणस्थल प्राप्त झालें. (८०) हें शरणस्थल प्रसादलिंगानें युक्त असतें त्या शरणस्थलाच्या ठिकाणीं साक्षात् आनंदात्मिकभक्ति राहते. (८१) त्या आनंदात्मिकभक्तीला सामरस्याच्या प्रभावानें समरसात्मिका भक्ति असें ह्मणतात. त्या समरसात्मिकभक्तीनें ह्या जीवात्म्याला ऐक्यस्थल प्राप्त झालें. (८२) तें परम ऐक्यनामक अंगस्थल महालिंगानें युक्त असतें. त्या ऐक्यस्थलाचे ठिकाणीं राहिलेली समरसात्मिकभक्ति स्वस्वरूपानेंच राहिली आहे. (८३) हा जीव सहा अंगस्थलांच्या योगमार्गानें ईश्वराला साधितो ह्मणून ह्या साधक जीवाला षट्स्थलाची एकदम प्राप्ति होते. (८४) आचारादि सहा लिंगस्थलें साध्य आहेत. भक्तस्थल वगैरे सहा अंगस्थलें साधक आहेत. (८५) आचार वगैरे सहा लिंगस्थलांमध्यें साक्षात् शिव साध्य आहे. भक्त वगैरे सहा अंगस्थलांमध्यें जीव हा साधक आहे. (८६) आचारलिंग, गुरुलिंग, शिवलिंग, चरलिंग, प्रसादलिंग, महालिंग ह्याप्रमाणें सहा लिंगस्थलें निवृत्तिमार्गाचीं आहेत असें ह्मणतात. (८७) भक्तस्थल, माहेश्वरस्थल, प्रसादिस्थल, प्राणलिंगिस्थल, शरणस्थल, ऐक्यस्थल ह्याप्रमाणें सहा स्थलें निवृत्तिमार्गाचीं आहेत.

स्थलमैक्यं हि निवृत्तिलयमार्गतः ॥८७॥ ब्रह्मा हरिश्च रुद्रश्च ईश्वरश्च सदाशिवः ॥ साक्षात्परशिवश्चेति क्रमशः षट्स्थलात्मकाः ॥८८॥ एवं लिंगांगसंयोगविधिरत्र प्रकीर्तितः ॥ अस्माभिरादरेणैव शिवप्रोक्तो यथातथा ॥ ८९ ॥ एतद्यो वेद सोऽविद्याग्रंथिं विकिरति प्रभुः ॥ शिवसिद्धांतकं तंत्र शिवाद्वैतं शिवं पदं ॥९०॥

इत्यनुभवसूत्रे षट्स्थलनिर्णये लिंगांगसंयोगविधिर्नाम पंचमाधिकरणं संपूर्ण ॥

---

(८८) ब्रह्मा, हरि, रुद्र, ईश्वर, सदाशिव, व परशिव हे क्रमशः षट्स्थलात्मक आहेत. (८९) शिवानें पार्वतीला जसें सांगितलें त्याप्रमाणें आह्मी प्रस्तुत ग्रंथांत लिंगांगसंयोगाचा विधि प्रेमपुरःसर सांगितला आहे. (९०) हें शिवाद्वैतप्रतिपादक व मोक्षपददायक शिवसिद्धांतशास्त्र जो जाणतो तो समर्थ मनुष्य आपलें अज्ञान नाश करितो.

ह्याप्रमाणें अनुभवसूत्राच्या षट्स्थलनिर्णयांतील लिंगांगसंयोगविधि नांवाचें पांचवें अधिकरण संपूर्ण झालें.

Indira Gandhi National Centre for the Arts



# षष्ठमाधिकरणे-सर्वांगलिंगसाहित्यम्

अथ श्रीशंभुना प्रोक्तमनंतार्थप्रकाशकं ॥ सर्वांगलिंगसाहित्यं वक्ष्ये संक्षेपरूपतः ॥१॥ सर्वेष्वंगेषु सर्वत्र सर्वदा सर्वतोमुखं ॥ लिंगं गुरूपदेशेन सुप्रतिष्ठितमात्मनि ॥२॥ प्रकाशते ततोऽमुष्य चेतनस्य निरंतरं ॥ सर्वांगलिंगसाहित्यं प्रोच्यते लिंगतत्परैः ॥ ३ ॥ एकमेव परं लिंगमंगेऽस्मिन् सुप्रतिष्ठितं ॥ सर्वतोमुखमाभाति नामरूपक्रियात्मना ॥४॥ इष्टलिंगं तु बाह्यांगे प्राणलिंगं तथांतरे ॥ भावलिंगं तथैवास्मिन्नात्मांगे सुप्रतिष्ठितं ॥५॥ हृदयांगे महालिंगं श्रोत्रांगे तु प्रसादकं ॥ त्वगंगे चरलिंगं तु दृगंगे शिवलिंगकं ॥६॥ जिव्हांगे गुरुलिंगं तु नासिकांगे तथैव च ॥ आचारलिंगमश्रांतं सुप्रतिष्ठितमेव हि ॥७॥ यथा ज्ञानेंद्रियांगेषु क्रमाल्लिंगं प्रतिष्ठितं ॥ तथा कर्मेंद्रियांगेषु क्रमाल्लिंगं प्रतिष्ठितं ॥ ८ ॥ श्रोत्रवाचोर्न भेदोऽस्ति शब्दस्य वचनस्य च ॥ स्पर्शमादानयोस्तद्वद्भेदो न हि करत्वचोः ॥९॥ न नेत्रपादयोर्भेदो रूपस्य गमनस्य च ॥ भेदो

---

## सर्वांगलिंगसाहित्य नांवाचें सहावें अधिकरण.

(१) परमेश्वरानें पार्वतीला सांगितलेलें व पुष्कळ अर्थ दाखविणारें सर्वांगलिंगसाहित्य नांवाचें अधिकरण मीं येथें संक्षेपानें सांगतों. (२) जिवाच्या सर्वांगामध्यें नेह्मीं वेगळ्या वेगळ्या रूपाचें लिंग गुरूच्या उपदेशानें स्थापन केलेलें आहे. (३) याकरितां जिवाच्या सर्वांगामध्यें लिंग आहे असें लिंगस्वरूप जाणणारे लोक ह्मणतात. (४) एकच परलिंग जीवाच्या अंगामध्यें स्थापित असून नाम, रूप व क्रिया ह्यांच्या संबंधानें अनेक रूपांनीं भासतें. (५) बाह्यांगामध्यें इष्टलिंग आहे. अंतरंगामध्यें प्राणलिंग आहे. आत्मांगामध्यें ( कारण शरीरांत ) भावलिंग स्थापलेलें आहे. (६) हृदयांगामध्यें महालिंग आहे. श्रोत्रांगामध्यें प्रसादलिंग आहे. त्वचांगामध्यें चरलिंग आहे. नेत्रांगामध्यें शिवलिंग आहे. (७) जिव्हांगामध्यें गुरुलिंग आहे. नासिकामध्यें आचारलिंग सर्वदां स्थापित आहे. (८) ज्ञानेंद्रियामध्यें क्रमानें जशी लिंगाची स्थापना आहे, त्याप्रमाणें कर्मेंद्रियामध्येंहि क्रमानें लिंग स्थापिलें आहे. (९) कर्णेंद्रियाचा विषय शब्द आहे व वागिंद्रियाचा विषय वचन आहे व ज्याअर्थीं शब्द व वचन ह्यांत अत्यंत भेद नाहीं त्याअर्थीं कर्णेंद्रिय व वागिंद्रिय ह्या उभयतांतही भेद नाहीं. त्वगिंद्रिय व हस्तेंद्रिय ह्यांचे स्पर्श व आदान असे अनुक्रमें विषय आहेत व त्यांत भेद नसल्यामुळें त्वगिंद्रिय व हस्तेंद्रिय ह्या दोन इंद्रियांत भेद नाहीं. (१०) चक्षुरिंद्रियाचा विषय रूप व पादेंद्रियाचा विषय

नानंदरसयोर्न जिव्हागुह्ययोस्तथा ॥ १० ॥ नासिकागुदयोर्भेदो नास्ति गंधविसर्गयोः ॥ अस्ति चेदप्रमाणं स्याच्छ्रुतिः सत्यार्थवादिनी ॥११॥ श्रोत्रस्य वाचः शब्दस्य विभोर्व्योम्नस्तथैव च ॥ ईश्वरीमीश्वरस्यैनामीशानाख्यां विदुर्बुधाः ॥ १२ ॥ त्वक्पाणिस्पर्शवायूनामीश्वरीं मूर्तिमैश्वरीं ॥ पुरुषाख्यां विदुः पूर्वे पुराणागमवेदिनः ॥१३॥ चक्षुषश्चरणस्यापि रूपस्याग्नेस्तथैव च ॥ अघोराख्यामधिष्ठात्रीं मूर्तिमाहुर्मनीषिणः ॥१४॥ रसनाया उपस्थस्य रसस्यापां तथैव च ॥ ईश्वरीं वामदेवाख्यां मूर्तिं मुनिवरा विदुः ॥ १५॥ घ्राणस्य चैव पायोश्च गंधस्य च भुवस्तथा ॥ सद्योजाताह्वयां मूर्तिमीश्वरीं संप्रचक्षते ॥ १६ ॥ ज्ञानकर्मात्मनां खानामाश्रयं हृदयं भवेत् ॥ आश्रयत्वात्स्वनैर्मल्यात् ज्ञानकर्मोभयात्मकं ॥१७॥ इंद्रियाणां तु सर्वेषामवकाशप्रदत्वतः ॥ हृदयाकाश इत्येतत्प्रोच्यते मतिमत्तमैः ॥१८॥ स्थूलांगे स्थूलरूपेण सूक्ष्मांगे सूक्ष्मरूपतः ॥ कारणे कारणत्वेन तिष्ठंत्येतानि खानिहि ॥ १९ ॥ तेष्वेषु खेषु सर्वेषु

---

गमन; रूप व गमन ह्यांत भेद नसल्यामुळें चक्षुरिंद्रिय व पादेंद्रिय ह्यांतहि भेद नाहीं. गुह्येंद्रियाचा विषय आनंद व रसनेंद्रियाचा ( जिव्हेचा ) विषय रस व ह्या उभय विषयांत भेद नसल्यामुळें गुह्येंद्रिय व रसनेंद्रिय ह्यांतहि भेद नाहीं. (११) नासिकेंद्रिय व गुदेंद्रिय ह्यांचे गंध व मलोत्सर्ग हे अनुक्रमें विषय आहेत. ह्या विषयांत भेद नसल्यामुळें नासिका व गुद ह्या इंद्रियांतहि भेद नाहीं. जर भेद असेल तर श्रुतीच्या सत्यत्वाला बाध येईल. (१२) परमेश्वराची ईशानमूर्ति श्रोत्रेंद्रिय व वागिंद्रिय शब्द आणि आकाश ह्यांची अधिष्ठानदेवता आहे. (१३) तत्पुरुषमूर्ति त्वक्, पाणी, स्पर्श, वायु, ह्यांची अधिष्ठानदेवता आहे. याप्रमाणें आगम जाणणारे मानितात. (१४) अघोरमूर्ति चक्षु, चरण, रूप व अग्नि ह्यांची अधिष्ठानदेवता आहे असें सूज्ञांचें मत आहे. (१५) रसनेंद्रिय उपस्थ रस आणि पाणी ह्यांची अधिष्ठानदेवता वामदेवा या नांवाची मूर्ति आहे असें मुनिश्रेष्ठ मानितात. (१६) घ्राण, गुद, गंध व भूमि ह्यांची अधिष्ठानदेवता सद्योजात ह्या नांवाची ईश्वराची मूर्ति आहे. (१७) ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें ह्यांचें आश्रयस्थान मन आहे. तें मन सकलेंद्रियांचें आश्रयस्थान असल्यामुळें व स्वतः निर्मल असल्यानें ज्ञानकर्मात्मक आहे. (१८) सगळ्या इंद्रियांला अवकाश देणारें हृदयच आहे ह्मणून विद्वान् त्यास हृदयाकाश असें ह्मणतात. (१९) हीं इंद्रियें स्थूलांगामध्यें स्थूलरूपानें व सूक्ष्मांगामध्यें सूक्ष्मरूपानें आणि कारणशरीरामध्यें कारणरूपानें राहतात. (२०) ह्या

लिंगं सत्यादिलक्षणं ॥ गुरूपदेशसंसिद्धं भासते सर्वतोमुखं ॥ २० ॥ एतल्लिंगमुखं यत्र दृश्यते सूक्ष्मदर्शिभिः ॥ यदामनंति वेदाश्च तपांसि नियमास्तथा ॥२१॥ हृदयं हृदयस्येति श्रोत्रं श्रोत्रस्य सर्वदा ॥ वाचो वाक्त्वक्त्वचः पाणिः पाणेश्चक्षुश्च चक्षुषः ॥२२॥ पादः पादस्य जिव्हाया जिव्हा गुह्यस्य गुह्यकं ॥ नासिका नासिकायाश्च पायोः पायुरिति स्थितिः ॥२३॥ तल्लिंगमुखमित्याहुः शिवसिद्धांततांत्रिकाः ॥ प्रत्येकं लिंगमस्यैव मुखं वक्ष्ये पृथक् पृथक् ॥२४॥ घ्राणस्य घ्राणमाचारलिंगस्य मुखमुच्यते ॥ जिव्हायाश्च तथा जिव्हा गुरुलिंगमुखं भवेत् ॥२५॥ चक्षुषश्च तथा चक्षुश्शिवलिंगमुखं भवेत् ॥ त्वचस्त्वक्चररूपस्य लिंगस्य मुखमुच्यते ॥ २६ ॥ मुखं प्रसादलिंगस्य श्रोत्रं श्रोत्रस्य कथ्यते ॥ हृदयं हृदयस्यैव महालिंगमुखं भवेत् ॥२७॥ एवं लिंगमुखं प्रोक्तं सुप्रसिद्धमनंतरं ॥ भक्तादिषट्स्थलानां च हस्तभेदः प्रदर्श्यते ॥ २८ ॥ वस्तुनो भाव उत्पन्नो भावाज्ज्ञानसमुद्भवः ॥ ज्ञानान्मनस्समुत्पन्नं मनसोऽहंकृतिस्तथा ॥ २९ ॥ अहंकारात्ततो बुद्धिर्बुद्धेश्चित्तस्य संभवः ॥

---

सर्व इंद्रियांमध्यें गुरूपदेशानें प्राप्त झालेलें सच्चिदानंदात्मक लिंग सर्व इंद्रियमुखांनीं (२१) ज्या इंद्रियाच्या ठिकाणीं तत्त्ववेत्ते लोक हें परलिंगमुख आहे असें मानितात व जेथें तें असल्याचें वेद, तपें व नियम प्रतिपादन करितात. जसें (२२) हृदयाचें मुख हृदय आहे. श्रोत्राचें मुख श्रोत्र आहे. वाणीचें मुख वाणी आहे. त्वचेचें मुख त्वचा आहे हस्ताचें मुख हस्त आहे. नेत्राचें मुख नेत्र आहे.(२३) पादाचें मुख पाद आहे. जिव्हेचें मुख जिव्हा आहे. गुह्येंद्रियाचें मुख गुह्य आहे. घ्राणेंद्रियाचें मुख घ्राण आहे. पाय्वेंद्रियाचें मुख पायु आहे. (२४) हेंच परलिंगाचें मुख आहे असें शिवसिद्धांत जाणणारे लोक ह्मणतात. आतां प्रत्येकाचें लिंगमुख वेगळें वेगळें सांगतों. (२५) घ्राणेंद्रियाचें घ्राण ( नासिकास्थान ), हें आचारलिंगाचें मुख आहे. जिव्हेंद्रियाचें जिव्हास्थान गुरुलिंगाचें मुख आहे. (२६) नेत्रेंद्रियाचें नेत्रस्थान शिवलिंगाचें मुख आहे. त्वगिंद्रियाची त्वचा हें चरलिंगाचें मुख आहे. (२७) श्रोत्रेंद्रियाचें श्रोत्र हें प्रसादलिंगाचें मुख आहे. हृदयेंद्रियाचें हृदय हें महालिंगाचें मुख आहे. (२८) याप्रमाणें लिंगमुख शैवशास्त्रामध्यें सांगितलेलें असून प्रसिद्ध आहे. आतां भक्तस्थल वगैरे षट्स्थलांचा हस्तप्रकार सांगतों. (२९) वस्तूपासून भाव उत्पन्न झाला, भावापासून ज्ञान उत्पन्न झालें, ज्ञानापासून मन उत्पन्न झालें, मनापासून अहंकार उत्पन्न झाला. (३०) अहंकारापासून बुद्धि उत्पन्न झाली. बु-

एतेषां लक्षणं वक्ष्ये भावादीनामनुक्रमात् ॥३०॥ अस्तीत्यारभ्यते वस्तु तत्सत्ताभाव उच्यते ॥ ज्ञानं जानाति तं नित्यं मनस्तन्मनुते सदा ॥३१॥ अहंतदित्यहंकारो बुद्धिस्तन्निश्चिनोति हि ॥ चित्तं स्थैर्यगुणेनैव तथैतद्वस्तुसाधकं ॥ ३२ ॥ चित्तं भक्तस्य हस्तस्स्याद्बुद्धिर्माहेश्वरस्य च ॥ प्रसादिनस्तथा हस्तो ह्यहंकार उदीर्यते ॥ ३३ ॥ मनो हस्तो भवत्येव महतः प्राणलिंगिनः ॥ ज्ञानं हस्तो भवेदस्य शरणस्य महात्मनः ॥ ३४ ॥ ऐक्यस्य भावो हस्तस्स्यादेवमेवोत्तरोत्तरं ॥ आत्मांगं भावहस्तं स्यान्महालिंगार्चने रतं ॥३५॥ ऐक्यस्थलमिति प्राहुस्साक्षाद्वेदांतपारगाः ॥ व्योमांगं ज्ञानहस्तं स्यात्प्रसादार्चनतत्परं ॥ ३६ ॥ शरणस्थलमित्याहुश्शिवयोगपरायणाः ॥ अनिलांगं मनोहस्तं चरलिंगार्चने रतं ॥३७॥ प्राणलिंगिस्थलं साक्षादित्याहुश्शिवधार्मिकाः ॥ अनलांगमहंहस्तं शिवलिंगार्चने रतं ॥ ३८ ॥ प्रसादिस्थलमित्याहुराचा-

---

द्धीपासून चित्त उत्पन्न झालें. ह्या भाव वगैरे सहांचें स्वरूपलक्षण अनुक्रमानें सांगतों. (३१) अस्ति ह्या व्यवहाराला जो विषय होतो त्यास वस्तु असें ह्मणतात. त्या वस्तूची सत्ता ह्मणजे ( अस्तित्व ) यास भाव ह्मणतात. जानाति या व्यवहाराला जो विषय होतो त्यास ज्ञान ह्मणतात. जें नेहमीं मनन करतें त्यास मन असें ह्मणतात. (३२) मी मी ह्मणणें यास अहंकार ह्मणतात. जी निश्चय उत्पन्न करते तीस बुद्धि ह्मणतात. स्थिरपणानें जें एखाद्या वस्तूला साधन करतें त्यास चित्त ह्मणतात. (३३) चित्त हें भक्तस्थलाचा हस्त आहे. बुद्धि ही महेश्वरस्थलाचा हस्त आहे. अहंकार प्रसादिस्थलाचा हस्त आहे. (३४) मन प्राणलिंगिस्थलाचा हस्त आहे. ज्ञान शरणस्थलाचा हस्त आहे. (३५) भाव ऐक्यस्थलाचा हस्त आहे असें उत्तरोत्तर समजावें; आत्मा त्याचें अंग आहे व भाव हा हस्त आहे. महालिंगाच्या उपासनेमध्यें तत्पर असलेलें (३६) ऐक्यस्थल अशा प्रकारचें आहे असें वेदांतशास्त्र जाणणारे मानितात. जें प्रसादलिंगाच्या उपासनेंत तत्पर असतें; आकाश ज्याचें अंग आहे व ज्ञान ज्याचा हस्त आहे (३७) तें शरणस्थल अशा प्रकारचें आहे असें शिवयोगी लोक मानितात. जें चरलिंगाचे उपासनेंत सक्त असतें, वायु ज्याचें अंग आहे; व मन हस्त आहे, (३८) तें प्राणलिंगिस्थल अशा प्रकारचें आहे असें शैवलोक मानितात. जें शिवलिंगाचे उपासनेंत आसक्त आहे, अग्नि ज्याचें अंग आहे व अहंकार हस्त आहे (३९) तें प्रसादिस्थल अशा प्रकारचें आहे असें शैवसिद्धांत जाणणारे आचार्य मानितात. जल ज्याचें अंग

र्यांशिवशास्त्रिणः ॥ जलांगं बुद्धिहस्तं च गुरुर्लिंगार्चने रतं ॥३९॥ माहेश्वरस्थलं साक्षादिति प्राहुर्मनीषिणः ॥ भूम्यंगं चित्तहस्तं च सदाचारार्चने रतं ॥४०॥ भक्तस्थलमिति प्राहुश्शिवसिद्धांतवेदिनः ॥ एवमंगं च हस्तं च लिंगं च मुखमत्र च ॥४१॥ यथावदानुपूर्वेण प्रावोचमहमादरात् ॥ ततः पंचाक्षरीविद्यासाहित्यमधुनोच्यते ॥ ४२ ॥ पंचाक्षरी परा विद्या सतारा तु षडक्षरी ॥ स्थूलसूक्ष्मादिभेदेन स्वयमेवाष्टधा स्थिता ॥४३॥ शिवमंत्राभिधा मंत्रमातृका लिंगरूपिणी ॥ शिवप्रदायिनी नित्यं सर्वांगेषु प्रतिष्ठिता ॥४४॥ अंगं नमःपदमसौ शिव एव लिंगं सबंध एष यदयेतिपदं तदुक्तं ॥ लिंगांगसंगमपदत्रयबोधनार्थं मंत्रोऽयमेवमभिधास्यति मंत्रराजः ॥४५॥ नमःपदं तत्खलु जीववाचि शिवःपदं तत्परमात्मवाचि ॥ अयेति तादात्म्यपदं तदेतन्नमःशिवायेति जगाद मंत्रः ॥४६॥ मूलाधारे नकाराख्या संस्थिता परमेश्वरी ॥ अनाहते वकाराख्या सदा शैवी व्यवस्थिता ॥४७॥ विशुद्धौ तु यकाराख्या सा-

---

आहे; बुद्धि ज्याचा हस्त आहे व जें गुरुलिंगाच्या उपासनेंत तत्पर असतें (४०) तें माहेश्वरस्थल अशा प्रकारचें आहे असें ज्ञातेलोक मानितात. भूमि ज्याचें अंग आहे; चित्त ज्याचा हस्त आहे, व जें आचारलिंगाच्या पूजेंत रत असतें (४१) तें भक्तस्थल अशा पूर्वोक्त प्रकारचें आहे असें शैवसिद्धांत जाणणारे ह्मणतात. ह्याप्रमाणें प्रत्येक स्थलाचें अंग, हस्त, लिंग व मुख (४२) अनुक्रमानें भक्तिपूर्वक मीं सांगितलें आहे, आतां पंचाक्षरी विद्येचें साहित्य सांगतों. (४३) "नमःशिवाय" ह्मणून पांच अक्षरांची पराविद्या आहे. ती ॐकारासहित झाली ह्मणजे षडक्षरी होते स्थूल व सूक्ष्म या भेदानें ती पंचाक्षरी विद्या आठ प्रकारची झाली आहे. (४४) ही पंचाक्षरी विद्या शिवमंत्र असून मंत्र वर्णात्मक व लिंगरूप आहे' ती शिवसायुज्य देणारी असून नेहमीं सर्वांगामध्यें राहिली आहे (४५) या मंत्रांतील नमः हें पद अंग (जीव) आहे. शिव हें पद साक्षात् लिंग आहे. अय हें पद संबंध आहे. लिंग, अंग, व संगम (संबंध) ह्या तीन पदांचें ज्ञान व्हावें ह्मणून मंत्रामध्यें राजाप्रमाणें शोभणारा हा मंत्र पुढीलप्रमाणें व्याख्यान करितो. (४६) नमःपदाचा अर्थ जीव आहे; शिवपदाचा अर्थ परमात्मा आहे; अय या पदाचा अर्थ तादात्म्य आहे, ह्मणून नमःशिवाय ह्या मंत्रानें लिंग व अंग ह्यांचें तादात्म्य सांगितलें (४७)मूलाधारचक्रामध्यें नकाराख्य परमेश्वरी शक्ति राहिली आहे. अनाहतचक्रामध्यें वकार नांवाची शैवीशक्ति नित्य आहे (४८) विशुद्धि-

क्षाद्विश्वेश्वरी स्थिता ॥ आज्ञाचक्रे महादेवी ताराख्या समुपस्थिता ॥४८॥ आचाराख्यं नकारस्स्यान्मकारो गुरुलिंगकं ॥ शिकारः शिवलिंगं स्याद्वाकारश्चरलिंगकं ॥ ४९ ॥ यकारस्स्यात्प्रसादाख्यमोंकारो महदुच्यते ॥ षष्ठं ब्रह्म भवेत्तारं यकारः पंचमं भवेत् ॥५०॥ चतुर्थं तु वकारस्स्याच्छिकारस्तु तृतीयकं ॥ द्वितीयं तु मकारस्स्यान्नकारः प्रथमं भवेत् ॥५१॥ एवं षडक्षराण्येव ब्रह्माणि क्रमशो विदुः ॥ ॐकारः परिपूर्णत्वात्त्वचि सर्वत्र तिष्ठति॥५२॥ नकारो रुधिरे स्थाति मकारो मांससंचये ॥ शिकारो मेदसि स्थाति वाकारोऽस्थिषु तिष्ठति ॥ ५३ ॥ यकारः स्थाति मज्जायां शुक्ले स्थाति षडात्मकः ॥ एवं षडक्षरमयं शिवतन्मूर्तिसुस्थितं ॥५४॥ देहं ममेति यो ध्यायेत्सोऽहमेव न संशयः ॥ सर्वांगलिंगसाहित्यमेवमेव मयोदितं ॥ शिवप्रणीतवाक्यार्थसम्यग्वीक्ष्य समासतः ॥५५ ॥ एतद्यो वेद सोऽविद्याग्रंथिं विकिरति प्रभुः ॥ शिवसिद्धांतकं तंत्रं शिवाद्वैतं शिवं पदं ॥५६॥

इति श्रीवातुलोत्तरतंत्रे शिवानुभवसूत्रे षट्स्थलनिर्णये सर्वांगलिंगसाहित्यं नाम षष्ठाधिकरणं संपूर्णम् ॥

---

चक्रामध्यें यकार नांवाची विश्वेश्वरी शक्ति राहिली आहे. आज्ञाचक्रामध्यें तारारूपानें महादेवीशक्ति राहिली आहे. (४९) नकार आचारलिंग आहे. मकार गुरुलिंग आहे. शिकार शिवलिंग आहे. वाकार चरलिंग आहे (५०) यकार प्रसादलिंग आहे. ॐकार हा महालिंग आहे. तार (ॐकार) सहावें परब्रह्म आहे. यकार पांचवा आहे. (५१) वकार चौथा आहे. शिकार तिसरा आहे. मकार दुसरा आहे. नकार पहिला आहे. (५२) याप्रमाणें हीं सहा अक्षरें क्रमानें परब्रह्मसंबधीं आहेत असें ज्ञानी ह्मणतात. ॐकार हा पूर्ण असल्यामुळें सर्व त्वचेमध्यें राहतो. (५३) नकार रक्तामध्यें राहतो. मकार मांसामध्यें राहतो, शिकार मेंदूमध्यें राहतो. वाकार अस्थीमध्यें राहतो. (५४) यकार अस्थीसहित मज्जेमध्यें राहतो; षडक्षरमंत्र शुक्लामध्यें राहतो. याप्रकारें षडक्षरात्मक व शिवमूर्तीनें व्याप्त (५५) असा माझा देह आहे असें जो ध्यान करील तो मीच आहें यांत संशय नाहीं. ह्याप्रमाणें अर्थ योग्य रीतीनें जाणून मीं संक्षेपतः सर्वांगलिंगसाहित्य सांगितलें. (५६) हें शिवाद्वैतप्रतिपादक व मोक्षपददायक शिवसिद्धांतशास्त्र जो जाणतो तो समर्थ मानव आपल्या अज्ञानाचा नाश करितो.

ह्याप्रमाणें वातुलागमांतील उत्तरतंत्रांतील शिवानुभवसूत्राच्या षट्स्थलनिर्णयांतील सर्वांगलिंगसाहित्य नांवाचें सहावें प्रकरण समाप्त झालें.

## सप्तमाधिकरणे अर्पणसद्भावः

अथ क्रियासु सर्वासु निर्लेपत्वाय चात्मनः ॥ श्रीलिंगार्पणसद्भावमीश्वरोक्तं मनाग्ब्रुवे ॥ १ ॥ द्वेधा लिंगार्पणविधिः प्रोच्यते देशिकोत्तमैः ॥ क्रियामतार्पणं किंचित्किंचिज्ज्ञानमतार्पणं ॥२॥ यथाकालोचितैर्द्रव्यैर्यदृच्छासंभवैः स्वयं ॥ स्वोपभोगाय यत्कार्यं त्रिषु लिंगेषु सादरं ॥३॥ तत्क्रियार्पणमित्याहुरर्पणैकविशारदाः ॥ षट्सु लिंगेषु सर्वत्र सार्वकालकरूपतः ॥ ४ ॥ स्वयमागतवस्तूनि ज्ञात्वा तत्तन्मुखेषु च ॥ अनिच्छाविधिना कार्यमेतज्ज्ञानार्पणं विदुः ॥५॥ क्रियार्पणं वदाम्यत्र सांप्रतं द्रव्यशुद्धये ॥ या या क्रिया विधातव्या प्रस्तुता जायते पुरा ॥६॥ तां तां कुर्यान्महादेवसमर्पणधिया सुधीः ॥ शिवार्पितानि द्रव्याणि न बंधाय न मुक्तये ॥ ७ ॥ साक्षाच्छिवप्रसादायैवेति शैवी परा स्थितिः ॥ ततोऽर्पणविधानोऽत्र सूक्ष्मासूक्ष्मविभेदतः ॥८॥ विधीयते स-

---

### अर्पणसद्भाव नांवाचें सातवें अधिकरण.

(१) कोणतेंहि कर्म करून तें कर्म लिंगाला अर्पण केलें असतां त्या कर्माचा लेप मनुष्यास होत नाहीं. ह्मणून आह्मीं शिवोक्त लिंगार्पणसद्भावविधि आतां थोडासा सांगतों. (२) क्रियामार्गानें अर्पण करणें यास क्रियार्पण व ज्ञानमार्गानें अर्पण करणें ह्यास ज्ञानार्पण असें ह्मणतात; ह्याप्रमाणें लिंगार्पणसद्भाव दोन प्रकारचा आहे असें श्रेष्ठ वीरशैवाचार्यांचें वचन आहे. (३) यथाकालोचित व सहज प्राप्त झालेले पदार्थ आपल्या भोगाकरितां भक्तिपुरःसर भावलिंग, प्राणलिंग व इष्टलिंग ह्या तीन लिंगांस अर्पण करणें (४।५) ह्यास सद्भावार्पण जाणणारे लोक क्रियार्पण असें ह्मणतात. सर्व ऋतूंमध्यें सर्वत्र उत्पन्न होणारे पदार्थ आपोआप आलेले आहेत असें जाणून आपण उपभोगाची इच्छा न करितां महालिंग, प्रसादलिंग, चरलिंग, शिवलिंग, गुरुलिंग, आचारलिंग ह्या सहा लिंगांस त्या त्या इंद्रियमुखानें जें अर्पण करणें त्यास ज्ञानार्पण असें ह्मणतात. (६) आतां द्रव्य शुद्ध होण्याकरितां क्रियार्पणविधि सांगतों. भक्ताला जी जी क्रिया सांप्रत करावयाची असेल (७) ती ती क्रिया प्रथमतः परमेश्वराला अर्पण करण्याच्या बुद्धीनें करावी. कोणतीहि क्रिया परमेश्वराला अर्पण केली असतां त्या क्रियेपासून बंध किंवा मोक्ष न होतां (८।९) केवळ शिवाचा प्रसाद मात्र होतो. याप्रमाणें वीरशैवांची स्थिति आहे. ह्या आत्म्याच्या नित्य उपभोगाकरितां स्थूल व सूक्ष्म ह्या भेदांनीं अर्पण-

दैवास्य स्वोपभोगाय चात्मनः ॥ आत्मोपभोगजातानि द्रव्याणि त्रिविधानि हि ॥ ९ ॥ स्थूलाख्यं प्रविविक्ताख्यमानंदाख्यमिति त्रिधा ॥ स्थूलद्रव्यं भवेद्रूपं प्रविविक्तं रुचिर्भवेत् ॥ १०॥ आनदंस्तु भवेत्तृप्तिरेवमेव पृथक् क्रमात् ॥ बहिरंगार्पणे रूपमंतरंगार्पणे रुचिः ॥११ ॥ आत्मसंगमयं साक्षादानंदार्पणमुच्यते ॥ आत्मांगार्पणमेवात्र तृप्तिरित्यभिधीयते ॥१२॥ रूपद्रव्यार्पको विश्व इष्टलिंगे स्वभावतः ॥ रुचिद्रव्यार्पकस्साक्षात्प्राणलिंगे तु तैजसः ॥ १३ ॥ भावलिंगे सदाप्राज्ञ आनंदार्पक उच्यते ॥ यद्रूपमर्पितं लिंगे तद्रूपं भोक्तुमर्हति ॥१४॥ रूपांतरं न भोक्तव्यं भुक्तं चेत्तदनर्पितं ॥ यथा भुक्तिक्रिया पुंसि क्रमेणानुप्रवर्तते ॥१५॥ सुप्रतिष्ठितलिंगस्य न यथा पूर्वभावना ॥ तथा शिवप्रसादस्य पूर्वनाम न संस्मरेत् ॥१६॥ पूजादौ पूजांते भवेदयं भक्तितः पदार्थतनुः ॥ पूजा-

---

विधान सांगतात. आत्मोपभोगाकरितां उत्पन्न झालेले पदार्थ तीन प्रकारचे आहेत (१०) तीं पदार्थद्रव्यें स्थूल, प्रविविक्त, व आनंद, अशीं तीन प्रकारचीं आहेत. रूप हें स्थूलद्रव्य आहे. रुचि हें प्रविविक्त द्रव्य आहे. (११) तृप्ति आनंदद्रव्य आहे. याप्रमाणें निरनिराळीं तीन प्रकारचीं द्रव्यें आहेत. रूपद्रव्य बाहेरच्या अंगास अर्पण करावें. अंतरंग ह्मणजे आंतल्या (सूक्ष्म) अंगीं रुचिद्रव्य अर्पण करावें. (१२) जीव व शिव ह्यांच्या संयोगरूपी आनंदार्पणाला आत्मांगार्पण असें ह्मणतात व त्या आनंदार्पणालाच तृप्ति असें ह्मणतात. (१३) विश्व या नांवाचा जीव इष्टलिंगाला साहजिकपणें रूपद्रव्य अर्पण करितो. तैजसनामक जीव साक्षात प्राणलिंगाला रुचिद्रव्य समर्पण करितो (१४) प्राज्ञजीव भावलिंगाला नेहमीं आनन्दार्पण करितो. जें द्रव्य लिंगाला अर्पण केलें असेल तेंच द्रव्य आपण उपभोगण्याला योग्य होतें. (१५) ईश्वराला अर्पण न केलेलें द्रव्य आपण सेवूं नये अर्पण न करितां सेविलें असतां पाप आहे. एखाद्या पदार्थाचा उपभोग घेत असतांना त्या पदार्थाच्या रूपानें मनुष्याला थोडासा संतोष होतो मग त्या पदार्थांतील गोडीनें त्याहून अधिक संतोष होतो. तृप्तीनें त्यापेक्षांही अधिक आनंद होतो. त्याप्रमाणें परमेश्वरालाहि संतोष होतो. (१६) पाषाणाचें लिंग करून शास्त्रोक्तविधीनें स्थापन केलें असतांना त्या लिंगाच्या ठिकाणीं जशी पाषाणबुद्धि नसावी त्याप्रमाणें परमेश्वरास समर्पण केलेले सर्व भोग्य पदार्थ प्रसादरूपी होतात; ह्मणून त्या पदार्थांच्या ठिकाणीं पूर्वीची ह्मणजे भात, खीर, वगैरेंची भावना भक्तांनीं करूं नये. केवळ शिवाचा प्रसाद ह्मणूनच त्यांचें भक्षण करावें. (१७) पूजेस आरंभ होऊन

ते पूजादौ प्रपदेत्पुनरेष हि प्रसादतनुम् ॥ १७ ॥ पदार्थकायः पूजायां भक्तो भक्तिप्रभावतः ॥ प्रसादकायः पूजांते पुनः पूजाक्रियावधि ॥१८॥ यद्रूपं वस्तु नामार्चाकाले लिंगमुखार्पितं ॥ तद्रूपं पुनरर्चाकालपर्यंतं प्रसादकं ॥१९॥ लिंगस्य पूजावसरे द्रव्यं दत्तं शुभं भवेत् ॥ अनावसरिकं दत्तमशुभं तदनर्पितं ॥ २० ॥ लिंगस्यावसरे यत्तद्रव्यं दत्तं शुभं भवेत् ॥ आत्मनोऽवसरे दत्तमशुभं तदनर्पितं ॥२१॥ इष्टलिंगार्पितं शुद्धं प्राणलिंगमुखार्पितं ॥ सिद्धं ततः प्रसिद्धं हि भावलिंगार्पितं विदुः ॥२२॥ तत्तदर्पणतो लब्धं प्रसादं तत्तदादरात् ॥ भुंक्ते यत्नात्स्वयं विश्वतैजसप्राज्ञरूपतः ॥२३॥ जाग्रत्स्वप्नसुषुप्त्यादिसर्वावस्थासु सर्वदा ॥

---

पूजा संपेतोंपर्यंत भक्त सर्व पूजाद्रव्य भक्तीनें समर्पण करतो ह्मणून पूजाकालीं पूजाद्रव्यच भक्ताचें शरीर ह्मटलें आहे. पूजा संपल्यानंतर जेव्हां हा शिवभक्त परमेश्वराच्या प्रसादाचें सेवन करतो त्यावेळेपासून पुनः पूजारंभ करीपर्यंत त्या वीरशैवाचें शरीर प्रसादच होय. (१८) येणेंप्रमाणें वीरशैव आपल्या भक्तीच्या प्रभावानें पूजेच्या वेळीं पदार्थकाय ह्मणजे (पूजा पदार्थच ज्याचा देह आहे) असा होतो. पूजेच्या शेवटापासून पुनः पूजा करीपर्यंत प्रसादकाय ह्मणजे (प्रसादच ज्याचें शरीर आहे.) असा होतो. (१९) पूजा करितांना लिंगाच्या मुखामध्यें समर्पण केलेलें रूपद्रव्य पूजा करण्याच्या वेळीं ज्या रूपाची वस्तु शिवलिंगमुखीं अर्पण केली जाते त्याच रूपानें ती वस्तु पुनः पूजारंभ करीपर्यंत प्रसादरूप असते. (२०) लिंगाची पूजा करितांना कोणा एका शिवभक्तानें कोणताहि पदार्थ दिला असतां तो शुभ होय. पूजेची वेळ नसून एखादा पदार्थ शिवभक्तानें दिला तर तो पदार्थ शिवार्पित नसल्यामुळें अशुभ आहे. (२१) लिंगपूजेच्या वेळीं अपेक्षित वस्तु आणून दिली असतां शुभदायक आहे, परंतु पूजाकाल नसतां आत्मभोगाकरितां दिलेली वस्तु लिंगार्पित नसल्यामुळें अशुभ आहे. (२२) इष्टलिंगाला अर्पण केलेलें द्रव्य (पदार्थ) शुद्ध प्रसाद होतो; प्राणलिंगाला अर्पण केलेलें द्रव्य सिद्धप्रसाद होतो; व भावलिंगाला अर्पण केलेलें द्रव्य प्रसिद्धसंज्ञक प्रसाद होतो. (२३) इष्टलिंग, प्राणलिंग, व भावलिंग ह्यांस अर्पण करून अनुक्रमानें प्राप्त झालेले शुद्ध, सिद्ध, व प्रसिद्ध हे प्रसाद जीवात्मा, विश्व, तैजस, व प्राज्ञ अशा तीन रूपांनीं भक्तिपुरःसर स्वीकारितो ( विश्वरूपजीव इष्टलिंगाच्या शुद्ध प्रसादाचा, तैजसजीव प्राणलिंगापासून प्राप्त झालेल्या सिद्ध प्रसादाचा व प्राज्ञजीव भावलिंगाच्या प्रसिद्ध प्रसादाचा आदरानें उपभोग घेतो. ) (२४) जागृत, स्वप्न, सुषुप्ति,

**लिंगार्पितोपभोगेन निर्लेपोऽयं न संशयः ॥२४॥ त्रिषु धामसु यद्भोग्यं भोक्ता भोगश्च यो भवेत् ॥ त्रिविधं प्रति यो वेद स भुंजानो न लिप्यते ॥ २५ ॥ ज्ञानार्पणमतो वक्ष्ये स्वानुभूत्यैकगोचरं ॥ सर्वेंद्रियमुखागामि-द्रव्यदोषनिवृत्तये ॥२६॥ सोऽयं षट्स्थलरूपेण तत्तल्लिंगमुखार्पितं ॥ प्र-सादमादरेणैव स्वतस्सिद्धं समश्नुते ॥२७॥ षडक्षरात्मके लिंगे सर्वांगे सुप्रतिष्ठिते ॥ तत्रैव चार्पितं सर्वमित्याहुः श्रुतयः खलु ॥२८॥ ओमिति जगदखिलं स्यान्नम इति न ममेदमपि शिवायेति ॥ समर्पकोऽयं मंत्रः ष-डक्षरो मंत्रनायको जयति ॥२९॥ न ममेदं जगत्सर्वं शिवायेति शिवार्प-णं ॥ अभिधत्ते द्विमात्राढ्यो मंत्रो लुप्तमकारकः ॥ ३० ॥ तस्मादर्पणस-द्भावज्ञानमेव समभ्यसेत् ॥ अथ गंधो रसो रूपं स्पर्शः शब्दस्ततः परं ॥३१॥ परिणामः पदार्था हि षडेते सार्वकालिकाः ॥ एकैकस्य पदार्थ-**

---

तुर्य, तुर्यातीत ह्या सर्व अवस्थांमध्यें तो जीवात्मा नित्य लिंगार्पित पदार्थांचें सेवन करीत असतांहि तो निःसंशय निर्लेप असतो. ( कर्मफलबद्ध होत नाहीं. ) (२५) इष्टलिंग, प्राणलिंग, भावलिंग ह्या तीन लिंगस्थलांत भोग्य कोणतें, भोक्ता कोण, व भोग ह्मणजे काय हें तीन प्रकारें त्रिपुटिज्ञान नीट समजून घेऊन जो भोग्य वस्तूचा उपभोग घेतो तो निर्लेप असतो ( त्यास कर्मबंध नाहीं हें तात्पर्य आहे). येथें क्रियार्पण संपूर्ण झालें. (२६) इंद्रियद्वारा दुष्ट पदार्थ सेवन केल्याचा दोष नि-वारण होण्याकरितां अनुभवानेंच केवळ समजला जाणारा हा ज्ञानार्पणाचा प्रकार आतां सांगतों. (२७) तोच परमेश्वर षट्स्थल रूपानें त्या त्या लिंगाला अर्पण के-लेला स्वतः सिद्ध, प्रसाद आदरानें उपभोग करितो. (२८) लिंग हें षडक्षरमं-त्ररूपी असून सर्वांगाच्या ठिकाणीं स्थापित आहे. त्या मंत्ररूपी लिंगास सर्व पदा-र्थांचें समर्पण होतें असें श्रुति सांगतात. (२९) ॐनमः शिवाय असा षडक्षरमंत्र आहे. या मंत्राचा अर्थ असा होतो कीं, ॐ ह्मणजे हें सर्व जग; नमः ह्मणजे माझें नव्हें; शिवाय ह्मणजे शिवाकरितां आहे; त्याप्रमाणें जगांतील सर्व पदार्थ परमेश्वराला समर्पण करणारा हा षडक्षर मंत्र सर्व मंत्रांमध्यें उत्कृष्ट आहे. (३०) सर्व जग माझें नव्हें. शिवाकरितां आहे ह्मणून सर्व पदार्थांचें शिवार्पण दोन मा-त्रांपासून प्राप्त होतें. अथवा नमः याच्या जागीं नमम असें असावें परंतु तसें नाहीं ह्मणून एक प्रकारचा लोप झाला आहे असें ह्मटलें पाहिजे. (३१) त्याकरितां अर्पण सद्भावच्या ज्ञानाचा अभ्यास करावा, नंतर गंध, रस, रूप, स्पर्श, शब्द. (३२) परिणाम असे हे सहा पदार्थ सर्व कालीं राहणारे आहेत. या प्रत्येक पदा-

स्य नानाभेदाः पृथक् पृथक् ॥३२॥ गंधादय इमे मात्राः पृथ्व्यादीनामनुक्रमात् ॥ एकस्मिन्वस्तुनि रतास्ते सर्वे ह्येकरूपतः ॥ चंदनादिमयो गंधो मधुरादिमयो रसः ॥३३॥ वैद्युतादिमयं रूपं स्पर्शो मृद्वादितन्मयः ॥ स्यान्नादादिमयः शब्दः परिणामस्ततः परः ॥३४॥ सुखादिमय इत्येवं नाना भेदाः प्रकीर्तिताः ॥ एवंभूतेषु सर्वेषु पदार्थेषु निरंतरं॥३५॥ लिंगार्पणधिया ह्यात्मा प्रसादसुखमश्नुते ॥ द्रव्याण्येतानि सर्वाणि विभज्य स्वस्वरूपतः ॥ लिंगार्पणधिया भुंक्ते तानि वस्तूनि सर्वदा ॥३६॥ भक्तोऽयमात्मा स्वयमेव गंधमाचारलिंगार्पितमादरेण ॥ भुंक्ते सदा सन्निहितस्वभावात्प्रसादरूपेण समागतं हि ॥३७॥ माहेश्वरोऽयं गुरुलिंगमूर्तेर्मुखे सदैवार्पितमाकलय्य ॥ प्रसादभूतं रसमानुकूल्य स्वभावतस्सादरमेव भुंक्ते ॥३८॥ रूपं पदार्थं शिवलिंगवक्त्रे समर्पितं संततमेव भक्त्या ॥ स्वयं समायातमुपाधियोगादयं प्रसादी भजते प्रसादं ॥३९॥ स्पर्शस्समादाय बहुप्रकारं समर्पितं यच्चरलिंगवक्त्रे ॥ भुंक्ते प्रसादा-

---

र्थांचे निरनिराळे पुष्कळ भेद होतात. (३३) गंध वगैरे पांच मात्रा, पृथ्वी वगैरे पंच महाभूतांचे गुण असून अनुक्रमानें आपआपल्या आश्रयाच्या ठिकाणीं एकरूप होऊन राहतात. चंदनादि द्रव्यांच्या रूपानें राहणारा गंध; मधुरादि द्रव्यरूपानें असणारा रस; (३४) वीज वगैरेंच्या रूपानें असणारें रूप; मृत्तिका, पाणी वगैरेंच्या रूपानें असणारा स्पर्श; नादादिरूपी शब्द पंचमात्रांहून भिन्न असलेला परिणाम (३५) सुखादिरूपी आहे. ह्याप्रमाणें पदार्थांचे अनेक भेद सांगितले आहेत. ह्याप्रमाणें हे सर्व पदार्थ निरंतर (३६) लिंगार्पित आहेत अशा समजुतीनें हा जीवात्मा लिंगप्रसाद ह्मणून त्यांचा उपभोग घेतो. ह्याप्रमाणें सर्व पदार्थांचा विभाग करून हा जीवात्मा आपल्यास अनुकूल असेल त्याप्रमाणें नित्य लिंगार्पणबुद्धीनें त्या पदार्थांचा उपभोग घेतो. (३७) हा भक्तरूपी जीवात्मा नेहमीं शिवाच्या संनिध राहून आपोआप प्राप्त झालेला गंध आचारलिंगास अर्पण करून मग आचारलिंगाचा प्रसाद ह्मणून तो गंध ग्रहण करतो. (३८) हा माहेश्वररूपी जीवात्मा रस मिळाला असतां तो गुरुलिंगाला अर्पण करून मग आपण प्रसादबुद्धीनें त्याचा उपभोग घेतो. (३९) रूप परमेश्वराच्या इच्छेनें आलें असतां तें शिवलिंगास भक्तीनें अर्पण करून उपाधियोगानें झालेला हा प्रसादी जीवात्मा शिवलिंगाचा प्रसाद ह्मणून तें घेतो. (४०) हा प्राणलिंगी जीवात्मा अनेक प्रकारचा स्पर्श

त्मतयोपलब्धं यः प्राणलिंगी स्वयमेवमात्मा ॥४०॥ य एष नित्यं शरणस्थलात्मा प्रसादलिंगार्पितमेव शब्दं ॥ स्वयं गृहीत्वा विविधोपदिष्टं प्रसादभोगं कुरुते स्वभावात् ॥४१॥ ऐक्यात्मकोऽयं परिणामवस्तु सदा महालिंगसमर्पितं हि ॥ स्वभावसिद्धं निजभक्तियोगान्निषेवते तृप्तिघनप्रसादं ॥४२॥ एवं षडंगस्थलरूपतोऽसौ स्वस्मिन् स्थिते षड्विधलिंगतत्त्वे ॥ समर्पितं षड्विधवस्तुजातं प्रसादरूपेण सदैव भुंक्ते ॥४३॥ आचारायार्पिता पृथ्वी गुरोरापस्समर्पिताः ॥ शिवाय चार्पितं तेजश्चराय मरुदर्पितः ॥ प्रसादायार्पितं व्योम जीवात्मा महतेऽर्पितः ॥४४॥ आचारे दिव्यलिंगे निरुपमनिजभक्तस्थलांगैक्यभाजि घ्राणाख्ये चित्तहस्तेन च घनसुखहेतौ क्रियाशक्तियुक्ते ॥ घ्रातव्यं द्रव्यमप्यर्पणविषयविधानोपदिष्टं समर्प्य प्रायस्सद्भक्तिपूर्णस्स्वयमयमिह गंधप्रसादं भजेत ॥४५॥ स्वांगे माहेश्वरात्मन्यनुपमसहजज्ञानशक्तिप्रयुक्ते जिव्हास्ये सुप्रसिद्धे परतरगुरुलिंगाभिदे संस्थितेऽस्मिन् ॥ निष्ठाभक्तिप्रभा-

---

चरलिंगाला अर्पण करून त्याचा प्रसाद असें समजून स्पर्शाचा उपभोग घेतो. (४१) शरणस्थलजीवात्मा प्रसादलिंगास शब्द समर्पण करून अनेक वस्तूंपासून उत्पन्न झालेला शब्द भक्तीनें प्रसाद ह्मणून सेवन करितो. (४२) ऐक्यात्मक जीवात्मा महालिंगास परिणामवस्तूचें नित्य समर्पण करून आपल्या भक्तीनें सहज सिद्ध झालेला तृप्तिरूपप्रसाद सेवन करितो. (४३) याप्रकारें षट्स्थलरूपानें हा जीवात्मा आपल्या ठिकाणीं राहणाऱ्या सहा लिंगांस अर्पण करून सहा प्रकारच्या वस्तूंचा प्रसादरूपानें नेहमीं उपभोग घेतो. (४४) पृथ्वी आचारलिंगाला अर्पण केलेली आहे. पाणी गुरुलिंगास अर्पण केलेलें आहे. तेज शिवलिंगास अर्पिलेलें आहे. वायु चरलिंगास अर्पित आहे. आकाश प्रसादलिंगास अर्पिलेलें आहे. या जीवात्म्याचें समर्पण महालिंगास केलें आहे. (४५) आपल्या निरुपम अशा भक्तस्थलांगाशीं ऐक्य पावणाऱ्या, नित्यसुखदायक, क्रियाशक्तियुक्त व नासिका आहे मुख ज्याचें अशा मनोहर आचारलिंगाला सद्भक्तिपूर्ण अशा भक्तरूपी जीवात्म्यानें चित्तरूपी हस्तानें ज्ञानार्पणविधींत सांगितल्याप्रमाणें गंधद्रव्य अर्पण करून आपण बहुशः त्या आचारलिंगाकडून प्राप्त झालेला गंधप्रसाद घेतो. (४६) माहेश्वरनामक आपल्या अंगस्थलांत राहिलेल्या; अनुपम व साहजिक अशा ज्ञानशक्तीनें युक्त; जिव्हा ज्याचें मुख आहे अशा सुप्रसिद्ध व श्रेष्ठ अशा गुरुलिंगाला निष्ठाभक्तीनें प्रे-

वप्रणिहितसुमहाबुद्धिहस्तेन विद्वान् रस्यं द्रव्यं समर्प्य स्वयममलर-
साख्यं प्रसादं भजेत ॥ ४६ ॥ योऽसौ नित्यं प्रसादिस्थलपरमपदप्राप्त-
दिव्यांगभाजि स्वेच्छाशक्तिप्रयुक्ते दृशि जगति मुखे पाणिनाऽहंकृतेन ॥
साक्षाल्लिंगे शिवाख्ये सविनयमवधानात्मताभक्तियुक्तो द्रष्टव्यांशं स-
मर्प्यार्पणविनिहितरूपप्रसादं भजेत ॥४७॥ संसक्ते प्राणलिंगिस्थलनि-
हितनिजांगे मनःपाणिनाऽसौ लिंगे साक्षाच्चराख्ये त्वचि जगति मुखे
ह्यादिशक्तिप्रयुक्ते ॥ स्प्रष्टव्यं चार्पयित्वा स्वयमनुभवभक्तिप्रभावोपपन्नो
नित्यं स्पर्शप्रसादं निरतिशयसुखं तत्त्ववेत्ता भजेत ॥ ४८ ॥ लिंगे सा-
क्षात्प्रसादे विमलशरणसंज्ञांगसंस्थापितेऽस्मिन् श्रोतव्यं श्रोत्रवक्त्रे
निखिलमिह पराशक्तियुक्ते समर्प्य ॥ आनंदाकारभक्तिस्फुटतरपरमज्ञा-
नहस्तेन सोऽयं शब्दाख्यं तत्प्रसादं स्वयमविरतमत्याश्रमस्थो भजेत
॥४९॥ ऐक्यांगं भाजि लिंगे महति हृदि मुखे चिन्महाशक्तियुक्ते नित्यं
भावेन हस्तेन च समरसभक्तिप्रसक्तः स्वयं सन् ॥ स्मर्तव्यं चार्पयित्वा

---

रित झालेल्या बुद्धिहस्तानें विद्वान् माहेश्वरजीवात्मा रसद्रव्य समर्पण करून त्या गुरुलिंगाकडून प्राप्त झालेला रसरूपी प्रसाद घेतो. (४७) प्रसादरूपी अंगस्थलांत राहणाऱ्या; इच्छाशक्तियुक्त; दृष्टि आहे मुख ज्याचें अशा शिवलिंगाला अहंकाररूपी हस्तानें अवधानभक्तिविशिष्ट जीवात्म्यानें विनयपूर्वक रूपद्रव्य समर्पण करून त्या शिवलिंगापासून प्राप्त झालेला अर्पणविधानोक्तरूप प्रसाद घेतो. (४८) प्राणलिंगि नांवाच्या अंगस्थलांत असणाऱ्या त्वचा ( कातडी ) आहे मुख ज्याचें; आदिशक्तिविशिष्ट, अशा चरलिंगाला मनरूपी हस्तानें अनुभवभक्तियुक्त तत्त्ववेत्ता जीवात्मा स्पर्शद्रव्य नित्य स्वतः अर्पण करून त्या चरलिंगापासून प्राप्त झालेला अत्यंत सुखयुक्त स्पर्शप्रसाद ग्रहण करितो. (४९) शरणसंज्ञक अंगस्थलांत राहणाऱ्या; पराशक्तियुक्त व श्रोत्र ( कान ) आहे मुख ज्याचें अशा प्रसादलिंगाला आनंदाकारसंज्ञक भक्तीनें प्रेरित झालेल्या ज्ञानरूपी हातानें अत्याश्रमी जीवात्मा श्रवण करावयाचे सर्व पदार्थ ( सर्व शब्द ) समर्पण करून त्या प्रसादलिंगापासून प्राप्त झालेला शब्दप्रसाद नित्य ग्रहण करितो. (५०) ऐक्यसंज्ञक अंगस्थलांत असणाऱ्या; हृदय आहे मुख ज्याचें; व श्रेष्ठ चिच्छक्तीनें युक्त अशा महालिंगाला भावरूपी हातानें समरसभक्तियुक्त व सूक्ष्मबुद्धि जीवात्मा नित्य अर्पण करण्यास योग्य असा स्मरण पदार्थ समर्पण करून त्या महालिंगापासून प्राप्त झा-

विशदमतिरवश्यं सदैवार्पणीयं तस्माल्लब्धं विशुद्धं घनतरपरिणामप्रसादं भजेत ॥५०॥ अंगं च लिंगं च मुखं च हस्तो भक्तिश्च शक्तिश्च तथार्पणं च ॥ प्रसाद इत्यष्टविधस्थलानि प्रतिस्थलं षट्स्थलसंज्ञितानि ॥५१॥ अंगं च लिंगं च सदेव जातं भक्तिश्च शक्तिश्च तथा चिदेव ॥ आनंद एव स्वयमर्पणं च प्रसादरूपं च भवेत्रितत्त्वं ॥५२॥ सवितुः पदमंगं स्याद्भर्गपदं लिंगमेव संबंधः ॥ धीमहिपदमित्येषा गायत्र्याहांगलिंगसंबंधं ॥५३॥ जीवस्सविता देवः परमो भर्गस्तदर्थकं वरणीयं ॥ अनयोरैक्यं धीमहिपदमेषा प्राह जीवपरमैक्यं ॥५४॥ अंगं जीवः परमो लिंगं संबंध एव तादात्म्यं ॥ तद्वत्पदार्थरूपं प्रसादरूपं समर्पणं त्रिविधं ॥५५॥ पदार्थरूपो जीवश्च प्रसादः परमो भवेत् ॥ समर्पणं च तादात्म्यमिति शैवी परा स्थितिः ॥५६॥ एकधा च त्रिधा षड्धा नवधा च प्रवर्तते ॥ स्वयमेव परं लिंगं न ततोन्यच्च किंचन ॥५७॥ नवलिंगान्याविज्ञाय

---

लेला, शुद्ध व श्रेष्ठ परिणामप्रसाद ग्रहण करितो. (५१) अंग, लिंग, मुख, हस्त, भक्ति, शक्ति, अर्पण, आणि प्रसाद हीं आठ स्थलें प्रत्येक स्थलामध्यें असून त्यांस षट्स्थल अशी संज्ञा आहे. (५२) अंग व लिंग हीं दोन्ही सत् आहेत. भक्ति व शक्ति हीं दोन्हीं चित् आहेत; अर्पण व प्रसाद हीं दोन्ही आनंद आहेत. येणेंप्रमाणें सत्, चित्, आनंद, ह्मणून तीन तत्त्वें होतात. (५३) गायत्रीमंत्रामध्यें " सवितुः " या पदाचा अर्थ अंगस्थल होय; " भर्ग " या पदाचा अर्थ लिंगस्थल आहे; " धीमहि " या पदाचा अर्थ लिंगांगसंबंध ( शिवजीवैक्य ) होय. येणेंप्रमाणें गायत्रीमंत्रामध्यें लिंगांगसंबंध सांगितला आहे. (५४) आणि सवितादेव ह्मणजे जीव, भर्ग ह्मणजे परमशिव, तोच वरेण्य ह्मणजे वरण्यास योग्य ( उपास्य ); या दोघांचें ऐक्य " धीमहि " ह्या पदानें सांगितलें आहे. यावरून गायत्रीमध्यें जीव व शिव या दोघांचें ऐक्य प्रतिपादन केलें आहे. (५५) जीव हा अंग आहे; परशिव हा लिंग आहे या दोघांचा संबंध तादात्म्य ( अभेद ) आहे. त्याचप्रमाणें पदार्थ, प्रसाद व समर्पण या तिहींचा संबंध आहे. (५६) जीव हा पदार्थ आहे; शिव हा प्रसाद आहे; समर्पण हें जीवशिवरूप पदार्थप्रसादाचें तादात्म्य आहे. याप्रमाणें वीरशैवांचा सिद्धांत आहे. (५७) तें परलिंग स्वतः एक असून प्रथम तीन प्रकारचें झालें, मग सहा प्रकारचें झालें, नंतर नऊ प्रकारचें झालें; लिंगच सर्व कांहीं आहे, त्याहून वेगळें कांहींच नाहीं. (५८) नऊ लिंगें व

तन्मुखान्यर्पणानि च ॥ कथं निर्लेपतामेति सर्वेष्विंद्रियकर्मसु ॥ ५८ ॥ लेपोऽज्ञं न जहेज्जातु तज्ज्ञं स्पृशति न क्वचित् ॥ सर्पिषा लिप्यते पाणी रसना नैव लिप्यते ॥५९॥ यथा कालिकया दृष्टौ संपृक्ताऽपि न लिप्यते ॥ पक्ष्मणोरंतरा तारा तथा सम्यक्शिवात्मवित् ॥ ६० ॥ शरीरादिपदार्थांश्च दत्वा दानं समर्पणं ॥ समर्प्य सोऽहमस्मीति दासोहंभाव उच्यते ॥ ६१ ॥ इंद्रियादागतं किंचिद्यत्सुखं तच्छिवार्पितं ॥ तत्प्रसादं तु भोक्तव्यं तदिंद्रियमुखेन च ॥६२॥ येन गंधरसौ रूपस्पर्शशब्दरतिक्रियाः ॥ एतेनैव विजानाति किमत्र परिशिष्यते ॥६३॥ एवं लिंगार्पितं सर्वमिति यो वेत्ति तत्त्वतः ॥ सोऽश्नुते सकलान् भोगान्विपश्चिद्ब्रह्मणा सह ॥ ६४ ॥ लिंगदेही शिवात्मायं लिंगाचारो न लौकिकः ॥ सर्वं लिंगमयं रूपं लिंगेन सममश्नुते॥६५॥ सर्वांगलिंगमेव स्यादन्नपानाद्यमर्पितं ॥ प्रसादस्तृप्तिरेव स्यात्सर्वं लिंगमयत्वतः ॥६६॥ एतदर्पणसद्भावज्ञानं वेदांतवाक्यजं॥ गुरूपदेशतस्साध्यं नान्यथा शास्त्रकोटिभिः॥६७॥

---

त्यांचीं मुखें आणि अर्पण हीं समजल्याशिवाय हा जीव कर्मबंधापासून मुक्त होत नाहीं. (५९) अज्ञानी मनुष्याला नित्य कर्मबंध आहे. ज्ञानी मनुष्याला कर्मबंधाचा कधींही स्पर्श होत नाहीं. जसा हाताला तुपाचा लेप होतो तसा जिभेला होत नाहीं. (६०) ज्याप्रमाणें काजळ डोळ्यास लाविलें असतां आंतील बुबूळ काजळानें काळें होत नाहीं त्याप्रमाणें शिवतत्त्वज्ञानी कर्मानें लिप्त होत नाहीं. (६१) शरीर वगैरे सर्व पदार्थ शिवास अर्पण करणें हेंच महादान होय; तोच मी आहें, असें समजणें हाच दासभाव असें शास्त्रांत सांगितलें आहे, (६२) इंद्रियजन्यसुख प्रथम शिवार्पण करून नंतर तें प्रसाद ह्मणून त्याच इंद्रियमुखानें ग्रहण करावें. (६३) गंध, रस, रूप, स्पर्श, शब्द हा पंचविषयानुभव इंद्रियजन्य आहे व सर्व इंद्रियें शिवलिंगात्मक आहेत असें आत्म्यास ज्ञान झालें असतां बाकी अज्ञेय असें काय राहिलें आहे. (६४) याप्रमाणें सर्व लिंगार्पित आहे असें जो खरोखर समजतो तो ब्रह्मासहवर्तमान सगळे भोग भोगितो. (६५) लिंगधारी साक्षात् शिवच होय. लिंगाचार लौकिक नाहीं हा जीवात्मा सर्व लिंगरूपी वस्तुमात्राचा लिंगासहवर्तमान उपभोग घेतो. (६६) अन्नपानादि सर्व अर्पितपदार्थ लिंगमय आहेत व सर्व लिंगमय असल्यामुळें प्रसाद ह्मणजे तृप्ति असें समजावें. (६७) वेदांतांत सांगितलेलें हें अर्पणसद्भावज्ञान गुरूच्या उपदेशानें मिळतें केवळ शास्त्र पढल्यानें

**श्रीलिंगार्पणसद्भावमवोचं परमार्थतः ॥ आर्पितं च प्रसादं च भोगं नि-र्लेपतां प्रति ॥६८॥ एतद्यो वेद सोऽविद्याग्रंथिं विकिरति प्रभुः ॥ शिव-सिद्धांतकं तंत्रं शिवाद्वैतं शिवं पदं ॥६९॥**

**इति श्रीवातुलोत्तरतंत्रे शिवानुभवसूत्रे षट्स्थलनिर्णये लिंगार्पण-सद्भावो नाम सप्तमाधिकरणं संपूर्णम् ॥**

---

मिळणार नाहीं. (६८) अर्पण, प्रसाद, भोग, निर्लेपत्व ह्यांना उद्देशून हा लिंगा-र्पणसद्भाव मीं यथार्थ सांगितला आहे. (६९) हें शिवाद्वैतप्रतिपादक व मोक्षप-ददायक शिवसिद्धान्तशास्त्र जो जाणतो तो समर्थ मनुष्य अज्ञानापासून मुक्त होतो.

ह्याप्रमाणें वातुलागमांतील उत्तरतंत्रांतील शिवानुभवसूत्राच्या षट्स्थलनिर्णयां-तील लिंगार्पणसद्भावनांवाचें सातवें अधिकरण समाप्त झालें.

Indira Gandhi National
Centre for the Arts



## अथ अष्टमाधिकरणे क्रियाविश्रांतिः

क्रियाविश्रांतिमाचक्षे साक्षादीश्वरभाषितां ॥ देव्यै रहस्यरूपेण तामिदानीं समासतः ॥१॥ अस्यात्मनः क्रियास्सर्वा लिंगार्पिततया स्थिताः ॥ स्वस्मिन्नेव स्वयं यांति विश्रांतिं सुखलक्षणां ॥२॥ प्रोच्यते परमार्थज्ञैः क्रियाविश्रांतिरित्यतः ॥ क्रियाविश्रांतिरेवात्र सम्यग्ज्ञानं न संशयः ॥३॥ सम्यग्ज्ञानमहं साक्षाच्छिव एवेति वेदनं ॥ वेदनेनैव तेनायमाप्तकामः सुखी भवेत् ॥४॥ आप्तकामस्य सुखिनः कामाचारा बहिर्मुखाः ॥ प्रवृत्ता लौकिकास्सर्वे प्रययुर्नाशमात्मनि ॥ ५ ॥ प्रनष्टेष्वेषु सर्वेषु स्वेच्छाचारेण यत्कृतं ॥ तच्छिवार्चनमेव स्याद्यद्भुक्तं तच्छिवार्पितं ॥६॥ शिवरूपतया सर्वं यस्य भाति स्वरूपतः ॥ स्वेच्छाचारसमाचारः तस्य चार्चा हि शूलिनः॥७॥ एवमर्चनमीशस्य स्वेच्छाचारनिबंधना ॥ भवत्येव न संदेहः शिवोऽहमिति वेदनात् ॥८॥ अहमिति शिव एव सत्यचिद्धनः स्फुरति तदा पृथगस्ति नैव वस्तु ॥ इदमिति वपुषा न

---

### क्रियाविश्रांति नांवाचें आठवें अधिकरण.

(१) साक्षात् परमेश्वरानें पार्वतीला रहस्यरूपानें जो क्रियासमाप्तीचा प्रकार सांगितला तो प्रकार मी आतां संक्षेपानें सांगतों. (२) ह्या जीवात्म्याच्या सर्व क्रिया लिंगास अर्पण केल्या असल्यामुळें त्या आपोआप सुखरूप विश्रांति पावतात. (३) ह्मणूनच तत्त्ववेत्त्यांनीं क्रियासमाप्तीस क्रियाविश्रांति असें ह्मटलें आहे. क्रियाविश्रांति होणें हेंच खरोखर उत्तम प्रकारचें ज्ञान ह्मटलें जातें. (४) मी साक्षात् शिवच आहें असें समजणें हेंच उत्तम ज्ञान होय. या ज्ञानानें वीरशैव कृतकृत्य होऊन सुखी होतो. (५) ह्याप्रमाणें सर्व इच्छा पूर्ण होऊन सुखी झालेल्या शिवयोग्याचे बहिर्मुखानें ( बाह्य ) प्रवृत्त झालेले सर्व लौकिक स्वेच्छाचार स्वात्म्याच्या ठिकाणींच लय पावतात. (६) हे सर्व लौकिक क्रियाप्रकार नाहींसे झाले असतां योगी आपल्या इच्छेप्रमाणें जें कांहीं करतो तें सर्व शिवाचें अर्चनच होतें जें खातों तें शिवालाच अर्पण होतें. (७) ज्या शिवयोग्याला हें सर्व जग शिवरूप भासतें त्याचा स्वेच्छाचार ईश्वराची पूजा होते. (८) साक्षात् शिवच मी आहें असें ज्ञान झाल्यानें खरोखर योगी स्वेच्छेनें जो आचार करील तो सर्व आचार ईश्वराचें पूजनच होतें. (९) ज्याला मी सच्चिदानंद शिवच आहें असा भास होतो त्या ज्ञानी मनुष्याला जगामध्यें शिवाहून निराळी वस्तु कोणतीहि दिसत नाहीं ह्मणून त्या

तेन बंधनं नहि शरणस्य विमोचनं च किंचित् ॥९॥ बंधमुक्त्योरभावे- हि भक्तिरुक्ता निरर्गला ॥ न बंधे मोचने चापि न तयोश्च समुच्चये ॥१०॥ बंधे सति विमुक्तिः स्यात् सत्यां मुक्तौ च बंधनं ॥ अन्यस्यापगमादन्य आगमिष्यति केन चित् ॥११॥ परस्परानुबंधेन वर्तेते बंधमोचने ॥ त- स्मात्तयोरभावे तु भक्तिरुक्ता निरंकुशा ॥१२॥ न योगो न तपो नार्चा- क्रमः कोपि न विद्यते ॥ अमाये शिवमार्गेऽस्मिन् भक्तिरेका प्रशस्यते ॥१३॥ भक्तिस्सत्वगुणस्था रजोगुणाढ्या तमोगुणप्रथिता ॥ स्वातंत्र्ये- ण सलीला प्रवर्तते शिवसमर्पिता शुद्धा ॥१४॥ सत्वरजस्तमसामव्य- तिरिक्ता भक्तिरेभिरुपपन्ना ॥ स्वविशुद्धतया तानप्येकाकारान् करोति हि त्रिगुणान् ॥ १५ ॥ न राजसो गुणो भक्तौ परायां नैव तामसः ॥ न सात्विकगुणोऽपि स्यात्स्वगुणैरगुणैव सा ॥ १६ ॥ रौप्यं ताम्रम- योघनं त्रितयमेतत्सात्विकं राजसं प्रोक्तं तामसमेषु च त्रिषु विलेपं संश्रितोऽपि स्वयं ॥ कुर्यात्सिद्धरसस्स्वनिर्मलतया लोहत्रयं तद्यथा

---

शरणाला ह्या शरीरानें बंधन नाहीं व मोक्षहि नाहीं. (१०) बंध व मोक्ष ह्यांच्या अभावीं भक्ति अबाधित असते; भक्ति बंधांत वा मोक्षांत किंवा उभयतांच्या स- मुच्चयांतही असत नाहीं. (११) बंध असला तर मुक्ति होईल. मुक्ति असली तर बंध होईल. बंध किंवा मोक्ष यांपैकीं एक गेला ह्मणजे दुसरा कांहीं कारणानें येतो. (१२) याप्रमाणें बंध व मोक्ष हे दोन्ही एकमेकांला अवलंबून राहतात. त्या दो- घांच्या अभावीं स्वतंत्र भक्तीचें अस्तित्व असतें. (१३) ह्या मायारहित शैवमा- र्गांत योग किंवा तप, किंवा पूजाक्रम ह्यांतून कोणतेंही प्रशस्त नाहीं तर केवल भक्तिच प्रशस्त आहे. (१४) सात्विक, राजस, तामस, अशी तीन प्रकारची भक्ति स्वतंत्र आहे. ती भक्ति शिवाला समर्पण केली असतां निर्मळ होते. (१५) सत्व, रज, तम, या तीन गुणांहून वेगळी असलेली भक्ति या तीन गुणांनीं युक्त झाली ह्मणजे आपल्या शुद्धपणानें या तिन्ही गुणांला एकाकार करते. (१६) सत्व, रज, तम, हे तीन गुण भक्तींत नसतात. कारण भक्ति स्वभावानें निर्गुण आहे. (१७) रुपें, तांबें, व लोखंड ह्या तीन धातूंप्रमाणें सत्व, रज, व तम, हे तीन गुण आ- हेत. रुप्याला तांब्याला व लोखंडाला सिद्धरसाचा लेप झाला असतां तो सिद्धरस आपल्या स्वच्छपणानें त्या तिन्ही धातूंचें सोळा वर्णांनीं पूर्ण (उत्तम, सोळा कशी) सोनें करतो त्याप्रमाणें भक्ति आपल्या संबन्धानें त्या तिन्ही गुणांला निर्मल करिते.

स्वर्णं षोडशवर्णपूर्णमकरोद्भक्तिस्तथा त्रीन् गुणान् ॥१७॥ यथा सिद्धरसो लोहत्रयं चैकप्रकारतः॥ कुर्यात्स्वर्णं तथा भक्तिररतिः शैवं गुणत्रयं ॥१८॥ कस्तूरीहिमकुंकुमानि हि तमस्सत्वं रजो वर्णतः कृष्णं शुभ्रमथारुणं यदुपरि प्राप्ता शिवैकात्मिका ॥ भक्तिः स्वात्मगुणात्मिका जयति तत्सद्वासनारूपिणी नैर्गुण्ये परमे पदे किमिह वक्ष्ये भक्तियोगस्थितिं ॥१९॥ अहंकर्ता समस्तस्य धर्माधर्मस्य कर्मणः ॥ इत्यनेनाभिमानेन कर्मकांडोऽयमुच्यते ॥२०॥ नाहं कर्ताऽस्य कर्तृत्वं नैव साक्षी स्वभावतः ॥ इत्यनेनाभिमानेन ज्ञानकांडोऽयमुच्यते ॥२१॥ न कर्ताऽहं न साक्षी च शिव एवेति कर्मणोः ॥ द्वयाभिमानराहित्यं भक्तिकांडोऽयमुच्यते ॥२२॥ शुक्तिः कर्म पदं सरोरुहदलं ज्ञानं पदं भाक्तिकं तप्तायोघनमेषु संसृतिपयोबिंदुः स्थितस्तत्क्रमात् ॥ साफल्यं विफलत्वमाकृतितया प्रायेण नाशं गतो नाम्नाप्येव शिवात्मिकां परतरां भक्तिं कि-

---

(१८) जसा सिद्धरस तिन्ही धातूंना एकाकार करून त्यांचें सुवर्ण करतो त्याप्रमाणें भक्ति तीन गुणांना शिवात्मक करिते. (१९) सत्व, रज, तम, हे तीन गुण कस्तूरी, कापूर, व केशर ह्यांप्रमाणें कृष्ण, शुभ्र, व रक्त ह्या तीन रंगांचे आहेत; ह्या तीन गुणांवर शिवात्मक व स्वात्मगुणात्मक (परगुणस्वरूप न धारण करणारी) अशा भक्तीचा परिणाम झाला असतां ती त्यांवर वासनारूपानें राहते; त्या निर्गुण परमात्म्याच्या ठायीं राहणाऱ्या भक्तीचें माहात्म्य मी काय वर्णन करूं. (२०) धर्म किंवा अधर्म या सर्व कर्मांचा कर्ता मी आहें, असा अभिमान जीवास जेव्हां असतो तेव्हां तो कर्मकांडी असतो. (२१) मी कर्ता नव्हे मी केवळ साक्षी आहें, असा जीवात्म्याच्या ठिकाणीं अभिमान असल्यास त्यास ज्ञानकांडी ह्मणतात. (२२) मी कर्मांचा कर्ता किंवा साक्षी नाहीं शिवच कर्ता व साक्षी आहे याप्रमाणें उभयकर्मांचा अभिमान नसल्यास त्या जीवात्म्यास भक्तिकांडी ह्मणतात. (२३) जशी शिंप पाण्याचे थेंब आपल्या पोटांत घेऊन त्या थेंबांचीं मोत्यें करते. त्याप्रमाणें कर्म करणारा मनुष्य कर्मांचें सुखदुःखरूपफल भोगतो; कमळाच्या पानावर पाण्याचे थेंब पडले असतांहि जसें तें निर्लिप्त असतें त्याप्रमाणें ज्ञानयोगी कर्म करून देखील कर्मानें बद्ध होत नाहीं; तापलेल्या लोखंडावर पाण्याचे थेंब पडले असतां जसा त्यांचा त्यास लेप न लागतां ते थेंब नाहींसे होतात त्याप्रमाणें भक्त कर्म करून तें नष्ट होतें; अशा शिवात्मिक श्रेष्ठ भक्तीचें वर्णन आह्मीं काय

माचक्ष्महे ॥२३॥ स्वच्छंदाचारवर्तिन्या भक्त्या यत्कृतमर्चनं ॥ यद्भुक्तमर्पितं लिंगे मनोवाक्कायकर्मभिः ॥२४॥ गंधपुष्पादिगंधस्य ग्रहणं यत्तदर्चनं ॥ षड्रसास्वादनं यत्तन्नैवेद्याय प्रकल्पितं ॥ २५ ॥ इंद्रियाकारभावेन विषयाकारतः स्वयं ॥ क्रीडया देवता भुंक्ते स्वत इत्यर्चनं मतं॥२६॥ शिलालेखा स्थलालेखा जललेखा त्रिधा क्रमात् ॥ शुभाशुभात्मिका कर्मज्ञानभक्तिक्रिया मता ॥२७॥ नैव लोप्या शिलालेखा स्थलीलेखा च लुप्यते ॥ नादौ लेखायते चांते जललेखा न लुप्यते ॥ २८ ॥ शुभकर्माशुभं कर्म ज्ञानकर्म प्रसादकं ॥ एतच्चतुर्विधं कर्म तत्तत्फलविधायकं ॥२९॥ पापान्नरकः पुण्यात्स्वर्गस्ताभ्यां विनैव कर्मभ्यां ॥ ज्ञानान्मोक्षस्तैस्त्रिभिरेव विना स्यात्प्रसादतो भक्तिः ॥३०॥ प्रसादादेव सा भक्तिः प्रसादो भक्तिसंभवः ॥ यथैवांकुरतो बीजं बीजतो वा यथांकुरः ॥३१॥ ज्ञानं ब्रूते भक्तिः कुरुते शिवजीवयोः पृथग्भावं ॥ तेन ज्ञानं पूर्वं भक्ति-

---

करावें. (२४) स्वच्छंदानें वागणाऱ्या भक्तीनें जें केलें जातें तें शिवाचें अर्चन होतें; जें खाल्लें जातें तें काया, वाचा, मनानें लिंगास अर्पण होतें. (२५) चंदन, फूल, वगैरेंचा वास घेणें हे शिवपूजन होय; षड्रसांची चव घेणें तोच नैवेद्य होतो. (२६) इंद्रियांच्या रूपानें व विषयांच्या रूपानें शिवच उपभोग घेतो असें ज्ञान होणें हेंच शिवार्चन होय. (२७) पुण्यपापरूपी कर्म हें पाषाणलेखाप्रमाणें आहे; ज्ञानकर्म स्थललेखाप्रमाणें आहे; भक्तिकर्म जललेखाप्रमाणें आहे. (२८) शिलालेख जसा नाहींसा होत नाहीं त्याप्रमाणें कर्मानें बंधन झाल्याशिवाय राहत नाहीं. जमिनीवर लेख लिहिला असतां तो जसा पुसतां येतो त्याप्रमाणें ज्ञानानें, झालेलें बंधन पुन्हा नाहींसें होऊं शकतें. पाण्यावर लिहूं लागलें असतां लेख उमटत नाहीं व पुसतां येत नाहीं त्याप्रमाणें भक्तीनें बंधन नाहीं व मोक्षहि नाहीं. परंतु त्या दोनींचा अभाव मात्र होतो. (२९) शुभकर्म, अशुभकर्म, ज्ञानकर्म, व प्रसादकर्म, हीं चार प्रकारचीं कर्में आपआपलीं फलें देणारीं आहेत. (३०) शुभकर्मापासून स्वर्गप्राप्ति होते. अशुम कर्मापासून नरक प्राप्त होतो; या दोन्हीं कर्मांवांचून केवळ ज्ञान असल्यास मोक्ष प्राप्त होतो. या तिन्हीवांचून केवळ प्रसाद असल्यास भक्ति उत्पन्न होते. (३१) प्रसादापासून भक्ति होते. आणि भक्तीपासून प्रसाद होतो. जसें अंकुरापासून बीज होतें, व बीजापासून अंकुर होतो. त्याप्रमाणें (३२) ज्ञान शिवजीवांचा भेद सांगतें; व भक्ति शिवजीवांचा भेद करिते. ( शिवापासून

स्तूत्तरतया विभाति ततः ॥ ३२ ॥ आत्मानं च पृथक्कृत्वा प्रेरितारं तथा पृथक् ॥ असौ जुष्टस्ततस्तेन ह्यमृतत्वाय कल्पते ॥३३॥ आत्मोपासक ईश्वरस्स्वयमुपास्यस्सर्वदैवेत्यसौ भक्तिर्भोगकरी करोति शिवमात्मानं च कृत्वा पृथक् ॥ यत्तत्क्षीरघृतारणीहुतवहस्रोतोंबुवत्संयुतं जीवेशैक्यपदं विभज्य परतोऽप्यस्यामृतत्वाय हि ॥ ३४ ॥ नेत्रे चाल्पविलोकिते सति पृथक्त्वं याति यत्तच्चिरं रूपं वस्तु तदेकमेव पुरुषेणाश्चर्यसंस्पृग्धिया ॥ कृत्वा भूय उभे समे यदि दृशौ तेनेक्षिते सत्यभूद्रूपं पूर्ववदेकमेव विमलं चैकं स्वभावेन हि ॥३५॥ एवमद्वैतभक्त्यैव प्रसादः सर्वतोमुखः ॥ प्रसिध्यति ततः सर्वमात्मरूपेण दृश्यते ॥ ३६॥ कर्ता कारयिता कर्म करणं कार्यमेव च ॥ सर्वमात्मतया भाति प्रसादात् पारमेश्वरात् ॥३७॥ भोक्ता भोजयिता भोगो भोगोपकरणानि च ॥ सर्वमात्मतया भाति प्रसादात् पारमेश्वरात् ॥३८॥ ग्राहकश्च तथा ग्राह्यं ग्रहणं सर्वतोमुखं ॥ सर्वमात्मतया भाति प्रसादात् पारमेश्वरात्॥३९॥ जीवात्मा परमात्मा च तयोर्भेदश्च भेदकः ॥ सर्वमात्मतया भाति प्रसादात् पारमेश्वरात् ॥४०॥ शरीरमिंद्रियं प्राणा मनो बुद्धिरहंकृतिः ॥

---

जीवास निराळा करिते ). ह्मणून ज्ञान प्रथम असतें नंतर भक्ति होते. (३३) ही भक्ति जीवात्मा व प्रेरणा करणारा ईश्वर यांस भिन्न करिते नंतर तो जीवात्मा परमात्म्याशीं मिळून मुक्त होतो. (३४) जीवात्मा उपासक आहे. ईश्वर सर्वदा उपास्य आहे ह्याप्रमाणें भोग देणारी भक्ति दूध व तूप, लांकूड व अग्नि; प्रवाह व पाणी; ह्याप्रमाणें मिळून असलेलें जीव व ईश यांचें ऐक्यपद निराळें करून नंतर जीवात्म्यास मोक्ष देते. (३५) एक डोळा मिटून व दुसरा किंचित् उघडून एखाद्या वस्तूकडे पाहिलें असतां ती द्विधा दिसते, नंतर आश्चर्यचकित होऊन दोन्ही डोळे सारखे उघडून पाहिलें असतां तीच वस्तु खरोखर एकच दिसते. (३६) त्याप्रमाणें अद्वैत भक्तीनें चोहींकडून परमेश्वराचा प्रसाद साधला जातो मग उपासकाला सर्व जग आत्मरूपच दिसतें. (३७) कर्ता; करविणारा; कर्माचें साधन व कार्य हीं सर्व परमेश्वराच्या प्रसादानें आत्मरूप दिसतात. (३८) भोगणारा, भोग देणारा, भोग आणि भोगाचें साधन, हीं सर्व ईश्वरप्रसादानें आत्मरूप दिसतात. (३९) घेणारा, घ्यावयाची वस्तु व घेणें हीं सर्व ईश्वरप्रसादानें सर्वत्र आत्मरूप भासतात. (४०) जीवात्मा व परमात्मा ह्या दोघांमध्यें भेद, व भेद उत्पन्न करणारा, हीं सर्व ईश्वरप्रसादानें आत्मरूप दिसतात. (४१) शरीर, इंद्रियें, प्राण,

**सर्वमात्मतया भाति प्रसादात् पारमेश्वरात् ॥४१॥ विधयश्च निषेधाश्च निषिद्धकरणान्यपि ॥ सर्वमात्मतया भाति प्रसादात्पारमेश्वरात् ॥४२॥ कामक्रोधादयः सर्वे तथा शांत्यादयोऽपि च ॥ सर्वमात्मतया भाति प्रसादात्पारमेश्वरात् ॥४३॥ तस्मादद्वैतगां भक्तिमाश्रयेत्सर्वसिद्धिदां ॥ न च द्वैतात्मिकां भक्तिं क्लेशहेतुप्रदायिनीं ॥४४॥ अन्योन्यप्रार्थकं द्वैतं समसंयोगयोस्तयोः ॥ कः कं भजति भक्त्या सा भक्तिरद्वैतगा न हि ॥ ४५ ॥ अद्वैतपदरूढा या भक्तिरद्वैतलक्षणा ॥ सैवाद्वैताभिधा भक्तिरन्या केवलकल्पिता ॥ ४६ ॥ द्वैतभक्त्या हि संसारवर्धनं भिन्नरूपतः ॥ अभिन्नरूपतोऽद्वैतभक्त्या संसारनाशनं ॥ ४७ ॥ द्वैतभक्तिः प्रपंचाख्या केन चित् कल्पिता मृषा ॥ अद्वैतभक्तिरचला निर्विकल्पा निरंजना ॥ ४८ ॥ द्वैतभक्तिनिवृत्तौ हि साक्षादद्वैतलक्षणा ॥ भक्तिर्गरीयसी भाति निजनिर्वाणरूपिणी ॥ ४९ ॥ अद्वैतभक्तियुक्तस्य यो-**

---

मन, बुद्धि, अहंकार, हीं सर्व ईश्वरप्रसादानें आत्मरूप दिसतात. (४२) विधि, निषेध, निषिद्धकर्म आणि त्याचें साधन, हीं सर्व परमेश्वरप्रसादानें आत्मरूप दिसतात. (४३) काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर व शांति, दांति, तितिक्षा, उपरति, श्रद्धा व समाधि हीं सर्व ईश्वरप्रसादानें शिवरूप भासतात. (४४) त्याकरितां उपासकानें अद्वैत भक्ति करावी त्यापासून सर्वसिद्धी लाभतात. द्वैतभक्ति करूं नये; कारण तीपासून क्लेश होतात. (४५) द्वैत उभयतांस सापेक्ष असतें; उपास्यास उपासकाची गरज असते व उपासकास उपास्याची गरज असते. परंतु जीव शिव ह्यांचा समान संयोग झाल्यावर ( एकरूप झाल्यावर ) कोण कोणाची भक्ति करणार ? जर एक दुसऱ्याची भक्ति करितो असें असेल तर ती अद्वैतस्वरूपी भक्ति नाहींच असें होतें. (४६) अद्वैतज्ञान उत्पन्न करून अद्वैतपदापर्यंत पोंचलेली जी भक्ति तीच अद्वैतभक्ति होय; दुसरी द्वैतभक्ति शास्त्राखेरीज केवळ मनानें कल्पिलेली आहे. (४७) द्वैतभक्तीनें सर्व जगामध्यें द्वैत दिसल्यावरून संसाराची वृद्धि होते. अद्वैतज्ञानानें अद्वैतभक्ति केल्यापासून संसार नाहींसा होतो. (४८) द्वैतभक्ति ही केवळ संसाररूपी असून कोणीतरी खोटीच कल्पिली आहे; अद्वैतभक्ति मनांतील विकल्प काढून त्यास कर्मांचा लेप न होऊं देतां टिकणारी आहे. (४९) द्वैतभक्ति नाहींशी झाल्यानंतर श्रेष्ठ अद्वैतभक्तीचा प्रकाश पडतो. ती केवळ मुक्तीच होय. (५०) अद्वैतभक्ति करणाऱ्या योग्यानें कोणतीहि क्रिया केली असतां ती

गिनः सकलक्रिया ॥ आस्ते दग्धपटन्यायात् क्रियामात्रा हि न क्रिया ॥ ५० ॥ क्रियामात्रा क्रिया नैव प्रतिबंधाय देहिनां ॥ केवला निर्मला शुद्धा फलकामविवर्जिता ॥ ५१ ॥ फलकामप्रयुक्ता हि क्रिया सा प्रतिबध्यते ॥ क्रियामात्रा न बंधायेत्यत्राश्चर्यं किमुच्यतां ॥५२॥ फलकामतया कर्मकरणं प्रतिबध्यते ॥ न कर्ममात्रकरणं तस्मात् कर्मफलं त्यजेत् ॥ त्यक्ते कर्मफलेऽप्यस्य विलासो नैव बाधते ॥५३॥ यथा चित्रपटस्त्रीणां विलासो नैव बाधते ॥ तथा द्वैतक्रियाणां च विलासो नैव बाधते ॥५४॥ न प्ररोहंति बीजानी यथा भ्रष्टानि भूतले ॥ अद्वैतभक्तियुक्तानि कर्माणि च तथैव हि ॥५५॥ यथा वंध्याः स्त्रियो लोके फलाय न कदाचन ॥ तथाऽद्वैतक्रिया लोके फलाय न कदाचन ॥५६॥ वंध्या सकामा यदि पुंसि संगमं करोत्यकामाऽपि फलं यथा न हि ॥ भक्तिस्सदा संगममीश्वरे मुदा करोत्यपि स्यात्फलमेव नेतरत् ॥ ५७ ॥ निष्फला निष्फला नैव सफला सफला न हि ॥ क्रिया अद्वैतसिद्धांतभ-

---

क्रिया जळलेल्या कापडाप्रमाणें निःसत्व होऊन राहते. (५१) ती क्रिया निष्कामबुद्धीनें केली गेल्यामुळें निर्मल व शुद्ध असते. ह्याकरितां ती मनुष्यांच्या बंधास कारण होत नाहीं. (५२) फळाच्या उद्देशानें केली गेलेली क्रिया बंधास कारण होते. निष्कामबुद्धीनें केली गेलेली क्रिया बंधास कारण होत नाहीं. यांत काय आश्चर्य आहे? (५३) ह्मणूनच फळाच्या आशेनें कर्म केलें असतां बंधन होतें, परमेश्वराच्या प्रीतीस्तव कर्म करण्यानें बंधन होत नाहीं. सबब कर्मांचें फळ टाकून कोणताहि विलास ( क्रिया ) केला असतांहि तो जीवास बाधक होत नाहीं. (५४) चित्रांतील स्त्रीचा विलास जसा पुरुषास बाधक होत नाहीं, तशी अद्वैतबुद्धीनें केलेली क्रिया बंधास कारण होत नाहीं. (५५) भाजलेलें बीं जसें जमिनीमध्यें उगवत नाहीं तसें अद्वैतभक्ति ठेवून निष्कामबुद्धीनें केलेलें कर्म फळ देण्यासाठीं जननमरणरूपी संसारांत पाडीत नाहीं. (५६) वांज (वंध्या) स्त्रीपासून लोकांमध्यें जसें कधीं फळ होत नाहीं तसें अद्वैतक्रियेपासून नाशवंत फळ कधींहि होत नाहीं. (५७) वांज स्त्रीनें कामातुर होऊन किंवा कामातुर न होतांही पुरुषाशीं संग केला तरी फळप्राप्ति होत नाहीं त्याप्रमाणें भक्ति नेहमीं ईश्वराशीं आनंदानें संग करीत असतांहि कोणतेंहि फळ देत नाहीं. (५८) अद्वैत भक्तिभावनेनें केलेल्या क्रियांस निष्फल ह्मणावें तर निष्फलही ह्मणतां येत नाहीं वा सफल ह्मणावें तर सफलहि ह्मणतां

क्तियोगसमाश्रिताः ॥ ५८ ॥ अद्वैतभक्तिरूपेण दृश्यंते तत्प्रभावतः ॥ नैष्फल्यमिति संभ्रांतिः साफल्यमिति विभ्रमः ॥५९॥ न नैष्फल्यं न साफल्यं क्रियाणामस्ति वस्तुतः ॥ समौ निम्नोन्नतौ नाभिकुचौ चित्रपटे स्त्रियः ॥ क्रियानैष्फल्यसाफल्ये सत्यद्वैते तथा समे ॥६०॥ यथा नानाविधा नद्यो नानाविधजला अपि ॥ स्यंदमाना इमाः सर्वा अकूपारं समाश्रिताः ॥६१॥ तद्रूपेणैव दृश्यंते नामरूपे विहाय च ॥ तथाऽद्वैतं समाश्रित्य क्रिया नानाविधा अपि ॥ ६२ ॥ अद्वैतभक्तिरूपेण दृश्यंते भक्तियोगतः ॥ क्रियाकारस्वरूपेण प्रतीताऽप्येव सर्वथा ॥६३॥ न केवलक्रिया ह्यस्य लीलामात्रा स्वभावतः ॥ अर्चनार्पणरूपेण तत्सर्वं तु प्रतीयते ॥६४॥ लीलया सकलाकारा स्वयं सा भक्तिदेवता ॥ क्रीडंती स्वात्मनात्मानं भुंक्ते चैतच्छिवार्पितं ॥६५॥ अनुरागपरा भक्तिर्विषयेषु विशुद्धधीर्विरागपरा ॥ अनुरागेण विरागेण संततं भक्तिरेव निर्लेपा ॥ ६६ ॥ अंतर्लेपबहिर्लेपत्यागग्रहणयोस्समा ॥ विषयाणां विषयि-

---

येत नाहीं. कारण दग्ध वस्त्रास निःसत्वामुळें वस्त्र आहे असें ह्मणतां येत नाहीं किंवा नाहीं असेंहि ह्मणतां येत नाहीं. (५९) अद्वैत भक्ति निष्फल आहे. किंवा सफल आहे असें जें वाटतें तें वाटणें खरोखर भ्रम आहे. (६०) खरोखर अद्वैतज्ञानानें केलेलें कर्म सफल नव्हे किंवा निष्फलहि नव्हे. चित्रांतील स्त्रीच्या बेंबीची खोली किंवा स्तनाची उंची हीं सारखींच असतात पहाणारास मात्र उचनीच भाव भासतो परंतु वस्तुतः तसा तो नसतो, त्याप्रमाणें अद्वैतज्ञान असलें ह्मणजे उपासकाला क्रियेचें निष्फलत्व व सफलत्व हीं दोन्ही बरोबर आहेत. (६१) पांढरें, काळें, असें नाना तऱ्हेचें पाणी असलेल्या पुष्कळ नद्या वाहत जाऊन समुद्रास मिळतात. (६२) मिळाल्यानंतर आपलें नांव व रूप टाकून समुद्राशीं ऐक्य पावून समुद्ररूपच दिसतात त्याप्रमाणें अद्वैत ज्ञानपूर्वक केलेल्या नाना प्रकारच्या क्रिया (६३) क्रियेच्या रूपानें भासत असूनहि भक्तियोगानें अद्वैत भक्तिरूपच दिसतात. (६४) अद्वैतज्ञानी मनुष्याची क्रिया फलोद्दिष्ट नसते तर स्वभावतः क्रीडारूप असते. ती सर्व लीलारूप क्रिया शिवार्पण व शिवार्चन ह्या रूपानें असते. (६५) ती सकलव्यापी भक्तिदेवता लीलेनें जीवात्म्यास आपल्या आत्म्याशीं खेळविते व शिवार्पित भक्षण करिते. (६६) निर्मल स्वभावाची भक्ति विषयांवर आसक्त असो किंवा नसो ती नित्य निर्लिप्त असते. (६७) स्रक्चंदनादिविषय, ज्ञान,

णामनुरागविरागिणां ॥६७॥ तस्माद्भक्तिर्न गृण्हाति न जहाति किमप्यसौ ॥ अनुरागेण यद्वस्तु विरागेणापि शांभवी ॥ ६८ ॥ यथा तमःप्रकाशाभ्यां युक्तोऽप्याकाश एतयोः ॥ निर्लेपतः स शुद्धात्मा तथा ताभ्यां तयोश्च सा ॥६९॥ तमोज्योत्स्नाप्रवृत्तिर्हि रात्रावेव न चाहनि ॥ पुण्यपापोभयं कर्म मते भक्तिमते कुतः ॥ ७० ॥ अहन्यातप एवास्ते तमोज्योत्स्नाविलक्षणे ॥ तथा भक्तिपदे शैवं पुण्यपापविलक्षणे ॥७१॥ अहन्यहस्करो भाति भर्गो भक्तिपदे तयोः ॥ प्रभावो ह्यातपस्यैवमित्येतदुभयं मतं ॥७२॥ ज्ञानैकलक्षणं शैवमित्येतदुभयं मतं ॥ ज्ञानैकलक्षणं शैवमुष्णलक्षण आतपः ॥ ७३ ॥ तमश्चंद्रिकयोस्सख्यमुभयोश्चैक्यलक्षणात् ॥ रात्रौ व्यवस्थितत्वाच्च तद्वदज्ञानलक्षणात् ॥ ७४ ॥ कर्मण्यवस्थितत्वाच्च सख्यं स्यात्पापपुण्ययोः ॥ तस्माद्भक्तिपदे पापपुण्ययोर्नैव

---

विषयांवर प्रीति करणारा, विषयत्याग करणारा ह्यासंबंधी अंतर्लेप, व बहिर्लेप ह्यांचा त्याग किंवा ग्रहण करण्यांत भक्ति समान असते. ( विषयग्रहण किंवा विषयत्याग ह्यांपासून भक्तीस आंतर्बाह्य लेप न होत असल्यामुळें विषयग्रहण किंवा विषयत्याग हीं भक्तीस सारखींच आहेत असा तात्पर्यार्थ आहे ). (६८) ह्याकरितां ईश्वरी भक्ति कोणत्याहि वस्तूचें प्रीतीनें ग्रहण करीत नाहीं किंवा वैराग्यानें तिचा त्यागहि करीत नाहीं. (६९) आकाशामध्यें अंधार किंवा प्रकाश असला तरी जसें आकाश निर्लिप्त असतें त्याप्रमाणें भक्ति, प्रीति किंवा वैराग्य या दोन्हींपासून निर्लिप्त असते. (७०) जसें अंधार किंवा चांदणें हीं दोन्ही रात्रीं असतात, दिवसास असत नाहींत. तसें पुण्य किंवा पाप हीं दोन्ही कर्मयोग्याला लागू आहेत. भक्ति योग्याला लागू नाहींत. (७१) चांदणें किंवा अंधार ह्यांस आश्रय न देणाऱ्या दिवसास जसा सूर्यप्रकाश मात्र असतो; त्याप्रमाणें पुण्य किंवा पाप ह्यांस थारा न देणाऱ्या भक्तींत शैवाचें ( शिवसंबंधित्वाचें ) अधिष्ठान असतें. (७२) दिवसा सूर्य असतो व ऊनहि असतें त्याप्रमाणें भक्तियोगामध्यें शिव असतो व शिवप्रभाव असतो ह्याप्रमाणें भक्तियोगाचें आणि दिवसाचें साम्य आहे. (७३) ज्ञान हें शैवाचें मुख्य लक्षण आहे. सूर्यप्रकाशाचें लक्षण ऊन आहे. ह्मणून दोन्हींचें साम्य आहे. (७४-७५) उष्णत्व नसणें व रात्रीस असणें हीं दोन चांदणें व अंधार ह्यांचीं सामान्य लक्षणें असल्यामुळें जसें त्यांचें सख्य आहे त्याप्रमाणें अज्ञान व कर्माच्या ठिकाणीं अस्तित्व हीं पापपुण्याचीं सामान्य लक्षणें असल्यामुळें त्यांत

वर्तते ॥ ७५ ॥ अत एव परायां तु भक्तौ न च शुभाशुभे ॥ ज्ञानं प्रसादादेव स्यादित्येषा शांभवी स्थितिः ॥ ७६ ॥ ज्ञानादेव हि मोक्षः स्यान्मोक्षादुपरि शांभवी ॥ भक्तिर्गुरुतरा भाति स्वतंत्रा निजलीलया ॥७७॥ धर्मादिपुरुषार्थाणां चतुर्णां परतः परा ॥ पंचमः पुरुषार्थो हि भक्तिश्शैवी सनातनी ॥७८॥ लोकयोरुभयोरैहिकामुष्मिकपदार्थयोः ॥ गमागमौ विनैवास्ते भक्तिः संपूर्णवैभवा ॥ ७९ ॥ भावानुरूपफलदा स्वाश्रितानां फलैषिणां ॥ उत्तरोत्तररूपेण भक्तिः पूर्णा निरुत्तरा ॥८०॥ के चित्प्राणैस्सह शिवपदं के चिदात्मीयकायैः के चिद्दारैर्निजतनुभवैर्मंदिरैर्बंधुवर्गैः ॥ ग्रामैर्देशैस्सह परिजनैः के चिदन्ये क्रमेण त्यक्त्वा चैतत्सकलमपि यांति स्वयं चैव भक्ताः ॥ ८१ ॥ प्राणादिवस्तुविषयेष्वनुरागयुक्ताः भक्ताः प्रयांति कतिभिः सह तैश्शिवैक्यं ॥ के चिद्विरागनिरता विषयेषु तेषु त्यक्त्वा च तान् शिवपदं स्वयमेव यांति ॥८२॥ भक्तिरेव परमार्थदायिनी भक्तिरेव परतत्त्ववेदिनी ॥ भक्ति-

---

सख्य आहे. ह्मणून भक्तींत पापपुण्याचा संबंध असत नाहीं. (७६) ह्मणूनच पराभक्ति उत्पन्न झाल्यानंतर शुभ किंवा अशुभ यांचा संबंध नसतो. केवळ ईश्वराच्या प्रसादानें ज्ञान होतें. ह्याप्रमाणें वीरशैवांचा सिद्धांत आहे. (७७) अद्वैतज्ञानापासून मोक्ष प्राप्त होतो मोक्ष प्राप्त झाल्यानंतर परशिवाच्या ठिकाणीं श्रेष्ठभक्ति स्वलीलेनें स्वतंत्र रीतीनें जाग्रत असते. (७८) धर्मार्थादि पुरुषार्थ चतुष्टयाहून भिन्न, श्रेष्ठ व सनातन अशी ईश्वरी भक्ति पांचवा पुरुषार्थच आहे. (७९) भक्तीचें वैभव पूर्ण झाल्यानंतर जीवाला यालोकीं व परलोकीं जाणें येणें घडत नाहीं. (८०) भक्ति आपल्या आश्रित लोकांला फलाची आशा उत्पन्न झाल्यास त्यांच्या कमी अधिक भावाप्रमाणें फळ देते. भक्ति पूर्ण असून तीहून दुसरें कोणीहि श्रेष्ठ नाहीं. (८१) कित्येक लोक परमेश्वराच्या ठिकाणीं भक्तियोग करून आपल्या प्राणासुद्धां शिवपदास गेले. कित्येक आपल्या स्थूल शरीरासह गेले. कित्येक बायका, मुलें, आप्त, इष्ट, परिवार, घरें, गांव, देश, इतक्या सहवर्तमान शिवपदाला गेले. कित्येक सगळें येथील येथेंच टाकून आपण शिवपदाला पोहोंचले. ( मुक्त झाले ). (८२) ज्यांना प्राणादि वस्तूंविषयीं प्रीति होते ते भक्तियोगी शिवपदीं जातांना प्राणादि वस्तुसहवर्तमान ऐक्यपदाला गेले; ज्यांना विषयांच्या ठिकाणीं वैराग्य होतें ते योगी येथील सर्व विषय येथेंच टाकून आपण शिवपदाला गेले. (८३) भक्ति मोक्षपद देणारी शिवतत्त्वाचें ज्ञान करून देणारी, संसारपाशाचा नाश कर-

रेव भवदोषहारिणी भक्तिरेव शिवभावकारिणी ॥८३॥ अतः परं भक्तिविलासवैभवे सदा शिवाद्वैतपरायणः स्वयं ॥ प्रसादमासाद्य निजैक्यसौख्यदं स्वमेव गायन् विचरेत्स्वलीलया ॥८४॥ नाहमनात्मा पश्चात्कोऽहं योऽहं पदस्थ आत्मा साक्षी ॥ सोऽहं तत्पतिशिवदासोऽहं दासोऽहमिति चरेदुपरि ॥८५॥ इति परमरहस्यं वेदवेदांतसारं हृतभवभयबाधं षट्स्थलब्रह्मबोधं ॥ गुरुशिवपदभक्त्या प्राप्तविद्याय देयं विरहितघनभक्तिश्रेयसे नैव देयं ॥८६॥ नाशिष्येभ्यश्चैतेभ्यो वा नाभक्तेभ्यः कदाचन ॥ ग्राहयेदीदृशानर्थानिति वेदानुशासनं ॥ ८७ ॥ क्रियाविश्रांतिरित्येवं मया संसारनाशिनी ॥ अद्वैतभक्तिनिर्वाणनिष्ठाकाष्ठा समीरिता ॥ ८८ ॥ श्रीमदैपुरसोमेशलिंगायालिंगरूपिणे ॥ लिंगांगैक्यस्वरूपाय नमस्ते लिंगमूर्तये ॥८९॥ नमश्शब्द उमा साक्षाच्छिवशब्दः शिवः स्वयं ॥ अयशब्दस्तयोर्योगस्सोमतत्त्वमुपास्महे ॥९०॥ अ-

---

णारी व शिवैक्य करून देणारी आहे. (८४) भक्तीचें वैभव पूर्ण झालें असतां शिवाच्या अद्वैत भावनेमध्यें आसक्त होऊन शिवैक्य देणारा ईश्वरीप्रसाद मिळाल्यानंतर शिवाचें गायन करीत यथेच्छ संचार करावा. (८५) शरीर मी नव्हे. मग मी कोण आहें. असा विचार करीत असतां जो अहंपदाचा अर्थ साक्षी आत्मा आहे. तोच मी असून त्या जीवात्म्याचा पति जो शिव त्याचा मी दास आहें. असें अनुसंधान करून जगामध्यें स्वच्छंदपणें फिरावें. (८६) हे षट्स्थल ब्रह्मज्ञान वेदांताचें सार असून मोठें रहस्य आहे. याच्या ज्ञानानें संसाराची भीति नाहींशी होते. शिवाच्या ठिकाणीं व गुरूच्या ठिकाणीं भक्ति करून ब्रह्मविद्या ज्याला मिळाली आहे. त्यालाच षट्स्थलज्ञान सांगावें. विद्या असूनहि ज्याला ईश्वराच्या ठिकाणीं भक्ति नाहीं त्यास देऊं नये. (८७) इतकें असूनहि जे शिष्य नव्हेत त्यांना व शिष्य असून गुरूवर ज्यांची भक्ति नाहीं त्यांनाहि सांगूं नये अशी वेदाची आज्ञा आहे. (८८) हें क्रियाविश्रांतीचें प्रकरण संसार नाहींसें करणारें आहे. या क्रियाविश्रांतीची पराकाष्ठा ह्मणजे अद्वैत भक्तिच होय. ती भक्ति मीं सांगितली. (८९) ऐपुरामध्यें राहणाऱ्या लिंगमूर्ति सोमेशलिंगाला माझा नमस्कार असो. (९०) नमः शब्दाचा अर्थ उमा; शिव शब्दाचा अर्थ शिव त्या दोघांचा योग अय शब्दाचा अर्थ आहे अशा त्या सोमेशलिंगाची आह्मी उपासना करतों. (९१)

वाच्यात्मस्वरूपाय शिवभावप्रदायिने ॥ नमः सद्गुरुनाथाय षट्स्थल-ब्रह्ममूर्तये ॥ ९१ ॥ स्वानुभूतिविभवानुगाहिना मायिदेवविभुना महात्मना ॥ श्रीशिवानुभवसूत्रमुत्तरं तंत्रमुक्तमतिशोभनं परं ॥९२॥ एतद्यो वेद सोऽविद्याग्रंथिं विकिरति प्रभुः ॥ शिवसिद्धांतकं तंत्रं शिवाद्वैतं शिवं पदं ॥९३॥

इति श्रीवातुलोत्तरतंत्रे शिवानुभवसूत्रे षट्स्थलनिर्णये क्रियाविश्रांतिर्नामाष्टमाधिकरणं संपूर्णम् ॥

---

ज्याचें आत्मस्वरूप वर्णन करण्यास अशक्य आहे, जो जीवरूप असणाऱ्याला शिवपणा देणारा आहे व जो सद्गुरुनाथ षट्स्थल ब्रह्म आहे त्याला माझा नमस्कार असो. (९२) स्वानुभवामध्यें निष्णात असणाऱ्या माहात्म्या मायिदेव प्रभूनें वातुलागमाच्या उत्तरतंत्रांतील अत्यंत शुभदायक शिवानुभवसूत्र सांगितलें. (९३) जो हें मोक्षपददायक व शिवाद्वैतप्रतिपादक शैवसिद्धान्तशास्त्र जाणतो तो समर्थ मनुष्य स्वाज्ञानापासून मुक्त होतो.

ह्याप्रमाणें वातुलागमाच्या उत्तरतंत्रांतील शिवानुभवसूत्राच्या षट्स्थलनिर्णयांतील क्रियाविश्रांतिनांवाचें आठवें अधिकरण समाप्त झालें.



IGNCA RAR
ACC. No. R-472

# स्थलादर्शपट.

- स्थल ( ब्रह्म )
  - लिंगस्थल ( ईश )
    - भावलिंगस्थल. ( ईश्वर )
      - महालिंगस्थल.
      - प्रसादलिंगस्थल.
    - प्राणलिंगस्थल. ( हिरण्यगर्भ )
      - चरलिंगस्थल.
      - शिवलिंगस्थल.
    - इष्टलिंगस्थल. ( विराट् )
      - गुरुलिंगस्थल.
      - आचारलिंगस्थल.
  - अंगस्थल ( जीव )
    - योगांगस्थल. ( प्राज्ञ )
      - ऐक्यस्थल.
      - शरणस्थल.
    - भोगांगस्थल. ( तैजस )
      - प्राणलिंगिस्थल.
      - प्रसादिस्थल.
    - त्यागांगस्थल. ( विश्व )
      - महेशस्थल.
      - भक्तस्थल.

Indira Gandhi National

- शक्ति.
  - भक्तिशक्ति.
    - श्रद्धाभक्ति.
    - नैष्ठिकाभक्ति.
    - अवधानभक्ति.
    - अनुभवभक्ति.
    - आनंदभक्ति.
    - समरसभक्ति.
  - कलाशक्ति.
    - क्रियाशक्ति. — निवृत्तिकला.
    - ज्ञानशक्ति. — प्रतिष्ठाकला.
    - इच्छाशक्ति. — विद्याकला.
    - आदिशक्ति. — शांतिकला.
    - पराशक्ति. — शांत्यतीताकला.
    - चिच्छक्ति. — शांत्यतीतोत्तराकला.

Indira Gandhi National
Centre for the Arts

# लिंगांगसामरस्यसद्भावदर्शक पट.

| लिंग. | मुख. | शक्ति. | तत्त्व. | ज्ञानांग. | कर्मांग. |
|---|---|---|---|---|---|
| महालिंग. | हृदय. | चिच्छक्ति. | शिवतत्त्व. | हृदय. | हृदय. |
| प्रसादलिंग. | श्रोत्र. | पराशक्ति. | सादाख्यतत्त्व. | श्रोत्र. | वाक्. |
| चरलिंग. | त्वक्. | आदिशक्ति. | अमूर्ततत्त्व. | त्वक्. | पाणि. |
| शिवलिंग. | नेत्र. | इच्छाशक्ति. | मूर्ततत्त्व. | नेत्र. | पाद. |
| गुरुलिंग. | जिव्हा. | ज्ञानशक्ति. | कर्तृतत्त्व. | रसना. | उपस्थ. |
| आचारलिंग. | नासिका. | क्रियाशक्ति. | सकलतत्त्व. | नासिका. | पायु. |

Indira Gandhi National Centre for the Arts

| अंगस्थल. | भक्ति. | हस्त. | अर्पण. | प्रसाद. | अंग. | अवस्था. | शरीर. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ऐक्यस्थल. | समरसभक्ति. | भावहस्त. | स्मर्तव्यपदार्थ. | परिणामप्रसाद | आत्मा. | सुषुप्ति. | कारणशरीर. |
| शरणस्थल. | आनंदभक्ति. | ज्ञानहस्त. | श्राव्यपदार्थ. | शब्दप्रसाद. | व्योम. | | |
| प्राणलिंगिस्थल. | अनुभवभक्ति. | मनोहस्त. | स्पृश्यपदार्थ. | स्पर्शप्रसाद. | वायु. | स्वप्न. | सूक्ष्मशरीर. |
| प्रसादिस्थल. | अवधानभक्ति. | अहंकारहस्त. | द्रष्टव्यपदार्थ. | रूपप्रसाद. | अग्नि. | | |
| महेशस्थल. | नैष्ठिकाभक्ति. | बुद्धिहस्त. | रस्यपदार्थ. | रसप्रसाद. | जल. | जागृति. | स्थूलशरीर. |
| भक्तस्थल. | श्रद्धाभक्ति. | चित्तहस्त. | घ्रेयपदार्थ. | गंधप्रसाद. | भूमि. | | |

Indira Gandhi National

## डिव्हिजनल इन्स्पेक्टर आफ अग्रिकल्चर पुणें ह्यांनीं विलायती भुईमुगाच्या पेरणीसंबंधीं दिलेली माहिती.

जमीन भुसभुशीत असावी. मध्यम, काळ्या रेसवट व तांबूस माळरानांत हें पीक चांगलें येतें. जमीन एकदोन वेळ नांगरून, कुळवून व खत घालून तयार करावी. निदान एकरीं दहा ते पंधरा गाड्या कुजलेलें शेणखत घालावें.

पहिल्या दोनतीन पावसांनीं जमीन चांगली भिजली ह्मणजे नांगरीनें अगर एडताकानें ( हें कुळवासारखें असतें पण याचें दिंड हलकें असून, काकऱ्या पाडण्यासाठीं यास भुईमुगाचे जातीप्रमाणें जवळ अथवा दूर फण बसविलेले असतात. ) काकऱ्या पाडून खालीं लिहिल्या दराप्रमाणें निरनिराळे जातीचें बीं पेरावें.—

| जातीचें नांव. | दाणे दर एकरीं पौंड (१ पौंड=३९॥ तो.) | सरींत अंतर इंच. | दाण्यांत अंतर इंच. |
|---|---|---|---|
| मोठाजपानी व्हर्जिनिया | ७९–१०० | १२ | ९ |
| पांदेचेरी.. .... | ८९ | ९ | ६ |
| लहान जपानी ( तांबड्या दाण्याचा ) | | | |
| स्पॅनिश भुईमूग .... | २०० | ६ | ४ |

Indira Gandhi National Centre for the Arts

पेरणी झाल्यावर फराटीनें बीं चांगलें झाकावें. पुढें भुईमूग फुलण्याचे सुमारास दोनतीन भांगलणी द्याव्यात. पानें पिंवळीं पडलीं व शेंगा जमिनींत तयार झाल्या, टरफलें टणक झालीं व शेंगाचे दाणे वाळले ह्मणजे पीक तयार झालें असें समजावें. जिराईत भुईमूग कुळवानें काढतात; बागाईतास जमीन भारी असल्यास, नांगरीनें अगर कुदळीनें काढावा लागतो.

सातारा, कोल्हापूरकडे भुईमुगाचें पीक पावसावर येतें. अहमदनगरकडे त्यास पाणी देतात; तथापि तिकडे देखील लौकर येणारे जातीस ह्मणजे लहान जपानी व स्पॅनिशपीजट यांस फार पाणी द्यावें लागणार नाहीं. कारण त्या जाती तीन किंवा चार महिन्यांतच तयार होतात. आणि बाकीच्यास चार किंवा पांच महिने लागतात; तरी पण त्या देशी भुईमुगाच्या आधीं एक महिना तयार होतात. शेंगा तयार झाल्यावर त्यास पाणी देऊं नये.

**डिव्हिजनल इन्स्पेक्टर आफ अग्रिकल्चर.**

Indira Gandhi National
Centre for the Arts